REFBK-0001685

REFBK-0001685

श्रीलक्ष्मीकेशव प्रसन्न.

# नित्यपाठ भजनमाला.

संग्राहक व प्रकाशक.

जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर.

महाराष्ट्र कविचरित्र, नेपाळवर्णन, भरतपुरचा वेढा इ. पुस्तकांचा कर्ता.

या पुस्तकाचे सर्व हक्क प्रकाशकानें कायद्याप्रमाणें आपल्या ताब्यांत ठेविले आहेत.

ग्रंथ संग्रहालय
इ. सन १९२९
१६८०

प्रकाशकः—जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर, मेरी बिल्डिंग,
हिलरोड, वांद्रें, जि. ठाणें.

मुद्रकः—अनंत आत्माराम मोरमकर
श्रीलक्ष्मी-नारायण छापखाना, ४०२, ठाकुरद्वार, मुंबई.

# प्रस्तावना.

सततं कीर्तयंतो मां यतंतश्च दृढव्रताः ।
नमस्यंतश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥
अनन्याश्चितयंतो मां ये जनाः पर्युपासते । तेषां
नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

श्रीमद्भगवद्गीता.

तरी कीर्तनाचेनि नटनाचें । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे । जे नामचि नाहीं पापाचें । ऐसें केलें ॥

*
* *

ऐसें माझेनि नामघोषें । नाहींचि करिती विश्वाचीं दुःखें । अवघें जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ॥

*
* *

जयाचे वाचेपुढां भोजें । अखंड नाम नाचत असे माझें । जें जन्मसहस्त्रीं वोळगीजे । एक वेळ यावया ॥ तो मी वैकुंठीं नसें । वेळु एकु भानुबिंबींही न दिसें । वरी योगियांचींही मानसें । उमरडौनि जाय ॥ परी तयांपासीं पांडवा । मी हारपला गिंवसावा । जेथ नाम-घोषु बरवा । करिती माझा ॥ कैसे माझ्या गुणीं धाले । देशकाळातें विसरले । कीर्तनसुखें सुखावले । आपणांचि ॥ कृष्णविष्णु हरि-गोविंद । या नामाचे निखिळ प्रबंध । माजीं आत्मचर्चा विशद । उदंड गाती ॥

*
* *

ते एकवटूनि जिये क्षणीं । अनुसरले गा माझिये वाहणीं । तेव्हांचि तयांची चिंतवणी । मजचि पडली ॥

*
* *

हा योगक्षेमु आघवा । तयांचा मजचि पडिला पांडवा । जयांचिया सर्व भावा । आश्रयो मी ॥

ज्ञानेश्वरी.

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ । मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥

*
* *

नसें वैकुंठाचे ठायीं । नसें योग्याचे हृदयीं॥ माझे भक्त गाती जेथें । नारदा मी उभा तेथें ॥

श्रीभगवान्

कांहीं पडतां जडभारी । दासें आठवावा हरी ॥ मग तो होऊं नेदी शीण । आड घाली सुदर्शन ॥

*
* *

आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालुनियां ॥ मग तो दयाळू वारील सांकडें । येर तें बापुडें काय रंक ॥

तुकाराम

*
* *

समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे ॥ जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही । नुपेक्षी कदां राम दासाभिमानी ॥

रामदास

*
* *

अखंड भगवद्भजन करी । तोचि येथें धन्य ॥

सोहिरोबा

मुखीं नाम हातीं टाळी । वाजवि त्याचीं विघ्नें टाळी । विसंबेना कधिं वनमाळी । मागें पुढें रक्षित राही ॥

श्रीकृष्णभट्टजी बांदकर

हरिपण हरिनामें धातुमूर्तीस आलें ।
हरिमय हरिनामें विश्व संतांसि जालें ॥
भवभय हरिनामें साधकांचें पळालें ।
वद वद वद जिव्हे रामनामें रसालें ॥
गावोनियां मधुर हें हरिनाम नाचा ।
पाहों मग भ्रम कसा हरिना मनाचा ॥
तत्रापि कीर्तनचि मुख्य कलौ करीतो ।
होतो तया प्रकट तारक लौकरी तो ॥

वामन

संकेतें अथवा हास्य करून । भलत्या मिषें घडो शिवस्मरण । न कळतां परीसीं लोह जाण । झगटतां सुवर्ण करी कीं ॥

श्रीधर

साधन नामाचि सार । कलियुगीं साधन नामाचि सार ॥

हरिकवि

नाम घेतां वायां गेला । ऐसा नाहीं आयकिला ॥ नामें तरला नाहीं कोण । ऐसा द्यावा निवडून ॥

तुकाराम

राम राम बोला वाणी । मन लावा राघवचरणीं ॥

विठोबा अण्णा

गरसम घर समजुनि जे हरिनामामृतरसांत तरतरले । तरले तेचि न केवळ त्यांचे भवसागरीं पितर तरले ॥

मोरोपंत

# नित्यपाठ भजनमाला.

## भाग १ ला.

…हालय
क्र. …
स्थळ

### अथ प्रातःस्मरणम् ।

श्रीगणेशाय नमः । ब्राह्मे मुहूर्ते चोत्थाय चिंतयेदात्मनो हितम् ॥ स्मरणं वासुदेवस्य कुर्यात्कलिमलापहम् ॥ १ ॥ श्रीमद्रामाभिधानं. विधुतकलिमलं ब्रह्मधर्मस्य मूलं स्मृत्वा ब्राह्मे मुहूर्ते सकलसुकृतिभिः संप्रबुद्धैरुपास्यम् ॥ स्मृत्वा मन्वात्रिमुख्यानपि निखिलमुनीन्धर्मधामप्रदीपान्विश्वादर्शं विधास्ये विमलमतिकृते धर्मशास्त्रस्य सारम् ॥ २ ॥ गुर्वर्थे त्यक्तराज्यो

व्यचरदनुवनं पद्मपद्भ्यां प्रियायाः पाणिस्पर्शाक्षमाभ्यां मृजितपथरुजो यो हरींद्रानुजाभ्याम् ॥ वैरूप्याच्छूर्पणख्याः प्रियविरहरुषारोपितभ्रूविजृंभत्रस्ताब्धिर्बद्धसेतुः खलदवदहनः कोसलेंद्रोऽवतान्नः ॥ ३ ॥ यः पृथ्वीभरवारणाय दिविजैः संप्रार्थितश्चिन्मयः संजातः पृथिवीतले रविकुले मायामनुष्योऽव्ययः ॥ निश्चक्रं हतराक्षसः पुनरगाद्ब्रह्मत्वमाद्यं स्थिरां कीर्तिं पापहरां विधाय जगतां तं जानकीशं भजे ॥ ४ ॥ मनोजवं मारुततुल्यवेगं जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ॥ वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥ ५ ॥ जन्माद्यस्य यतोन्वयादितरतश्चार्थेष्वभिज्ञः स्वराट् तेने ब्रम्ह हृदा य आदिकवये मुह्यंति यत्सूरयः ॥ तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गोऽमृषा धाम्ना स्वेन सदा

निरस्तकुहकं सत्यं परं धीमहि ॥ १ ॥ धर्मः
प्रोज्झितकैतवोऽत्र परमो निर्मत्सराणां सतां
वेद्यं वास्तवमत्र वस्तु शिवदं तापत्रयोन्मूलनम् ॥
श्रीमद्भागवते महामुनिकृते किंवा परैरीश्वरः
सद्यो हृद्यवरुध्यतेऽत्र कृतिभिः शुश्रूषुभिस्तत्क्ष-
णात् ॥ २ ॥ निगमकल्पतरोर्गलितं फलं
शुकमुखादमृतद्रवसंयुतम् ॥ पिबत भागवतं
रसमालयं मुहुरहो रसिका भुवि भावुकाः ॥ ३ ॥
कृष्ण त्वदीयपदपंकजपंजरांते अद्यैव मे विशतु
मानसराजहंसः ॥ प्राणप्रयाणसमये कफवात-
पित्तैः कंठावरोधनविधौ स्मरणं कुतस्ते ॥ ४ ॥
कृष्ण कृष्णेति कृष्णेति यो मां स्मरति नित्यशः
॥ जलं भित्त्वा यथा पद्मं नरकादुद्धराम्यहम्
॥ ५ ॥ सकृन्नारायणेत्युक्त्वा पुमान्कल्पशतत्रयम्
॥ गंगादिसर्वतीर्थेषु स्नातो भवति पुत्रक ॥६॥

सकृदुच्चरितं येन हरिरित्यक्षरद्वयम् ॥ बद्धः
परिकरस्तेन मोक्षाय गमनं प्रति ॥ ७ ॥

ध्यायेदादित्यसंकाशं वासुदेवं चतुर्भुजं ॥
शंखचक्रगदापद्मवनमालाविराजितम् ॥ १ ॥
तत्पादोदकजां धारां निपतंतीं स्वमूर्धनि ॥
चिंतयेद्ब्रह्मरंध्रेण प्रविशंतीं स्विकां तनुम् ॥
तया संक्षालितं सर्वमंतर्देहगतं मलम् ॥ २ ॥

महर्षिर्भगवान्व्यासः कृत्वेमां संहितां पुरा ॥
श्लोकैश्चतुर्भिर्धर्मात्मा पुत्रमध्यापयच्छुकम् ॥ १ ॥
मातापितृसहस्राणि पुत्रदारशतानि च ॥ संसारे-
ष्वनुभूतानि यांति यास्यंति चापरे ॥ २ ॥
हर्षस्थानसहस्राणि भयस्थानशतानि च ॥
दिवसे दिवसे मूढमाविशंति न पंडितम् ॥ ३ ॥
ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चिच्छृणोति मे ॥
धर्मादर्थश्च कामश्च स किमर्थं न सेव्यते ॥४॥

न जातु कामान्न भयान्न लोभाद्धर्मं त्यजेज्जीवि-
तस्यापि हेतोः ॥ धर्मो नित्यः सुखदुःखे त्वनित्ये
जीवो नित्यो हेतुरस्य त्वनित्यः ॥ ५ ॥ इमां
भारतसावित्रीं प्रातरुत्थाय यः पठेत् ॥ स
भारतफलं प्राप्य परं ब्रह्माधिगच्छति ॥ ६ ॥
दधि मधुरं मधु मधुरं द्राक्षा मधुरा सितापि
मधुरैव ॥ मधुरादपि मधुरतरं मथुरानाथस्य
नाम यद्गीतम् ॥ १ ॥ मृद्वीका रसिता
सिता समशिता स्फीतं निपीतं पयः स्वर्यातेन
सुधाप्यधायि कतिधा रंभाधरः खंडितः ॥ सत्यं
ब्रूहि मदीय जीव भवता भूयो भवे भ्राम्यता
कृष्णेत्यक्षरयोरयं मधुरिमोद्गारः क्वचिल्लक्षितः
॥ २ ॥ हे जिह्वे रससारज्ञे सर्वदा मधुरप्रिये ॥
नारायणाख्यं पीयूषं पिब जिह्वे निरंतरम् ॥३॥
जिह्वे कीर्तय केशवं मुररिपुं चेतो भज श्रीधरं

पाणिद्वंद्व समर्चयाच्युतकथाः श्रोत्रद्वय त्वं शृणु ॥ कृष्णं लोकय लोचनद्वय हरेर्गच्छांत्रियुग्मालयं जिघ्र घ्राण मुकुंदपादतुलसीं मूर्धन्नमाधोक्षजम् ॥ ४ ॥ यो गोशतं कनकशृंमगयं ददाति विप्राय वेदविदुषे च बहुश्रुताय ॥ पुण्यां च भारतकथां श्रृणुयाच्च नित्यं तुल्यं फलं भवति तस्य च तस्य चैव ॥ ५ ॥

सूर्यस्य ॥ प्रातःस्मरामि खलु तत्सवितुर्वरेण्यं रूपं हि मंडलमृचोऽथ तनुर्यजूंषि ॥ सामानि यस्य किरणाः प्रभवादिहेतुं ब्रह्माहरात्मकमलक्ष्यमचिंत्यरूपम् ॥१॥ प्रातर्नमामि तराणिं तनुवाङ्मनोभिर्ब्रह्मेंद्रपूर्वकसुरैर्नुतमार्चितं च ॥ वृष्टिप्रमोचनाविनिग्रहहेतुभूतं त्रैलोक्यपालनपरं त्रिगुणात्मकं च ॥ २ ॥ प्रातर्भजामि सवितारमनंतशक्तिं पापौघशत्रुभयरोगहरं परं च ॥ तं

सर्वलोककलनात्मककालमूर्तिं गौकंठबंधनविमोचनमादिदेवम् ॥ ३ ॥ श्लोकत्रयमिदं भानोः प्रातः प्रातः पठेत्तु यः॥ स सर्वव्याधिनिर्मुक्तः परं सुखमवाप्नुयात् ॥ ४ ॥ गणेशस्य ॥ प्रातः स्मरामि गणनाथमनाथबंधुं सिंदूरपूरपरिशोभितगंडयुग्मम् ॥ उद्दंडविघ्नपरिखंडनचंडदंडमाखंडलादिसुरनायकवृंदवंद्यम् ॥ १ ॥ प्रातर्नमामि चतुराननवंद्यमानमिच्छानुकूलमखिलं च वरं ददानम् ॥ तं तुंदिलं द्विरसनप्रिययज्ञसूत्रं पुत्रं विलासचतुरं शिवयोः शिवाय ॥ २ ॥ प्रातर्भजाम्यभयदं खलु भक्तशोकदावानलं गणविभुं वरकुंजरास्यम् ॥ अज्ञानकाननविनाशनहव्यवाहमुत्साहवर्धनमहं सुतमीश्वरस्य ॥ ३ ॥ श्लोकत्रयमिदं पुण्यं सदा साम्राज्यदायकम् ॥ प्रातरुत्थाय सततं यः पठेत्प्रयतः पुमान् ॥ ४ ॥

देव्याः ॥ प्रातः स्मरामि शरदिंदुकरो-
ज्ज्वलाभां सद्रत्नवत्सकलकुंडलहारशोभाम् ॥
दिव्यायुधोर्जितसुनीलसहस्रहस्तां रक्तोत्पलाभच-
रणां भवतीं परेशाम् ॥ १ ॥ प्रातर्नमामि
महिषासुरचंडमुंडशुंभासुरप्रमुखदैत्यविनाशदक्षाम्
॥ ब्रह्मेंद्ररुद्रमुनिमोहनशीललीलां चंडीं समस्त-
सुरमूर्तिमनेकरूपाम् ॥ २ ॥ प्रातर्भजामि
भजतामखिलार्थदात्रीं धात्रीं समस्तजगतां दुरि-
तापहंत्रीम् ॥ संसारबंधनविमोचनहेतुभूतां मायां
परां समधिगम्य परस्य विष्णोः ॥ ३ ॥
श्लोकत्रयमिदं देव्याश्चंडिकायाः पठेन्नरः ॥
सर्वान्कामानवाप्नोति विष्णुलोके महीयते ॥४॥
शिवस्य ॥ प्रातःस्मरामि भवभीतिहरं सुरेशं
गंगाधरं वृषभवाहनमंबिकेशम् ॥ खट्वां-
गशूलवरदाभयहस्तमीशं संसाररोगहरमौषधम-

द्वितीयम् ॥ १ ॥ प्रातर्नमामि गिरिशं गिरि-
जार्धदेहं सर्गस्थितिप्रलयकारणमादिदेवम् ॥
विश्वेश्वरं विजितविश्वमनोभिरामं संसाररोग०
॥ २ ॥ प्रातर्भजामि शिवमेकमनंतमाद्यं वेदां-
तवेद्यमनघं पुरुषं महांतम् ॥ नामादिभेदरहितं
षड्भावशून्यं संसार० ॥ ३ ॥ प्रातः समुत्थाय
शिवं विचिंत्य श्लोकत्रयं येऽनुदिनं पठंति ॥ ते
दुःखजातं बहुजन्मसंचितं हित्वा पदं यांति
तदेव शंभोः ॥ ४ ॥ विष्णोः ॥ प्रातः
स्मरामि भवभीतिमहार्तिशांत्यै नारायणं गरुड-
वाहनमब्जनाभम् ॥ ग्राहाभिभूतवरवारणमुक्ति-
हेतुं चक्रायुधं तरुणवारिजपत्रनेत्रम् ॥ १ ॥
प्रातर्नमामि मनसा वचसा च मूर्ध्ना पादारविंद-
युगुलं परमस्य पुंसः ॥ नारायणस्य नरकार्णव-
तारणस्य पारायणप्रवणविप्रपरायणस्य ॥ २ ॥

देव्याः ॥ प्रातः स्मरामि शरदिंदुकरो-
ज्ज्वलाभां सद्रत्नवत्सकलकुंडलहारशोभाम् ॥
दिव्यायुधोर्जितसुनीलसहस्रहस्तां रक्तोत्पलाभच-
रणां भवतीं परेशाम् ॥ १ ॥ प्रातर्नमामि
महिषासुरचंडमुंडशुंभासुरप्रमुखदैत्यविनाशदक्षाम्
॥ ब्रह्मेंद्ररुद्रमुनिमोहनशीललीलां चंडीं समस्त-
सुरमूर्तिमनेकरूपाम् ॥ २ ॥ प्रातर्भजामि
भजतामखिलार्थदात्रीं धात्रीं समस्तजगतां दुरि-
तापहंत्रीम् ॥ संसारबंधनविमोचनहेतुभूतां मायां
परां समधिगम्य परस्य विष्णोः ॥ ३ ॥
श्लोकत्रयमिदं देव्याश्चंडिकायाः पठेन्नरः ॥
सर्वान्कामानवाप्नोति विष्णुलोके महीयते ॥४॥
शिवस्य ॥ प्रातःस्मरामि भवभीतिहरं सुरेशं
गंगाधरं वृषभवाहनमंबिकेशम् ॥ खट्वां-
गशूलवरदाभयहस्तमीशं संसाररोगहरमौषधम-

द्वितीयम् ॥ १ ॥ प्रातर्नमामि गिरिशं गिरि-
जार्धदेहं सर्गस्थितिप्रलयकारणमादिदेवम् ॥
विश्वेश्वरं विजितविश्वमनोभिरामं संसाररोग०
॥ २ ॥ प्रातर्भजामि शिवमेकमनंतमाद्यं वेदां-
तवेद्यमनघं पुरुषं महांतम् ॥ नामादिभेदरहितं
षडभावशून्यं संसार० ॥ ३ ॥ प्रातः समुत्थाय
शिवं विचिंत्य श्लोकत्रयं येऽनुदिनं पठंति ॥ ते
दुःखजातं बहुजन्मसंचितं हित्वा पदं यांति
तदेव शंभोः ॥ ४ ॥ विष्णोः ॥ प्रातः
स्मरामि भवभीतिमहार्तिशांत्यै नारायणं गरुड-
वाहनमब्जनाभम् ॥ ग्राहाभिभूतवरवारणमुक्ति-
हेतुं चक्रायुधं तरुणवारिजपत्रनेत्रम् ॥ १ ॥
प्रातर्नमामि मनसा वचसा च मूर्ध्ना पादारविंद-
युगुलं परमस्य पुंसः ॥ नारायणस्य नरकार्णव-
तारणस्य पारायणप्रवणविप्रपरायणस्य ॥ २ ॥

प्रातर्भजामि भजतामभयंकरं तं प्राक्सर्वजन्मकृ॰
तपापभयापहत्यै यो ग्राहवक्त्रपतितांघ्रिगजें॰
द्रघोरशोकप्रणाशमकरोद्धृतशंखचक्रः ॥ ३ ॥
श्लोकत्रयमिदं पुण्यं प्रातःकाले पठेत्तु यः ॥
लोकत्रयगुरुस्तस्मै दद्यादात्मपदं हरिः ॥ ४ ॥
राघवस्य ॥ प्रातः स्मरामि रघुनाथमुखारविंदं
मंदस्मितं मधुरभाषि विशालभालम् ॥ कर्णा॰
वलंबिचलकुंडलशोभिगंडं कर्णांतदीर्घनयनं नय॰
नाभिरामम् ॥ १ ॥ प्रातर्भजामि रघुनाथकरा॰
रविंदं रक्षोगणाय भयदं वरदं निजेभ्यः ॥
यद्राजसंसदि विभज्य महेशचापं सीताकरग्रहण-
मंगलमाप सद्यः ॥ २ ॥ प्रातर्नमामि रघुनाथ-
पदारविंदं पद्मांकुशादिशुभरेखि सुखावहं मे ॥
योगींद्रमानसमधुव्रतसेव्यमानं शापापहं सपदि
गौतमधर्मपत्न्याः ॥ ३ ॥ प्रातर्वदामि वचसा

रघुनाथनाम वाग्दोषहारि सकलं शमलं करोति॥ यःपार्वती स्वपतिना सह भोक्तुकामा प्रीत्या सहस्त्रहरिनामसमं जजाप ॥ ४ ॥ प्रातः श्रये श्रुतिनुतां रघुनाथमूर्तिं नीलांबुजोत्पलसितेतरर-त्ननीलाम् ॥ आमुक्तमौक्तिकविशेषविभूषणाढ्यां ध्येयां समस्तमुनिभिर्जनमुक्तिहेतुम् ॥ ५ ॥ यः श्लोकपंचकमिदं प्रयतः पठेत्तु नित्यं प्रभातसमये पुरुषः प्रबुद्धः ॥ श्रीरामकिंकरजनेषु स एव मुख्यो भूत्वा प्रयाति हरिलोकमनन्यलभ्यम् ॥६॥ ब्रह्मा मुरारिस्त्रिपुरांतकारी भानुः शशी भूमिसुतो बुधश्च ॥ गुरुश्च शुक्रः शनिराहुकेतवः कुर्वंतु सर्वे मम सुप्रभातम् ॥ १ ॥ भृगुर्वसिष्ठः क्रतुरंगिराश्च मनुः पुलस्त्यः पुलहश्च गौतमः ॥ रैभ्यो मरीचिश्च्यवनश्च दक्षः कुर्वंतु सर्वे० ॥ २ ॥ सनत्कुमारः सनकः सनंदनः सना-

तनोऽप्यासुरिपिंगलौ च ॥ सप्त स्वराः सप्त रसातलानि कुर्वं० ॥ ३ ॥ सप्तार्णवाः सप्त कुलाचलाश्च सप्तर्षयो द्वीपवनानि सप्त ॥ भूरादि कृत्वा भुवनानि सप्त कुर्वं० ॥ ४ ॥ पृथ्वी सगंधा सरसास्तथापः स्पर्शी च वायु-र्ज्वलनः सतेजाः ॥ नभः सशब्दं महता सहैव कु० ॥ ५ ॥ इत्थं प्रभाते परमं पवित्रं पठे-त्स्मरेद्वा शृणुयाच्च नित्यम् ॥ दुःस्वप्ननाशस्त्विह सुप्रभातं भवेच्च नित्यं भगवत्प्रसादात् ॥ १ ॥ पुण्यश्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः ॥ पुण्यश्लोका च वैदेही पुण्यश्लोको जनार्दनः ॥ २ ॥ कर्कोटकस्य नागस्य दमयंत्या नलस्य च ॥ ऋतुपर्णस्य राजर्षेः कीर्तनं कलिनाश-नम् ॥ ३ ॥ अश्वत्थामा बलिर्व्यासो हनूमांश्च विभीषणः ॥ कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजी-

विनः ॥ ४ ॥ सप्तैतान्संस्मरेन्नित्यं मार्कंडेयम-
थाष्टमम् ॥ जीवेद्वर्षशतं साग्रमपमृत्युविवर्जितः
॥ ५ ॥ प्रह्लादनारदपराशरपुंडरीकव्यासांबरी-
षशुकशौनकभीष्मदाल्भ्यान् ॥ रुक्मांगदार्जु-
नवसिष्ठविभीषणादीन् पुण्यानिमान्परमभागव-
तान्स्मरामि ॥ ६ ॥ धर्मो विवर्धति युधिष्ठिर-
कीर्तनेन पापं प्रणश्यति वृकोदरकीर्तनेन ॥
शत्रुर्विनश्यति धनंजयकीर्तनेन माद्रीसुतौ कथ-
यतां न भवंति रोगाः ॥ ७ ॥ अहल्या द्रौपदी
सीता तारा मंदोदरी तथा ॥ पंचकं ना स्मरे-
न्नित्यं महापातकनाशनम् ॥ ८ ॥ कश्यपोत्रिर्भ-
रद्वाजो विश्वामित्रोथ गौतमः ॥ जमदग्निर्वसि-
ष्ठश्च साध्वी चैवाप्यरुंधती ॥ ९ ॥ विश्वेशो
जनको ह्युमा च जननी गंगा च मातृष्वसा
ढुंढीभैरवदंडपाणिसदृशा ज्येष्ठा मम भ्रातरः ॥

श्रीकाशी मणिकर्णिका च भगिनी भार्या ममेयं मतिः सत्कर्माणि सुतास्त एव सुहृदः काश्यां कुटुंबं मम ॥ १० ॥ काशि-काशीति-काशीति त्रिवारं यः पठेन्नरः ॥ सोऽपि देशांतरे वासी काशीवासफलं लभेत् ॥ ११ ॥ अशीवरुणयो-र्मध्ये पंचक्रोशी महत्फलम् ॥ अमरा मृत्युमिच्छ-न्ति का कथा इतरे जनाः ॥ १२ ॥ नंदिनी नलिनी सीता मालतीच मलापहा ॥ विष्णु-पादाब्जसंभूता गंगा त्रिपथगामिनी ॥ १३ ॥ भागीरथी भोगवती जाह्नवी त्रिजटेश्वरी ॥ द्वाद-शैतानि नामानि प्रातःकाले सदा पठेत् ॥ १४ ॥ अहं काश्यां गमिष्यामि तत्रैव निवसाम्यहम् ॥ इति ब्रुवाणः सततं काशी-वासफलं लभेत् ॥ १५ ॥ वाराणस्यां दक्षि-णेऽङ्गे कुक्कुटो नाम वै द्विजः ॥ तस्य स्मरणमा-

त्रेण दुःस्वप्नः सुखदो भवेत् ॥ १६ ॥ वारा-
णस्युत्तरे तीरे सुमंतुर्नाम वै द्विजः ॥ तस्य
स्मरणमात्रेण निर्धनो धनवान्भवेत् ॥ १७ ॥
काश्यां तु भैरवो देवः संसारभयनाशकः ॥
अनेकजन्मजं पापं स्मरणेन विनश्यति ॥ १८ ॥
विश्वेशं माधवं ढुंढिं दंडपाणिं च भैरवम् ॥
वंदे काशीं गुहां गंगां भवानीं मणिकर्णिकाम्
॥ १९ ॥ बलिर्विभीषणो भीष्मः प्रल्हादो
नारदो ध्रुवः ॥ षडेते वैष्णवाः प्रोक्ताः स्मरणं
पापनाशनम् ॥ २० ॥ हरिं हरं हरिश्चंद्रं हनू-
मंतं हलायुधम् ॥ एतेषां स्मरणात्प्रातर्हानि-
स्तस्य न बाध्यते ॥ २१ ॥ सोमनाथं वैज-
नाथं धन्वंतरिमथाश्विनौ ॥ एतेषां स्मरणात्प्रात-
र्व्याधिस्तस्य न बाधते ॥ २२ ॥ कपिलां
कामधेनुं च कल्पवृक्षं मणिं तथा ॥ समुद्रस-

हिता लक्ष्मीं कुबेरं संप्रपूजयेत् ॥ २३ ॥
नारायणेति वाग्वल्ली चतुरक्षरपल्लवा ॥ धर्मा-
र्थकाममोक्षाणां फलदा नात्र संशयः ॥ २४ ॥
यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ॥
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ २५ ॥
कराग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती ॥
करमूले तु गोविंदः प्रभाते करदर्शनम् ॥ २६ ॥
समुद्रवसने देवि पर्वतस्तनमंडिते ॥ विष्णुपत्नि
नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे ॥ २७ ॥ अनंतं
वासुकिं शेषं पद्मनाभं च कंबलम् ॥ शंखपालं
धृतराष्ट्रं तक्षकं कालियं तथा ॥ २८ ॥
एतानि नव नामानि नागानां च महात्मनाम् ॥
सायंकाले पठेन्नित्यं प्रातःकाले विशेषतः ॥
नश्येद्विषभयं तस्य सर्वत्र विजयी भवेत् ॥२९॥
कोणस्थः पिंगलो बभ्रुः कृष्णो रौद्रोऽतको यमः॥

सौरिः शनैश्चरो मंदः पिप्पलादेन संस्तुतः॥२०॥
एतानि दश नामानि प्रातरुत्थाय यः पठेत् ॥
शनैश्चरकृता पीडा न कदाचिद्भविष्यति ॥
॥ २१ ॥ सोरठीसोमनाथं च श्रीशैलं मल्लि-
कार्जुनम् ॥ उज्जयिन्यां महाकालमोंकारममले-
श्वरम् ॥ २२ ॥ परेल्यां वैजनाथं च डाकिन्यां
भीमशंकरम् ॥ सेतुबंधे तु रामेशं नागेशं दारु-
कावने ॥ २३ ॥ वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं
गौतमीतटे ॥ हिमालये तु केदारं घृष्णेशं तु
शिवालये ॥ २४ ॥ एतानि ज्योतिर्लिंगानि
प्रातरुत्थाय यः पठेत् ॥ ब्रह्महत्यादिकं पापं
महापातकनाशनम् ॥ २५ ॥ अहो भाग्य-
महो भाग्यं नंदगोपव्रजौकसाम् । यन्मित्रं
परमानंदं पूर्णब्रह्म सनातनम् ॥ २६ ॥ अयोध्या
मथुरा माया काशी कांची अवंतिका । पुरी

द्वारवती चैव सप्तैता मोक्षदायिकाः ॥२७॥अर्जुनः फाल्गुनो जिष्णुः किरीटी श्वेतवाहनः। बीभत्सुर्विजयी कृष्णः सव्यसाची धनंजयः ॥ २८ ॥ उत्तिष्ठोत्तिष्ठ गोविंद उत्तिष्ठ गरुडध्वज। उत्तिष्ठ कमलाकांत त्रैलोक्यं मंगलं कुरु ॥२९॥ पलायध्वं पलायध्वं रे रे दानवराक्षसाः। धर्मसंस्थापनार्थाय रथारूढो स्वयं हरिः ॥ ४० ॥

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटिसमप्रभ। निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ॥ ४१ ॥ गणनाथसरस्वतीरविशुक्रबृहस्पतीन्। पंचैतान्संस्मरेन्नित्यं वेदवाणीप्रवृत्तये ॥ ४२ ॥ गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात्परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ४३ ॥ यं ब्रह्मावरुणेन्द्ररुद्रमरुतस्तुन्वान्ति दिव्यैः स्तवैर्वेदैः सांगपदक्रमोपनिषदैर्गायन्ति यं सामगाः ॥ ध्यानावस्थित-

तद्गतेन मनसा पश्यन्ति यं योगिनो यस्यान्तं न विदुः सुरासुरगणाः देवाय तस्मै नमः ॥ ४४ ॥

या कुंदेंतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता ।
या वीणाकरदंडमंडितकरा या श्वेतपद्मासना ॥
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वंदिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ॥ ४५ ॥ ध्यायेदाजानुबाहुं धृतशरधनुषं बद्ध पद्मासनस्थं । पीतं वासो वसानं नवकमलदल-स्पर्धिनेत्रं प्रसन्नम् ॥ वामाङ्कारूढसीतामुखकमलमिलल्लोचनं नीरदाभं । नानालंकारदीप्तं दधतमुरुजटामंडनं रामचंद्रं ॥ ४६ ॥ ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं द्वंद्वातीतं गगन-सदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् । एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ ४७ ॥ शांताकारं भुजग-

शयनं पद्मनाभं सुरेशं विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभांगम् ॥ लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं । वंदे विष्णुं भवभयहरं सर्व-लोकैकनाथं ॥ ४८ ॥ मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् । यत्कृपा तमहं वंदे परमानंद माधवम् ॥ ४९ ॥ हे जिव्हे रससारज्ञे सर्वदा मधुरप्रिये । नारायणाख्यं पीयूषं पिब जिव्हे निरंतरम् ॥५०॥ गांग वारि मनोहारि मुरारिचरणच्युतम् । त्रिपुरारिशिरश्चारि पापहारि पुनातु माम् ॥ ५१ ॥ लाभस्तेषां जयस्तेषां कुतस्तेषां पराजयः । येषामिंदीवरश्यामो हृदयस्थो जनार्दनः ॥ ५२ ॥ न वासुदेवभक्तानामशुभं विद्यते क्वचित् । जन्ममृत्युजराव्याधिर्भयं नैवोपजायते ॥ ५३ ॥ आदौ रामतपोवनाधिगमनं हत्वा मृगं कांचनम् । वैदेहीहरणं जटायुमरणं सुग्रीव-संभाषणम् ॥ वालीनिर्दलनं समुद्रतरणं लंका-पुरीदाहनम् । पश्चाद्रावणकुंभकर्णहननं एतद्धि

रामायणम् ॥ ५४ ॥ आदौ देवकिदेवगर्भ-
जननं गोपीगृहे वर्धनम् । मायापूतनजीविताप-
हरणं गोवर्धनोद्धारणम् ॥ कंसच्छेदनकौरवादि-
हननं कुंतीसुतःपालनं । एतद्भागवतं पुराणक-
थितं श्रीकृष्णलीलामृतं ॥ ५५ ॥ नमो ब्रह्मण्य-
देवाय गोब्राह्मणहिताय च । जगद्धिताय कृष्णाय
गोविंदाय नमोनमः ॥ ५६ ॥ वसुदेवसुतं देवं
कंसचाणूरमर्दनम् । देवकीपरमानंदं कृष्णं वंदे
जगद्गुरुम् ॥ ५७ ॥ मंगलं भगवान्विष्णुर्मंगलं
गरुडध्वजं । मंगलं पुंडरीकाक्षो मंगलायतनं
हरिः ॥ ५८ ॥ कृष्णाय वासुदेवाय हरये पर-
मात्मने ॥ प्राणतक्लेशनाशाय गोविंदाय नमो
नमः ॥ ५९ ॥ अच्युतं केशवं रामनारायणं
कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम् ॥ श्रीधरं माधवं
गोपिकावल्लभं जानकीनायकं रामचंद्रं भजे ॥
इति प्रातःस्मरणं संपूर्णम् ॥

# भूपाळ्या.

## भूपाळी गणपतीची.

उठा उठा हो सकळिक ॥ वाचे स्मरावा गजमुख ॥ सिद्धिबुद्धीचा नायक ॥ मुख-दायक भक्तांसी ॥ १ ॥ आंगीं शेंदुराची उटी ॥ माथां शोभतो कीरिटी ॥ केशरकस्तूरी लल्लाटीं॥ हार कंठीं साजिरा ॥ २ ॥ कानीं कुंडलांची प्रभा ॥ चंद्रसूर्य जैसे नभा ॥ माजी नागबंदी शोभा ॥ स्मरतां उभा जवळी तो ॥ ३ ॥ कासे पीतांबराची घटी ॥ हातीं मोदकांची वाटी ॥ रामानंद स्मरतां कंठीं ॥ तो संकटीं पावतो ॥ उ० ॥ ४ ॥

# भूपाळी रामाची.

राम सर्वांगीं सांवळा ॥ हेमअळंकार पिंवळा ॥ नाना रत्नांचीया कळा ॥ अळंकार शोभती ॥ ॥ १ ॥ पिंवळा मुकुट कीरिटी ॥ पिंवळें केशर ल्लाटीं ॥ पिंवळ्या कुंडलांची धाटी ॥ पिंवळ्या कंठीं माळिका ॥ २ ॥ पिंवळा कांसे पीतांबर ॥ पिंवळ्या ब्रीदांचा तोडर ॥ पिंवळ्या घंटांचा गजर ॥ पिंवळ्या वांकी रुणझुणती ॥ ३ ॥ पिंवळें पदक करभूषण ॥ पिंवळें हातीं वीरकंकण ॥ पिंवळ्या मुद्रिकांचें लेणें ॥ पिंवळें करीं शरचाप ॥ ४ ॥ पिंवळा मंडप विस्तीर्ण ॥ पिंवळें मध्यें सिंहासन ॥ राम सीतालक्ष्मण ॥ दास गुण गातसे ॥ ५ ॥

## पद ( भूपाळी )

उठोनियां प्रात:काळीं । करूं नामाची आंघोळी । नाम सर्व पापें जाळी । टाळी विघ्न महादोष ॥ १ ॥ नाम वेदांचें हें गुज । नाम मोक्षाचें हें बीज । नामापरतें नाहीं दुजें । साधन आणिक संसारीं ॥२॥ नाम तारी भवसागरीं । नाम दुरितें दुरी करी । नाम विघ्नातें निवारी । वारी दुर्घट कळिकाळा ॥ ३ ॥ नाम काळा-च्चेंही काळ । नाम निर्मळ प्रांजळ । नाम ध्यावें सर्व काळ । **बोध गोपाळ** अहर्निशीं ॥ ४ ॥

## भूपाळी रामाची

उठोनियां प्रात:काळीं॥जपा रामनामावळी । स्वयें ध्यातो चंद्रमौळी । शैलबाळी समवेत

॥ ध्रु० ॥ राम योग्यांचें मंडण ॥ राम भक्तांचें भूषण ॥ राम धर्माचें रक्षण ॥ संरक्षण दासांचें ॥ १ ॥ रामें त्राटिका वधियेली ॥ रामें शिळा उद्धरिली ॥ रामें जानकी जिंकिली ॥ मुक्त केली गणिका ॥ २ ॥ रामें पाषाण तारिले ॥ रामें दैत्य संहारिले ॥ रामें बंध सोडविले ॥ सुखी केले सुरवर ॥ ३ ॥ रामें रक्षिलें भक्तांसी ॥ रामें सोडविलें देवांसी ॥ राम भक्तांचे मानसीं ॥ **रामदासीं** आनंद ॥ ४ ॥

## पद ( भूपाळी )

उठिं रे गोपाळा उघडीं स्वरूपलोचना । सरलि अविद्या राती उदय झाला रविकिरणा ॥ इंद्रियगोधनें नेई निर्गुणकानना । सुटलीं मानसवत्सें तुजविण नाकळती कोणा ॥ ध्रु० ॥ प्रबोध-पहांट झाली सरलें तिमिर तमरज । गुरु-

कृपेचा अरुण दावी सुरंगसम तेज ॥ आत्मा
दिनकर पाठीं प्रगटे तात्कालिक सहज । जित्र-
चंद्राचें मंडळ तेणें झालें निस्तेज ॥ १ ॥
दृश्याभास चांदणिया असते ठायिंच लोपलिया ।
लिंगदेहकमळींचे मधुकर सुटले आपसया ॥
बुद्धिबोद्ध चक्रवाकें मिनलीं आपणिया । देह-
बुद्धि कुमुदिनी सुकोनी गेलीसे विलया ॥ २ ॥
योगविद्येच्या पंथें साधकवृंदें चालियलीं । उप-
निषद्भागार्थशब्द केला कोकिळीं ॥ वाग्वादाचे
उलूक रिघती मौनाचे ढोलीं । विकल्प अटवी
साही चोरीं सांडियली ॥ ३ ॥ विरागरश्मी-
जवळी धरितां चित्त रविकांत । आत्मा वन्ही
प्रगटे विषयवन हें जाळित ॥ तृष्णेच्या श्वाप-
दावरी प्रळय अद्भुत । विश्व हें लटिकें मूढां
मृगजळवत ॥ ४ ॥ जारव्यसनीं जिव हा झाला

उदमी सुविचार । वासनाकुंटिणीचा सहजें खुंटला व्यापार ॥ लीलाविश्वंभरस्वामी उठिला सत्वर। चाले **मुक्तेश्वर** संगें धरोनियां कर ॥५॥

## भूपाळी रामाची

उठोनियां प्रातःकाळीं ॥ मूर्ति चिंतावी सांवळी ॥ शोभे योगियांचे मेळीं ॥ हृदय-कमळीं साजिरी ॥ ध्रु० ॥ राम सर्वांगीं सुंदर ॥ कासे शोभे पीतांबर ॥ चरणीं ब्रीदाचा तोडर ॥ करुणाकर भक्तांसी ॥ १ ॥ राम लावण्याचा राशी ॥ राम कैवारी देवांसी ॥ राम भक्तांचे मानसीं ॥ अहर्निशीं शोभतो ॥ २ ॥ राम पुण्याचें माहेर ॥ राम तापसां आधार ॥ राम ध्यातो गौरिहर ॥ निरंतर मानसीं ॥ ३ ॥ राम विश्रांतिचें स्थळ ॥ राम आनंद केवळ ॥ **रामदास** सर्व काळ ॥ चिंती वेळ ऐसाची ॥४॥

## पद ( प्रभाती )

जागिये कृपानिधान ग्यानराय रामचंद्र जननि कहे बार बार भोर भयो प्यारे ॥ राजिवलोचन विशाल पीत वापिका मराल ललित वदनकमल उपर मदन कोटि वारे ॥ अरुण उदित विगत शर्वरी शशांककिरन हीन दीन दीप ज्योति मलिन द्युतिसमूह तारे ॥ मनोज्ञान घनप्रकाश बीते सब भवविलास आश त्रास तिमिर तोष तरनि तेज जारे ॥ बोलत खगनिकर मुखर मधुर कर प्रतीत सुनो श्रवण प्राण जीवन धन मेरे तुम बारे ॥ मनोवेद बंदी मुनिवृंद सूतमागधादि विरद बदत जयजयजय जयति कैटभारे ॥ विकसित कमलावली चले प्रपुंज चंचरीक गुंजत कल मोकल धुनि त्याग कंजन्यारे ॥ मनो-

विराग पाय सकल शोककूप गृह विहाय भृत्य प्रेम मत्त फिरत गुणत गुण तिहारे ॥ सुनत वचन प्रिय रसाल जागे अतिशय दयाल भागे जंजाल विपुल दुःखकदंब टारे ॥ **तुलसिदास** अति आनंद देखके मुखारविंद छूटे भ्रम फंद परम मंद द्वंद्वभारे ॥ १ ॥

## भूपाळी श्रीकृष्णाची

उठीं गोपालजी जाइं धेनूकडे । पाहती सौंगडे वाट तूझी ॥ ध्रु० ॥ लोपली हे निशी मंद झाला शशी । मुनिजन मानसीं ध्याति तुजला ॥ १ ॥ भानु—उदयाचळीं तेज पुंजाळलें । विकसती कमळें जळामाजी ॥ २ ॥ धेनुवत्सें तुला वाहती माधवा । उठीं गा यादवा उशिर जाला ॥ ३ ॥ ऊठ पुरुषोत्तमा वाट पाहे रमा । दावि मुखचंद्रमा सकळि-

कांसी ॥ ४ ॥ कनकपात्रांतरीं दीपरत्नें बरीं । ओवाळिती सुंदरी तूजलागीं ॥ ५ ॥ जन्म-जन्मांतरीं दास होऊं हरी । बोलती वैखरी भक्त तूझे ॥ ६ ॥ कृष्ण केशव करीं चरणां-बुज धरी । ऊठ गा श्रीहरी मायबापा ॥ ७ ॥

## भूपाळी घनश्यामाची

घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला । उठि लवकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥ ध्रु० ॥ सायंकाळीं एके मेळीं द्विज-गण अवघे वृक्षीं । अरुणोदय होतांचि उडाले चरावया पक्षी ॥ अघमर्षणादि करुनि तापसी तपाचरणदक्षी । प्रभातकाळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्षी ॥ करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षीं । यमुनाजळासी जाति मुकुंदा दध्योदन भक्षीं ॥ चाल ॥ मुक्तता

होऊं पाहे कमळिणीपासुनियां भ्रमरा ॥ पूर्वे-
दिशे मुख धुतलें होतसे नाश तिमिरा ॥ उठिं
लवकरि गोविंदा सांवळ्या नंदकुमरा । मुख-
प्रक्षालन करीं अंगिकारीं भाकरकाला ॥ उठिं
लौकरि० ॥ १ ॥ घरोघरीं दीप अखंड त्यांच्या
सरसावुनि वाती । गीत गाति सप्रेमें गोपी
सदना येती जाती ॥ प्रवर्तोनि गृहकामीं रंगा-
वळी घालुं पाहती । आनंदकंदा प्रभात झाली
उठ सरली राती ॥ काढीं धार क्षीरपात्रें घेउनि
धेनू हंबरती । द्वारिं उभे गोपाळ हाका मारुनि
तुज बाहती ॥ चाल ॥ हे मुक्ताहार कंठीं घालिं
या रंगमाळा । हातीं वेत्रकाष्ठ बरवें कांबळा घेईं
काळा । मम आत्मज मधुसूदना हृषीकेशि जग-
त्पाळा । लक्षितातिं वासुरें हरी धेनुस्तनपानाला
॥ उठिं० ॥ २ ॥ प्रातःस्नानें करुनि गोपिका

अलंकार नटती । कुंकुमादि चर्चुनी मंथनालागीं आरंभिती ॥ प्रेमभरित अंतरांत वदनीं नामावळि गाती । अर्घ्यदान देउनियां द्विजगण देवार्चन करिती ॥ नेमनिष्ठ वैष्णव ते विष्णुपूजा समर्पिती । स्मार्त शिवार्चनसक्त शक्तितें शाक्त आराधिती ॥ चाल ॥ ऋषिगण आश्रमवासी जे कां निरंजनीं घाले । अरुणोदयकालीं आपुलाले ध्यानिं मग्न झाले ॥ पंचपंच उषःकाळीं रविचक्र निघों आलें । येवढा वेळ निजलासि म्हणुनि हरि समजेल नंदाला ॥ उठिं लौ० ॥ ३ ॥ विद्यार्थी विद्याभ्यासास्तव सादर गुरुपायीं । अध्यापन गुरु करिति शिष्यही अध्ययना उदयीं ॥ याज्ञिकजन कुंडांत आहुती टाकिताति पाहीं । रविप्रकाश पडुनियां उजळल्या शुद्ध दिशा दाही ॥ हे माझे पाडसे सांवळे उठ कृष्णाबाई ।

सिद्ध सर्वे बळराम घेउनि गोधनें वना जाई ॥ चाल ॥ मुनिजनमानसहंसा गोपीमनःकमल-भृंगा । मुरहर पंकजपाणी पद्मनाभ श्रीरंगा । शकटांतक सर्वेशा हे हरि प्रतापतुंगा । कोटि अनंगांह्लनि आगळें तेज तव वदनाला । **होनाजी बाळा** नित्य ध्यातसे हृदयिं नाममाळा ॥ ४ ॥

## भूपाळी कृष्णाची

गवळण दसवंती पैं सांगे । आलिया कृष्णा-चेनि मागें । येणें येणें वो श्रीरंगें । नव-नीत भक्षिलें माझें ॥ ध्रु० ॥ तळवे तळहात टेंकितो । डाव्या गुडघ्यानें रांगतो । रंगाणि रंगनाथ खेळतो । आजि म्यां देखिला सये ॥१॥ एके हातीं लोण्याचा कवळू । मुख माखिलेंसे अळुमाळू । चुंबन देतां अति परिमळू । नवनी-ताचा सये ॥ २ ॥ येणें माझें कवाड उघ-

डिलें । येणें माझें शिंकें कीं तोडिलें । दह्या दुधाचें भक्षिलें । लवंडिलें ताकाचें ॥ ३ ॥ ऐसें जरी मी जाणतें । यमुना पाण्या नव जातें । धरुनि उखळासी बांधित्यें । शिक्षा लावित्यें गोविंदा ॥ ४ ॥ ऐसा पुराणप्रसिद्ध चोर । केशव नाम्याचा दातार । पंढरपुरिं धरिला अवतार । भक्ता पुंडलिकासाठीं ॥ ५ ॥

## भूपाळी विठ्ठलाची

उठा उठा हो मुरारी । बोले रखुमाबाई सुंदरी । भक्त गर्जती महाद्वारीं । त्यांसी द्यावें दर्शन ॥ ध्रु० ॥ राउळीं जागे झाले हरी । भक्त गर्जती जयजयकारीं । नारद तुंबर कीर्तन करी । प्रेमानंदें डुल्लतसे ॥ १ ॥ सर्व पूजा तुळसीपान । घेउनि आले भक्तजन । द्यावें तयांसी दर्शन । विलंब कांहीं न करावा

॥ २ ॥ ऐसा उगवला दिनकर । भक्त गर्जेति जयजयकार । तेथें **गणेशनाथ** किंकर । हरिचरणांवर लोळतसे ॥ ३ ॥

## भूपाळी विठ्ठलाची.

ब्रम्ह निर्गुण निराकार । विठ्ठल सगुण संताकार । अवतरलें चराचर । परब्रह्म सांवळें ॥ ध्रु० ॥ विठ्ठल संतांचें रूपडें । प्रत्यक्ष पाहों नेत्रांपुढें ॥ त्यासी न जाणतां मूढें । विषयजाळीं गुंतलीं ॥ १ ॥ मुक्ताबाई सकळ तनू ॥ दीप्ती सांवळा तो भानू । प्रभावळी सर जगजीवनू । अतिलावण्य शोभतसे ॥ २ ॥ ज्ञानदेव मुखकमळ । निवृत्ति मुकुटाचा झळाळ । सोपान देव निढळ । आदिपुरुष रायाचें ॥ ३ ॥ मुकुंदराज तो अवधारीं । श्रवण देवाचे निर्धारीं ॥ चांगा विसोबा खेचरीं । स्वयंप्रकाश झळकतसे ॥ ४ ॥ वडवळसिद्ध नासापुट । कबीर नामा दोन्ही ओंठ ।

जिव्हा तोची मुद्गलभट । निंबा भाट गर्जतसे ॥ ५ ॥ बाहुदंड चोखामेळा । बहिरापिसा वक्षस्थळा । जगमित्र कंठनाळा ॥ जोगा माळा गळ्याची ॥ ६ ॥ हृदयानंद योगी जाण । अच्युता सारंग दोन्ही स्तन । हृदयीं रेणुकानंदन । नाभी नरसीमेहता ॥ ७ ॥ कान्हो पाठक कटिप्रदेश । मुधा पीतांबर सुरेश । चरणीं आले रोहिदास । सूरदास सातवा ॥ ८ ॥ नारा ह्मादा गोंदा विठा । या देवाच्या क्षुद्र घंटा । जनी वाकी वाळे वाजतां । तोडर **एका जनार्दनीं** ॥ ९ ॥

## श्लोक

प्रभाते मनीं राम चिंतीत जावा । पुढें वैखरी राम आधीं वदावा ॥ सदाचार हा थोर सोडूं नये तो । जनीं तोचि तो मानवीं धन्य होतो ॥१॥ घनःशाम हा राम लावण्यरूपी । महाधीर

गंभीर पूर्ण प्रतापी ॥ करी संकटीं सेवकांचा कुडावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥२॥ बळें आगळा राम कोदंडधारी । महाकाळ विक्राळ तोही थरारी ॥ पुढें मानवा किंकरा कोण केवा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥३॥ सुखानंदकारी निवारी भयातें । जनीं भक्तिभावें भजावें तयातें ॥ विवेकें तजावा अनाचार हेवा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ४ सदा राम-नामें वदा पूर्णकामें । कदां बाधिजे नापदा नित्यनेमें ॥महालस्य हा सर्व सोडूनि द्यावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ५ ॥ जयाचेनि नामें महादोष जाती । जयाचेनि नामें गती पावि-जेती ॥ जयाचेनि नामें घडे पुण्यठेवा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ६ ॥ न वेचे कदां ग्रंथिचे अर्थ कांहीं । मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं ॥ महाघोर संसार शत्रू जिणावा ।

प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ७ ॥ देहेदंड-
णाचें महा दुःख आहे । महा दुःख तें नाम घेतां
न राहे ॥ सदाशीव चिंतीतसे देवदेवा ।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ८ ॥ बहू-
तांपरी संकटें साधनांचीं । व्रतें दान उद्यापनें
तीं धनाचीं ॥ दिनाचा दयाळू मनीं आंठवावा।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥९॥ समस्ता-
मध्यें सार साचार आहे । कळेना तरी सर्व शोधूनि
पाहें ॥ जिवा संशयो वाउगा तो तजावा ।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ १० ॥ नव्हे
कर्म ना धर्म ना योग कांहीं । नव्हे भोग ना त्याग
ना सांग कांहीं ॥ ह्मणे **दास** विश्वास नामीं
धरावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ११ ॥

## सकाळच्या कांकड आरत्या.

उठा उठा साधुसंत । साधा आपुलालें हित ।
जाइल जाइल हा नरदेह । मग कैंचा भगवंत ॥ १ ॥

उठोनियां वेगेंसीं । चला जाऊं राउळासी । जळती पातकांच्या राशी । कांकडआरती देखिलिया ॥ २ ॥ उठा उठा हो पांहटे । विठ्ठल पहावा उभा विटे। चरण तयाचे गोमटे । अमृतदृष्टीं अवलोका ॥ ३ ॥ जागें करा रुक्मिणीवरा। देव आहे निदसुरा । जिवें निंबलोण करा । दृष्ट होईल तयासी ॥ ४ ॥ पुढें वाजंत्रें वाजती । ढोल दमामे गर्जती । होती कांकड आरती । माझ्या पंढरिरायाची ॥ ५ ॥ सिंहनाद शंख भेरी । गजर होतो महाद्वारीं । केशवराज विटेवरी । **नामा** चरण वंदितो ॥ ६ ॥

## २ कांकडआरती

उठा सकळ जन उठले नारायण । आनंदले मुनिजन तिन्ही लोक ॥ १ ॥ करा जयजयकार वाद्यांचा गजर । मृदंग विणे अपार टाळ घोळ ॥ २ ॥ जोडूनि दोन्ही कर मुख पहा

सादर । पायांवरी शिर ठेवुनियां ॥ ३ ॥ **तुका** ह्मणे काय पढियंतें तें मागा । आपुलालें सांगा सुखदुःख ॥ ४ ॥

## ३ कांकडी आरती.

भक्तीचीये पोटीं बोधकांकडा ज्योती । पंचप्राण जीवेंभावें ओवाळूं आरती ॥ १ ॥ ओवाळूं आरती माझ्या पंढरीनाथा । दोन्ही कर जोडुनि चरणीं ठेविला माथा ॥ २ ॥ काय महिमा वर्णूं आतां सांगणें तें किती । कोटी ब्रह्महत्या मुख पाहतां जाती ॥ ३ ॥ विटेसहित पाउलें जिवें भावें ओवाळूं । कोटि रविशशि जैसे उगवले हेळू ॥ ४ ॥ राई रखुमाबाई दोघी उभ्या दों बाहीं । मयूरपिच्छचामरें ढाळिती ठाईंच्या ठाईं ॥ ५ ॥ **तुका** ह्मणे दीप घेउनि उन्मनीत शोभा । विटेवरी उभा जैसा लावण्यगाभा ॥ ६ ॥

# नित्यपाठ भजनमाला

भाग २ रा

## भजन

जयजय रामकृष्ण हरी ।

सांवळ्या रामकृष्ण हरी ॥

## अभंग

विश्वाचा चालक सूत्रधारी एक । विज्ञान व्यापक ज्ञानगम्य ॥१॥ तें रूप साजिरें कृष्ण घनश्याम । योगियां परम जप ज्याचा ॥ २ ॥ शिव शिवोत्तम नाम आत्माराम । जनवन सम गोपवेषें॥३॥ निवृत्ति चालक सर्वत्र व्यापक । आपरूपें एक सर्वत्र असे ॥ ४ ॥

## पद

पतितपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा ।
पतितपावन न होसि म्हणुनी जातों माघारा ॥ध्रु.॥
सोडीं देवा ब्रीद आतां न होसि अभिमानी ।
पतितपावन नाम तुजला ठेवियलें कोणी ॥ १॥
घेसी तेव्हां देसी ऐसा असशी उदार ।
काय देवा रांधूं तुमचें कृपणाचें द्वार ॥ २ ॥
उच्छिष्टाचें शीत न देवा टाकिसि बाहेरी ।
कोणी दिधली भगवंत तुला भूषणाची थोरी ॥ ३॥
हातीं घेउनि झांगडझेंगा फिरेन त्रैलोक्यीं ।
पतितपावन न होसि हरि तूं मोठा घातकी ॥४॥
**नामा** ह्मणे बा तुमचें न लगे मज काय ।
प्रेम असों द्या हृदयीं तुमचे आठवीन पाय ॥५॥

## अभंग

त्रिभंग देहुडा ठाण मांडूनियां सये ।

दा. क्र. १८८५

कल्पद्रुमातळीं वेणु वाजवितो आहे ॥ १ ॥
गोविंदु गे माय गोपाळू गे ।
साबाह्य अभ्यंतरीं अवघा परमानंदू गे ॥ ध्रु.॥
सांवळें सगुण सकळां जीवांचें जीवन ।
घनानंद मूर्ति पाहतां हारपलें मन ॥ २ ॥
शून्य स्थावर जंगम व्यापुनि राहिला अकळ ।
बाप रुक्मादेवीवरू विठ्ठल सकळ ॥ ३॥

## पद

ऐसें वाटतें मनासि माझ्या उडोनि जावें ते ठायीं । आवळुनि कवळुनि हृदयिं धरावें भेटावें त्या लवलाहीं ॥ लक्ष मंजऱ्या तुळसीमाळा मणभर बुक्का सखेबाई । अर्पण करुनी वेळोवेळां मस्तक ठेवावें हरिपायीं ॥ १ ॥
नाहिं मनाला धीर ग बाई भेटीसाठीं जिव झुरतो । शिणती डोळे अश्रु वाहती जिव

माझा निघुंनिघुं पाहतो ॥ आषाढीचा सोहळा मोठा संतमेळा किं ग मिळतो । गरुडपारीं नामकडाका गजर मोठा गर्जतो ॥ २ ॥ मिळालिं यांत्रा अपरंपार गर्दि मोठि दर्शनाची । माय बहीण विठाबाई कधिं भेटेल पंढरपुरची॥निढळा-वरती हात ठेवुनी वाट पाहतें केंव्हांची । माय बहीण विठाबाई कधिं भेटेल पंढरपुरची॥ ध्रु.॥ एकिमेकिचा हात धरोनी प्रदक्षिणेला बाइ जावें । लोटांगण घालुनी आनंदें रंगशिळेवरि नाचावें॥ वाळवंटावरि उडति पताका कौतुक डोळ्यांनीं पहावें । वेणूनादें खडकावरती गोडी घ्यावी काल्याची ॥ माय बहीण विठाबाई कधिं भेटेल पंढरपुरची ॥ ३ ॥ पंढरपुर वैकुंठ वसविलें भूमंडळिं ऐसें नाहीं । हाकेसरशीं धाउनि येती भेटे विठोबा रखुमाई ॥ **नाथ नरहरी** ह्मणे

महिपती हा भरला सर्वां ठायीं । सद्गुरुकृपेनें ओळखुनि ध्यावा हा विठ्ठल आपुले हृदयीं ॥ प्रेमळ कीर्तन भक्त करिती आवड ज्याला नामाची ॥ माय बहीण विठाबाई कधिं भेटेल पंढरपुरची ॥ ४ ॥

## अभंग

येईं गे विठ्ठले विश्वजीवनकळे । सुंदर घननीळे पांडुरंगे ॥ १ ॥ येईं गे विठ्ठले करुणाकल्लोळे । जीव कळवळे भेटावया ॥ २ ॥ नलगती गोड आणिक उत्तरें । तुझें प्रेम झुरें भेटावया ॥ ३ ॥ तुका ह्मणे धांव घालीं कृष्णाबाई । क्षेम चहूं बाहीं देईं मज ॥ ४ ॥

## पद

या मनाचा काम पुरविता राम जगाचा स्वामी । नाम गातां श्यामसुंदर प्रगटे अंतर्यामीं ॥ ध्रु० ॥

वाम जानुवरि जानकी शोभे वामलोचना साजे ।
काममनोहर मूर्ति जगन्मय धाम सुखाचें गाजे
॥१॥ भला जन्म लाधला गड्यांनों चला अयोध्ये
जाऊं । न लाभ याहुनि मला वाटतो कला-
कुशल हरि गाऊं ॥ २ ॥ थाट शोभतो कीर्तन-
गजरें दाट समूह संतांचा । वाट फुटेना गांठुनि
ध्याया ब्रह्मानंदाचि साचा ॥ ३ ॥ **विष्णु कृष्ण**
**जगन्नाथ** सदा प्रेमळ भक्तजनाचा । अखंड
भजनीं तो दिनरजनीं लंपट निजनामाचा ॥४॥

## श्लोक

बर्हापीठाभिरामं मृगमदतिलकं कुंडलाक्रांत
गंडम् । कंजाक्षं कंबुकंठं विकासितवदनं सादर-
न्यस्तवेणुम् ॥ श्यामं शार्ङ्गं त्रिभंगं सदरुणवदनं
भूषितं वैजयंत्या । वंदे वृंदावनस्थं युवतिशतवृतं
ब्रह्म गोपालवेषम् ॥

## अभंग.

प्रपंच असत्य कळों आला जया । विषय हे तया नावडती ॥ १ ॥ उदासीनापरी वर्ततो प्रपंचीं । आशा हे मनाची सांडोनियां ॥ २ ॥ मनाचा स्वभाव संकल्प विकल्प । होय साक्षीरूप तयांचाही ॥३॥ बुद्धीचा निश्चय अनुसंधानीं चित्त । अहंकारीं हेत अहंतेचा॥४॥ सर्वही मायिक व्यवहार जाणती । निश्चय अद्वैतीं ठेवुनियां ॥ ५ ॥ बहेणी म्हणे माया सत्य ना असत्य। श्रीगुरूनें तथ्य सांगितलें ॥६॥

## पद

दत्तात्रय अवधूता। जनार्दनस्वामी एकनाथा गुरू दत्तात्रय ॥ ध्रु० ॥ दत्त अवधूत, अवधूत निराकार । स्मरणीं पावे सत्वर ॥ शुद्ध अवि-नाश, अविनाश सुंदर । स्वरूप हें दिसे मनो-

हर ॥ पतित मी पापी, पापी दुर्धर । नेइं तूं भवसिंधू पार ॥ मागणें हेंचि, हेंचि सत्वर । मस्तकीं ठेविं अभयकर ॥ सगुण हें रूप, रूप दाविं आतां ॥ जनार्दनस्वामी एकनाथा ॥ गुरुदत्तात्रय ॥१॥ मुख्य निवास, निवास मेरुशिखरीं । समाधी निद्रा माहुरीं॥स्नान सारिलें,सारिलें गंगातीरीं । टिळक रेखिला पंढरी ॥ माध्यान्ह भिक्षा, भिक्षा करवीरीं । भोजन केलें कावेरी ॥ सायंसंध्या, संध्या सागरीं । मुख्य आसन केदारीं॥ जाउनी चरणीं, चरणिं ठेउं माथा ॥ जनार्दनस्वामी एकनाथा ॥ २ ॥ भस्मभूषित, भूषित दिव्य कांती । माळा त्रिशूल डमरु हातीं ॥ गळां वनमाळ, वनमाळ वैजयंती । कर्णिं कुंडलें सूर्यदीप्ति ॥ माथां मुकुट, मुकुट चंद्रज्योती । पाहतां वेधली मनोवृत्ति ॥ आकर्ण नयन, नयन मदनमूर्ती ।

वर्णितां मौनावल्या श्रुती ॥ तेथें मी पामर कार्य वर्णुं आतां ॥ जनार्दन स्वामी एकनाथा ॥ ३ ॥ अत्रि अनसूया, अनसूयात्मज दत्त । त्रिगुण अवतार मूर्तिमंत ॥ कटीं मेखळा, मेखळा रत्नजडित । चरणिं नेपुरें रुणझुणित ॥ प्रसन्न हें वदन,वदन हर्षयुक्त । तारिले पतित असंख्यात॥ अखंड हें नाम, नाम वदनांत । मूर्ति मम बिंबलि हृदयांत ॥ अभय वर देईं, देईं गुरुनाथा ॥ जनार्दन स्वामी एकनाथा ॥ ४ ॥ लक्ष चौऱ्यांशीं चौऱ्यांशीं जन्म वायां । म्या भोगिले गुरूराया ॥ भक्तवत्सला, वत्सला दत्तराया । करावी कृपेची छाया ॥ इच्छितों हेंची,हेंची गुरुसखया । निरसीं शुद्ध भ्रममाया ॥ मागणें हेंची, हेंची गुरुसदया । न्यावें मातें निजठाया ॥ **कृष्णात्मजातें**, आत्मजातें तारीं आतां ॥ जनार्दनस्वामी एकनाथा ॥ गुरू दत्तात्रय ॥ ५ ॥

## अभंग

अनुताप हा अग्न लागला अंतरीं । आतां कृपा करीं जगन्नाथा ॥ १ ॥ तापत्रयें फार पीडिलें शरीर । नलगे संसार स्वर्ग तोही ॥ २ ॥ पडलीं इंद्रियें धडाडीत अंगें । कृपा करीं वेगें पांडुरंगा ॥ ३ ॥ **बहेणी** ह्मणे सुख तेंचि झालें दुःख । ऐसा हा विवेक संचरला ॥ ४ ॥

## पद

ऐसो को उदार जगमाहीं । विन सेवा जो द्रवै दीनपर रामसरिस कोउ नाहीं ॥ जो गति योग विराग जतनकर नहि पावत मुनि ज्ञानी । सो गति देत गीध शबरीको प्रभु न बहुत जिय जानी ॥ जो संपति दशशीस अर्प कर रावण शिव पै लीनी । सो संपदा बिभीषणको अति सकुच सहित हरि दीनी ॥ **तुलसिदास** सब

भांति सकल सुख जो चाहत मन मेरो । तो भज राम काम सब पूरण करै कृपानिधि तेरो ॥

## अभंग

चालतां पाउलीं पंढरीच्या वाटे । ब्रह्मसुख भेटे रोकडेंचि ॥ १ ॥ दिंडी ध्वजाभार चालती अपार । मृदंग गंभीर स्वर देती ॥ २ ॥ हमामा हुंबरी घालिती परवडी । होउनी उघडी विष्णुदास ॥ ३ ॥ **बहेणी** ह्मणे ऐसा आनंद वाटेचा । कोण तो दैवाचा देखे डोळां ॥ ४ ॥

## पद देस-दादर

दाखविं तव दिव्य पाय दयानिधे रामा ॥ ध्रु. ॥
हीन दीन आस तुझी कास पूर्ण आह्मा । धरावया पाहतसें अगा घनश्यामा ॥ १ ॥
मायबाप बंधु गोत्र मित्र तूंचि आह्मा । तुज-

वीण कोण असे सांग सख्या रामा ॥२॥ सखया आनंदतनय ह्मणे गुणग्रामा । शीणभाग हरीं त्वरें पुसोनियां घामा ॥ २ ॥

## अभंग

न्हे करणीची आहांच । जीवें पायीं जडलों साच ॥ १ ॥ आतां टाकिलें करावें । शरण केशवासी जावें ॥ २ ॥ देउनि प्रपंचासी फांटी । पाय तुझे धरिले कंठीं ॥ ३ ॥ वैरी गांजिती छळिती । परि हे तुझे पाय चित्तीं ॥४॥ नखीं देती जरी सुया । तुज न सोडीं देवराया ॥ ५ ॥ जरी केलासी साह्यकारी । वहेणि ह्मणे दया करीं ॥ ६ ॥

## भजन

निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम ॥

## पद

रामकृष्ण नरहरे,स्वामिन् रामकृष्ण नरहरे। काधिं करिशिल बा दया दयाळा गर्भवास हा पुरे ॥ ध्रु. ॥ काय करूं मी बरें सांगा, काय करूं मी बरें। कळों येति मज माझे दोष गुण चित्त परी नावरे ॥ १ ॥ विषयीं मन नावरे, सदोदित विषयीं मन नावरे। कामक्रोध हे चोर लुटिति मज प्राण होति घाबरे ॥ २ ॥ धांव धांव धांव रे, सत्वर धांव धांव धांव रे। बुडतो भवसागरीं दीन हा उद्धरिं अपुल्या करें ॥ ३ ॥ विचार मज न स्फुरे, कांहीं विचार मज न स्फुरे। केवीं गति होईल ह्मणुनियां जिव हा अंतरिं झुरे ॥ ४ ॥ प्रार्थितसें आदरें, अतां एक प्रार्थितसें आदरें। असें करीं तव नाम निरंतर पंत **विठ्ठल** स्मरे ॥ ५ ॥

## अभंग

माझिया रे मना सखया सज्जना । ऐक तूं प्रार्थना विनवीतसें ॥ १ ॥ सांडीं हें मीपण अहंतालक्षण । निवांत आपण सुखी राहें ॥२॥ किती वणवण करिसी भ्रमण । व्यर्थ वायां-वीण श्रम देहीं ॥ ३ ॥ मायामृगजळापाठीं कां लागसी । कष्ट कां भोगिसी चौऱ्यांशींचे ॥ ४ ॥ येणें काय हित घडों पाहे तुज । धरीं कांहीं लाज सज्जनांची ॥ ५ ॥ बहेणि म्हणे गेले संत जया वाटां । पावले ते निष्ठा सुख-रूप ॥ ६ ॥

## पद

ऐका हो अद्भुत देणें त्या एका भगवंताचें ॥ ध्रु. ॥ नेणें पूजा नेणें सेवा । शरणागत मी आलों देवा । म्हणतां देउनियां निज खेवा ।

दिधलें स्थान सौम्याचें ॥ १ ॥ केवळ मुग्धांचिये घाटी । आळी घेतां दुग्धासाठीं । दिधली क्षीराब्धीची वाटी । बाळक धालें विप्राचें ॥ २ ॥ उंचीं बैसायाच्या काजा । निवतां विपिना गाजावाजा । केला अढळपदींचा राजा । निरखी अजूनि जन सारे ॥ ३ ॥ भेटी नेले पोहे मुष्टि । तेणें देवा झाली तुष्टी । आली सौभाग्यासी पुष्टी । झालें कल्याण दुबळ्याचें ॥ ४ ॥ बोले **आनंदाचा बाळ** । होती मुक्याचे वाचाळ । पांगुळे लंघिति पर्वतमाळ । होइल पीयूष विखाचें ॥ ५ ॥

## अभंग

दुसरियाचे दुःखें शिणे ज्याचें चित्त । तोचि एक संत ओळखावा ॥ १ ॥ तयासी पुसतां हरील तो शीण । दुःख घे हिरोन रोकडेंची ॥ २ ॥

परोपकार जया आलासे विभागी । शांती हे सर्वांगीं डोलतसे ॥ ३ ॥ बहेणि ह्मणे नाहीं आपुलें पारिखें । वर्तती विवेकें ज्ञानदृष्टी ॥ ४॥

## पद

तुज काय ह्मणावें आह्मी । दयाळू नाथ जगाचा तूं स्वामी ॥ध्रु०॥ पावन ब्रीद तुझें गा कंसारी । वेद गर्जती चारी ॥ पतित तारिले त्वां बहु भारी । गजगणिका व्यभिचारी ॥ ऐकुनि कीर्ति तुझी बा पुतनारी । शरणागत मी द्वारीं ॥ आलों ठेविं मला निजपदपद्मीं ॥ तुज० ॥ १ ॥ आधीं पल्लविं उचलुनियां घ्यावें । मग परतें लोटावें ॥ दिसतें उचित हें का बरवें । कृपाघना बोलावें ॥ दास तुमचा जगीं ह्मणवावें । तेणें विलया जावें ॥ नवल वाटतें अंतर्यामीं ॥ तुज० ॥ २ ॥ कृपासागरा श्रीगोपाळा । कृष्णा त्रिभुवनपाळा ॥

पांडवपाळका जी घननीळा । नंदयशोमतिबाळा ॥ झालें मानस हें अति विकळा । तव विहाग्नि-ज्वाळा ॥ दुःखित झालें मी बहुत श्रमी ॥ तुज० ॥ ३ ॥ विश्वोद्धारका गुरुगोविंदा । किति भोगावी आपदा ॥ सरली आयुष्याची मर्यादा । काळें काढिल्या फरदा ॥ अजुनि दया येइना का मर्दा । बोल परमानंदा ॥ रतला **देवनाथ** प्रभु या नामीं ॥ तुज० ॥ ४ ॥

## अभंग

संचिताचे पुरें वाहावलें होतें । नाम हें अवचितें सांपडलें ॥ १ ॥ धरुनी आधार निघालें बाहेरी । झालासी कैवारी पांडुरंगा ॥ २ ॥ अविद्येच्या डोहीं होतें मी बुडालें । नाम तुझें झालें तारूं मज ॥ ३ ॥ **बहेणि** ह्मणे भ्रमभंवरिया आंत । जातां जीव तेथ नाम आलें ॥ ४ ॥

# धांवा

कृष्णा धांव रे लवकरी । संकट पडलें भारी ॥ हरि तूं आमुचा कैवारी । आलें विघ्न निवारीं ॥ ध्रु० ॥

पांडव असतां वनवासी । कळलें कौरवांसी ॥ त्यांनीं पाठविले हे ऋषि । सत्व हरायासी ॥१॥

साठी सहस्त्र खंड्या अन्न । दुर्वासभोजन ॥ सत्व जातील घेऊन । अंतर पडतां जाण ॥ २ ॥

रात्र जाहलीसे दोन प्रहर । आले ऋषीश्वर ॥ भोजन मागती सत्वर । कैसा करूं विचार ॥३॥

आज कां निष्ठुर जाहलासी । कोठें गुंतलासी ॥ माझी होइल बा गत कैसी । अनाथ मी परदेशी ॥४॥

आतां न लावीं उशीर । धर्म चिंतातुर ॥ अनर्थ करील तो फार । एवढा करिं उपकार ॥५॥

कंठ शोषला अनंता । प्राण जाइल आतां ॥ पदर पसरितें तुज ताता । पावें रुक्मिणीकांता

॥ ६ ॥ ऐकुनि बहिणीची करुणा । आला यादवराणा ॥ द्रौपदी लोळतसे हरिचरणा ॥ उद्धव चिद्धन जाणा ॥ ७ ॥

## भजन

रुक्मिणी सारंगधर सीतापति रघुवीर राधे [illegible]दा । सांवळ्या आनंदकंदा ॥

## अभंग

कर्माचिये सर्पें डंखियेलें मज । धांव चतुर्भुज गारोडिया ॥ १ ॥ पहातोसी काय जीवहत्या शिरीं । पडेल निर्धारीं पांडुरंगा ॥ २ ॥ विषयवाघुरे सांपडलें आंत । कामाग्निही तेथ साह्य झाला ॥ ३ ॥ बहेणि ह्मणे व्याधें करुनि सिद्ध बाण । लाविला निर्वाण पाहूं नको ॥ ४ ॥

## पद

येउं दे दया, दया देवदेवा । शरण मी तुला वासुदेवा ॥ ध्रु० ॥ गुंतलों माया, मायामोह-पाशीं । जीव दुःखित बहु परदेशी ॥ कशी गत करूं, करूं हृषीकेशी । प्राण घाबरा कधीं येशी ॥ आज कीं उद्यां, उद्यां किंवा परवां । शरण मी तुला वासुदेवा १ ॥ कमल-लोचना, लोचना कनकवसना । कर्ममोचना गरुड वहना ॥ पतितपावना, पावना जी मनमोहना । कशी तुज नये माझि करुणा ॥ दीन मी नेणें, नेणें भक्तिभावा ॥ शरण मी तुला वासुदेवा ॥ २ ॥ कुंदर द्युती, द्युती मंदहासा । दीनबांधवा श्रीनिवासा ॥ विश्वजीवना, जीवना काय ऐसा । किति मज-वरिशीं धरिसि आळसा ॥ वर्णुं मी किती, किती,

कीर्ति केशवा । शरण मी तुला वासुदेवा ॥ ३ ॥ पतित तारिले, तारिले बहु भारी । कीर्ति ऐकुनि आलों द्वारीं ॥ रमानायका, नायका जी कंसारी। पतित एवढा भव भारी ॥ कीर्ति यशध्वजा, ध्वजा आजि उभवा । शरण मी तुला वासुदेवा ॥ ४ ॥ भक्ति बाहतों, बाहतों हरी तुजला । कदा बससी ना बा उगला ॥ येसि धाउनी; धाउनी कसा प्याला । मिराबाईस्तव विषप्याला ॥ माझि कां नये, नये सख्या कणवा । शरण मी तुला वासुदेवा ॥ ५ ॥ चिरें पुरवुनी, पुरवुनी सत्य साची । लाज रक्षिलि त्वां भगिनीची ॥ होसी माउली, माउली निज दासांची । चित्सागरा दयावीची ॥ लोटीं मजवरी, मजवरि दे निज विभवा । शरण मी तुला वासुदेवा ॥ ६ ॥ स्वामी सद्गुरू, सद्गुरू श्रीगोविंदा । तोडिं हे मायिक

अघआपदा ॥ होउं नेदिं या, नेदिं या ज्ञान-गर्वा । शरण मी. तुला वासुदेवा ॥ ७ ॥ प्रार्थितों अती, अती विनित भावें । श्रवण देवोनि ऐकावें॥कृपासागरा, सागरा त्वरित यावें। देवनाथासि अपंगावें ॥ दीन आपुला, आपुला ह्मणवा । शरण मी तुला वासुदेवा ॥ ८ ॥

## अभंग

ये ग ये ग विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥१॥ भीमा आणि चंद्रभागा। तुझ्या चरणींच्या गंगा ॥ २ ॥ इतक्यांसहित त्वां बा यावें। माझे रंगणीं नाचावें ॥ ३ ॥ माझा रंग तुझे गुणीं । ह्मणे नामयाची जनी ॥ ४ ॥

## पद

धांव पाव सांवळे विठाबाई कां मनिं धरिली

अढी । अनाथ मी अपराधी स्मरतों उतरा पैल-
थडी ॥ ध्रु. ॥ एकनाथा घरिं पाणी वाहिलें
गंगेच्या कावडी । कबिराचे ते शेले विणुनी
त्यांची घालिसि घडी ॥ १ ॥ सांवता माळ्याची
भाजी खुटुनी त्याची बांधिसी जुडी । नरसी
मेहत्याची हुंडि पटवुनी त्याचा झालासि गडी
॥ २ ॥ जनाबाईचीं लुगडीं धुतलीं चंद्रभागेच्या
थडी । सजन कसाई मांस विकितो त्याचि
लाविसी धडी ॥ ३ ॥ दामाजीपंताचे वेळीं महार
झाला तांतडी । पायिं वाहणा हातीं काठी
खांद्यावर घोंगडी ॥ ४ ॥ चोखामेळ्याचे घरीं
येउनि ओढिसी ढोरें तांतडी । त्याची स्त्री बहु
हाका मारी कोठें दिधली दडी ॥ ५ ॥ गजेंद्राचा
धांवा ऐकुनि वेगें घालिसि उडी । अर्जुनरथिं
सारथ्य करुनियां फेडि त्याचिं सांकडीं ॥ ६ ॥

## भजन

हेंचि मागतों तुला विठोबा चरणीं ठाव दे मला ॥

## अभंग

आणिक साधनीं नको गुंतूं मना । धरीं या चरणा बिठोबाच्या ॥ १ ॥ वाउगा बोभाट कासया खटपट । पंढरीची वाट सोपी बहू ॥ २ ॥ **एका जनार्दनीं** काया वाचा मनें । सतत राहणें संतांपायीं ॥ ३ ॥

## पद

तुजला मी शरण श्रीपादराज । बुडतों भवसिन्धूमाजी तारीं तारीं राखीं लाज ॥ ध्रु. ॥ भोगियलें सुखदुःख । पापपुण्य करोनियां । नाना योनि हिंडोनियां । नरतनु आलों आज ॥ तुजला० ॥ १ ॥ दीपपतंगाचे परी । संसाराची प्रीती भारी । तव भक्ति टाकोनियां । विषयाचें

करिं काज ॥ तुजला० ॥ २ ॥ तापत्रय वह्‌-वाग्नीनें । पोळलों मी नरहरी । **कृष्णदास** दीनावरी । कृपा करीं महाराज ॥ तुजला० ॥३॥

## अभंग

माझी कोण गती सांगा पंढरीनाथा । तारिसी अनाथा केव्हां मज ॥ १ ॥ मनापासू-नीया सांगा मजप्रती । पुसें काकुळती जीवा-चिया ॥ २ ॥ न बोलसी कां रे धरिला अबोला । कोणासी विठ्ठला शरण जाऊं ॥ ३ ॥ कोणासी सांकडें घालावें हें सांग । नको धरूं राग दीनावरी ॥ ४ ॥ बाळकासी जैशी एकची ते माय । तैसे तुझे पाय मजलागीं ॥ ५ ॥ **नामा** ह्मणे देवा अनाथाच्या नाथा । कृपाळुवा कांता रखुमाईच्या ॥ ६ ॥

## पद

कां रे अनाथबंधु येवढें कां केलें निर्वाण । किती अंत पाहशील माझा कंठिं राहिला प्राण ॥ ध्रु ॥ ब्रह्मादि वंदिती पाय तूं त्रैलोक्याचा धनी । तुझा मी ह्मणवितों मजसी चिंतेची कांचणी ॥ १ ॥ सुवर्णाची लंका नेउनि दिधली शरणागता । जगदीश जगन्नायका तुझी कळिकाळावर सत्ता ॥ २ ॥ कामधेनु कल्पतरु क्षीरसागर तुजपाशीं । वितभर पोटासाठीं तोंड वासूं कवणासी ॥ ३ ॥ मुक्तिच्या माहेरा ऋद्धि सिद्धी तुझ्या दासी । क्षीरार्णवा रंक मालो मरतो उपवासी ॥ ४ ॥

## अभंग

सर्व सुख आहे भीवरेचे तीरीं । आमची पंढरी कामधेनू ॥ १ ॥ प्रेमामृत दुभे सदां

संतजनां । वोसंडत पान्हा नित्य नवा ॥ २ ॥ धर्म अर्थ काम मोक्ष चारी स्तन । दोहणार धन्य पुंडलीक ॥ ३ ॥ भक्तीचें मेळवण भावाचोनि बळें । देखोनिया वोळे अधिकाधिक ॥४॥ जियेचें दुभतें नित्य नवें वाढे । पंढरी पहुडे पूर्व पुण्यें ॥५॥ भाग्यवंत नामा तें क्षीर लाधला । प्रेमें वोसंडला गर्जे नामें ॥ ६ ॥

## पद

भक्तांचिया काजासाठीं साधूंचिया प्रेमासाठीं सोडिली मी लाज रे ॥ ध्रु० ॥ सुयोधना रागावलों । विदुराच्या गृहा आलों । आवडीनें कण्या प्यालों । जोंधळ्याची पेज रे ॥ १ ॥ धुतो अर्जुनाचे घोडे । सदां राहें मागें पुढें । झाडीं अंगणींचे खडे । बांधोनियां माज रे ॥२॥ शुद्ध निरंजनवासी । तो मी आलों आकारासी । पडि-

यलों प्रेमपाशीं । दशाकृति काज रे ॥ ३ ॥ वेढ
गौळियांची पोरें । त्यांचें ताक प्यालों बा रे
खातां भिल्लीणीची बोरें । उच्छिष्टाची चोज रे ।
४ ॥ पूर्णब्रह्म ह्मणती मातें । सर्वब्रह्म मीच
त्यातें ॥ ऐसियासी जाणीव ते । धरी **अमृतराज**
रे ॥ ५ ॥

## अभंग

काय माझा आतां पाहातोसी अंत । येईं बा
धांवत देवराया ॥ १ ॥ तुजवीण होईल जीवासी
आकांत । येईं बा धांवत देवराया ॥ २ ॥ असे
जरी काम भेटोनियां जावें । धांवोनियां यावें देव-
राया ॥ ३ ॥ ये रे ये रे देवा **नामा** तुज बाहत।
येईं बा धांवत देवराया ॥ ४ ॥

## पद

तूं माझा यजमान रामा ॥ ध्रु० ॥ जननीजठरीं

रक्षियलें मज । पोसुनि पंचप्राण ॥ १ ॥ बाहेर निघतां मातेचे स्तनीं । पय केलें निर्माण ॥ २ ॥ ऐसें असतां या पोटाची । कां करुं चिंता जाण ॥ ३ ॥ **मध्वमुनीश्वर** स्वामी रमापति । धरिं माझा अभिमान ॥ ४ ॥

## अभंग

हेंचि सुख पुढें मागतों आगळें । आनंदाचीं फळें सेवादान ॥ १ ॥ जन्मजन्मांतरीं तुझाचि अंकिला। करुनि विठ्ठाला दास ठेवीं ॥ २ ॥ दुजा भाव आड येऊं नेदीं चित्ता । करावा अनंता दास तुझा ॥ ३ ॥ अभय देऊनि करावें सादर । क्षण तो विसर पडों नेदीं ॥ ४ ॥ **तुका** ह्मणे आह्मी जे जे इच्छा करूं । ते ते कल्पतरू पुर– विसी ॥ ५ ॥

## पद

कां रे अनाथबंधु येवढें कां केलें निर्वाण । किती अंत पाहशील माझा कंठिं राहिला प्राण ॥ ध्रु ॥ ब्रह्मादि वंदिती पाय तूं त्रैलोक्याचा धनी । तुझा मी ह्मणवितों मजसी चिंतेची कांचणी ॥ १ ॥ सुवर्णाची लंका नेउनि दिधली शरणागता । जगदीश जगन्नायका तुझी कळिकाळावर सत्ता ॥ २ ॥ कामधेनु कल्पतरु क्षीरसागर तुजपाशीं । वितभर पोटासाठीं तोंड वासूं कवणासी ॥ ३ ॥ मुक्तिच्या माहेरा ऋद्धि सिद्धी तुझ्या दासी । क्षीरार्णवा रंक मालो मरतो उपवासी ॥ ४ ॥

## अभंग

सर्व सुख आहे भीवरेचे तीरीं । आमची पंढरी कामधेनू ॥ १ ॥ प्रेमामृत दुभे सदां

संतजना । वोसंडत पान्हा नित्य नवा ॥ २ ॥ धर्म अर्थ काम मोक्ष चारी स्तन । दोहणार धन्य पुंडलीक ॥ ३ ॥ भक्तीचें मेळवण भावाचेनि बळें । देखोनिया वोळे अधिकाधिक ॥४॥ जियेचें दुभतें नित्य नवें वाढे । पंढरी पहुडे पूर्व पुण्यें ॥५॥ भाग्यवंत **नामा** तें क्षीर लाधला । प्रेमें वोसंडला गर्जे नामें ॥ ६ ॥

## पद

भक्तांचिया काजासाठीं साधूचिया प्रेमासाठीं सोडिली मी लाज रे ॥ ध्रु० ॥ सुयोधना रागावलों । विदुराच्या गृहा आलों । आवडीनें कण्या प्यालों । जोंधळयाची पेज रे ॥ १ ॥ धुतो अर्जुनाचे घोडे । सदां राहें मागें पुढें । झाडीं अंगणींचे खडे । बांधोनियां माज रे ॥२॥ शुद्ध निरंजनवासी । तो मी आलों आकारासी । पाडि-

यलों प्रेमपाशीं । दशाकृति काज रे ॥ ३ ॥ वेडीं गौळियांची पोरें । त्यांचें ताक प्यालों वा रे । खातां भिल्लीणीची बोरें । उच्छिष्टाची चोज रे ॥ ४ ॥ पूर्णब्रह्म ह्मणती मातें । सर्वब्रह्म मीच त्यातें ॥ ऐसियासी जाणीव ते । धरी **अमृतराज** रे ॥ ५ ॥

## अभंग

काय माझा आतां पाहातोसी अंत । येईं बा धांवत देवराया ॥ १ ॥ तुजवीण होईल जीवासी आकांत । येईं बा धांवत देवराया ॥ २ ॥ असे जरी काम भेटोनियां जावें । धांवोनियां यावें देवराया ॥ ३ ॥ ये रे ये रे देवा **नामा** तुज बाहत। येईं बा धांवत देवराया ॥ ४ ॥

## पद

तूं माझा यजमान रामा ॥ ध्रु० ॥ जननीजठरीं

रक्षियलें मज । पोसुनि पंचप्राण ॥ १ ॥
बाहेर निघतां मातेचे स्तनीं । पय केलें निर्माण
॥ २ ॥ ऐसें असतां या पोटाची । कां करुं
चिंता जाण ॥ ३ ॥ **मध्वमुनीश्वर** स्वामी
रमापति । धरिं माझा अभिमान ॥ ४ ॥

## अभंग

हेंचि सुख पुढें मागतों आगळें । आनंदाचीं
फळें सेवादान ॥ १ ॥ जन्मजन्मांतरीं तुझाचि
अंकिला। करुनि विठ्ठाला दास ठेवीं ॥ २ ॥ दुजा
भाव आड येऊं नेदीं चित्ता । करावा अनंता
दास तुझा ॥ ३ ॥ अभय देऊनि करावें सादर ।
क्षण तो विसर पडों नेदीं ॥ ४ ॥ **तुका** ह्मणे
आह्मी जे जे इच्छा करूं । ते ते कल्पतरू पुर-
विसी ॥ ५ ॥

## पद

धांव रे रामराया । किती अंत पाहसी ॥ प्राणांत मांडियेला । नये करुणा कैसी ॥ धांव रे० ॥ ध्रु० ॥ पाहीन घणिभरी । चरण झाडीन केशीं ॥ नयन शिणले बा । आतां केधवां येसी ॥ धांव रे० ॥ २ ॥ मीपण अभिमानें । अंगीं भरला ताठा ॥ विषयकर्दमांत । लाज न वाटे लोळतां ॥ चिळस उपजेना । ऐसें जालें बा आतां ॥ धांव रे० ॥ ३ ॥ मारुती-स्कंधभागीं । शीघ्र बैसोनियांवें ॥ राघवें वैद्य-राजें । कृपाऔषध द्यावें ॥ दयेच्या पद्महस्तें । माझ्या शिरीं ठेवावें ॥ धांव रे० ॥ ४ ॥ या भवीं **रामदास** । थोर पावतो व्यथा ॥ कौतुक पाहतोसी । काय जानकीनाथा ॥ दयाळा दीनबंधो । भक्तवत्सला आतां ॥ धांव रे० ॥५॥

## अभंग

भेटीलागीं जीवा लागलीसे आस । पाहे रात्री दिवस वाट तुझी ॥ १ ॥ पूर्णिमेचा चंद्र चकोरा जीवन । तैसें माझें मन वाट पाहे ॥ २ ॥ दिवाळीच्या मुळा लेकी आसावली । पाहतसे वाटुली पंढरीची ॥ ३ ॥ भुकेलिया बाळ अति शोक करी । वाट पाहे परी माऊलीची ॥ ४ ॥ तुका म्हणे मज लागलीसे भूक । धांवूनि श्रीमुख दावीं देवा ॥ ५ ॥

## पद

सांवळिया राधारमणा। कां नये दीनाची करुणा ॥ ध्रु० ॥ किति अंत पाहसी सदया । मन मोहन यादवराया। कशि निष्ठुर केलिस माया । मी शरण आलों तव पाया । येईं झडकरि पन्नगशयना । कां नये दीनाची करुणा ॥ १ ॥

देवा कृपासिंधु म्हणविसी । अजि क्रूर कां हरी मजविशीं । मां पाहिं हरी हृषीकेशी । हा पतित दीन अघराशी । धांव वेगिं कंजलोचना । कां नये दीनाची करुणा ॥ २ ॥ बहु जन्म संसृति फेरा । चौऱ्यायशीं गणित येरझारा । मोहजाळ ममता भंवरा । मज ओढिति तृष्णा विवरा । कर दया मुरलिवादना । कां नये दीनाची करुणा ॥ ३ ॥ तारिले अजामिळ गणिका । ध्रुव वाल्मिक गजेंद्र गुहका । त्यांहुनि मी पतित हो कां । परि तारिं अतां विधिजनका । किति आळवूं भक्तभूषणा । कां नये दीनाची करुणा ॥ ४ ॥ दीनबंधु हें नाम साचें । वर्णिती आगम श्रुति वाचे । अजि सत्य करीं ब्रीदाचें । माउलीपण कृपेचें । **कृष्णदास** लोळे चरणा । कां नये दीनाची करुणा ॥ ५ ॥

## अभंग

कोणे गांवीं आहे सांगा हा विठ्ठल । जरी ठावा असेल तुह्मां कोणा ॥ १ ॥ लागतसें पायां येतों लोटांगणीं । मात तरी कोणी सांगा याची ॥२॥ गुणरूप याचे वाणितिया संता । मज क्षेम देतां सुख वाटे ॥ ३ ॥ सर्वस्वें हा जीव ठेवीन चरणीं । पांडुरंग नयनीं दावा मज ॥४॥ तुका म्हणे गाई वत्सा ताडातोडी । तैसी जाते घडी एकी मज ॥ ५ ॥

## पद

हे व्रजपति नंदकुमारे सकुमारे कृष्णाबाई ॥ध्रु०॥ तुज़विण विकळ जीव होतो क्षण लवपल स्थिर न राहे । तळमळ बहु वाटे मजला गति कोण करूं मी माये । विश्रांति नसे तुजपरती आयुष्य वृथा सरताहे ॥ चाल ॥ हे यदुपति ये लवलाहे ॥ अतिमृदु मज दाखविं पाये ।

आलिंगन दे चहुं बाहीं ॥ १ ॥ सर्वस्वि
शरण तुज आल्या परता कधिं केला नाहीं ।
पुरवोनी प्रीति तयाची कवटाळुनि धरिलें हृदयीं।
कनवाळुपणाची थोरी कां केली माझे आई ॥
चाल ॥ गुणसरिते सत्वर येईं। साष्टांग नमन तव
पायीं । सप्रेमें चुंबन देईं ॥ २ ॥ तान्हें टाकुनि
दुर माता लपली त्या कांहिं कळेना । मग काय
गती हो झाली त्याची मज आकळेना । लडिवाळ
करावा आधीं त्यागितां तोचि टळेना ॥ चाल ॥
प्रीति जडली हे वितळेना । पाहतां तुज तूंहि
वळेना । हा देह कदापि जळेना॥ ३ ॥ न करीं मज
पायांपरता गुरुनाथ नरोत्तमराया।दुस्तर भ्रमरूपी
कृष्णा अनिवार तुझी ही माया । अपराधी मी
बहु दात्या दुःखार्णविं बुडली काया ॥ चाल ॥
**गोविंद** प्रभु सुखसदया । करिं सर्व सुखाची
छाया । सांभाळिं मला यदुराया ॥ ४ ॥

## अभंग

चक्रवाक पक्षी वियोगें बाहती । जालें मजप्रती तैसें आतां ॥ १ ॥ चुकालिया माय बाळकें रडती । जालें मजप्रति तैसें आतां ॥२॥ वत्स न देखतां गाई हंबरती । जालें मजप्राति तैसें आतां ॥ ३ ॥ जीवना वेगळे मत्स्य तळमळती । जालें मजप्रति तैसें आतां ॥ ४ ॥ **नामा** ह्मणे मज वाटे ऐसें चित्तीं । करितमें खंती फार तुझी ॥५॥

## पद

मंद समिरगाति मंजुळ मुरहर वाजवितो पावा । तो हरि मजला दावा ॥ ध्रु० ॥ नम्र करुनि शिर संभ्रम करद्वय जोडुनि सखिचरणीं । मस्तक ठेवी धरणीं ॥ शुभ्र वस्त्र जरि तगट जडित घे अचल कुचावरुनी । डोलति कुंडल श्रवणीं ॥ गोमेदोत्पल पाचरत्नमाणिहार हृदयभुवनीं । साजे मस्तकिं वेणी ॥ चाल ॥

अरुणापरि कुंकम भाळीं । वरि मुक्तफळांची जाळी । तांबूल अधरपुटकमळीं ॥ उठाव ॥ मोरजडित मुद राखडि वरि केतकबदरी लावा ॥ तो हरी० ॥ १ ॥ हस्त धरुनि मन स्वथपणें करि कस्त पुढें जाया । ते अनयाची जाया ॥ गस्त चुकुनि आलि मस्तपणें श्रीहरिचे पद पहाया । आलापित यदुराया ॥ दुस्तर हा भवसागर सत्वर परतिर उतराया । शुक ह्मणे परिसें राया ॥ चाल ॥ गंभीर गिरा करि स्तवन । हंसापरि जीचें गमन । क्षणक्षणा सखिस करि नमन ॥ उठाव ॥ शारदेंदुवदना ह्मणती दिठि मुरलीधर पहावा ॥ तो हरि० ॥ २ ॥ विरहविकळ गळगळ श्रवती द्वयनेत्र कुचावरती । अधरोष्ठ उभय स्फुरती ॥ वनचर पशु तर वैर त्यजुनि राधेभंवते

भ्रमती । पंक्षी गजबज करिती ॥ साधुसंगमीं निमग्न होउनि कृष्णस्मरण करिती । राधेचा श्रम हरिती ॥ चाल ॥ हे मधुमुरनरकविनाशा । स्वामी रे रमाविलासा । निवारिं सकळ भव-पाशा ॥ उठाव ॥ श्रीसद्गुरु नरहरिपदकमळीं **गोविंदा** लावा ॥ तो हरि० ॥ ३ ॥

## अभंग

स्वप्नीं तरी कैसा न पडसी डोळां । सुंदर सांवळा घवघवीत ॥ १ ॥ चरणीं गर्जती तोडरनूपुरें । रेखित कस्तूरी निढळामाजीं ॥ २ ॥ शंखचक्र हातीं गळां वैजयंती । कुंडलें तळपती श्रवणां-माजी ॥ ३ ॥ **नामा** म्हणे स्वप्नीं तरी तूं बा येईं । पांडुरंगे माई कृपावंते ॥ ४ ॥

## पद

बोल एकदां, एकदां इंदुवदने । क्षेम दे मला

दनुजकदने ॥ ध्रु० ॥ सजल घन तसा, तसा रंग तनुचा । नाभिं जन्मला जनक मनुचा । नचले तुजपुढें, तुजपुढें गर्व अनुचा । मारिला ज्येष्ठ पुत्र दनुचा ॥ चाल॥ तेचि कर कटीं ।उभि राहुनि भिवरातटीं । स्वजनासी लक्षी दिठी । दिठी कंसकदने ॥ क्षेम दे मला० ॥ १ ॥ वेष्टिलें कटीं, कटीं पीत वसन । हृदयिं द्विज-पायाचें भूषण । मकरकुंडलें, कुंडलें युक्त श्रवण। पाहतां तुझें वदननलिन ॥ चाल ॥ काम लाजला । शिव नेत्राग्नित भाजला । होवोनि तनय राजला । राजला पद्मनयने ॥ क्षेम दे मला० ॥ २ ॥ तुझ्या स्वरूपाचा, स्वरूपाचा चाळा । लागला वृद्ध तरुण बाळा । होउनी पिसें, पिसें आननाला । पाहसि परि न बोलसी त्यांला ॥ चाल ॥ बहुत प्रार्थिती । सुर सकळ

तुला विनविती । बोलाया कुंठित मती । मती दर्पहरणे ॥ क्षेम दे मला० ॥ ३ ॥ ऐकुनी तुझी, तुझी कीर्ति ऐसी । अम्हि दुर्बल फाणि-पुरवासी । फिरत पातलों, पातलों पंढरीसी । तुला देखिलें सुगुणराशी ॥ चाल ॥ बोल एकदां । दे क्षेम चुकविं आपदा । निजसुख भोगवीं सदा । **गोविंद** घेत धरणें ॥ क्षेम दे मला दनुजकदने० ॥ ४ ॥

## अभंग

तूं मावलीहून मवाळ । चंद्राहून शीतळ । पाण्याहून पातळ । कल्लोळ प्रेमाचा ॥ १ ॥ देऊं काशाची उपमा । दुजी तुज पुरुषोत्तमा । ओंवाळेनि नामा । तुझ्यावरूनि टाकितों ॥२॥ तुवां केलें रे अमृता । गोड त्याही तूं परता । पांचा तत्त्वांचा जनिता । सकल सत्तानायका

॥ ३ ॥ कांहीं न बोलोनि आतां । उगाच चरणीं ठेवितों माथा । तुका म्हणे पंढरिनाथा । क्षमा करीं अपराध ॥ ४ ॥

## पद

ऐक ऐक सखये बाई । नवल मी सांगूं काई । त्रैलोक्याचा धनी तो हा यशोदेसी ह्मणतो आई ॥ ध्रु० ॥ देवकीनें वाहिला । यशोदेनें पाळिला । पांडवांचा बंदीजन होवोनियां राहिला ॥ १ ॥ ब्रह्मांडाची सांठवण । योगियांचें निजध्यान । चोरी केली म्हणोनियां उखळासी बंधन ॥ २ ॥ सर्वहि तीर्थें ज्याचे चरणीं । दुर्लभ हा चक्रपाणी । राधिकेसी म्हणतो तुझी करीन मी वेणीफणी ॥ ३ ॥ शरण **एका जनार्दनीं** । मोक्ष कैवल्याचा दानी । गाई गोप बाळा मेळविल्या आपुलेपणीं ॥ ४ ॥

## अभंग

दीननाथ तुझी ब्रीदें चराचर। घेसील कैवार शरणागता ॥ १ ॥ पुराणीं जे तुझे गर्जती पवाडे । ते आह्मा रोकडे कळों आले ॥ २ ॥ आपुल्या दासाचें न साहसी उणें । उभा त्या कारणें राहिलासी ॥ ३ ॥ चक्र गदा हातीं आयुधें अपारें । न्युन तेथें पुरें करूं धांवे ॥ ४ ॥ तुका म्हणे तुज भक्तीचें कारण । करावया पूर्ण अवतार ॥५॥

## पद

भाव धरा रे । आपुलासा देव करा रे ॥ ध्रु०॥ कोणी काय ह्मणो यासाठीं । बळकट प्रेम असावें गांठीं । निंदास्तुतिवर लावुनि काटी । मी तूं हरा रे ॥ आपुलासा० ॥ १ ॥ सकाम साधन सर्वहि सांडा । निष्कामें मुळ भजनीं मांडा । नाना कुतर्कवृत्तिसि दवडा । आलि जरा रे ॥

आपुलासा० ॥ २ ॥ दुर्लभ नरदेहाची प्राप्ति। पुन्हा न मिळे हा कल्पांतीं । ऐसा विवेक जाणुनि चित्ती । गुरुसि वरा रे ॥आ० ॥ ३ ॥ केसरि-नाथ गुरूचे पायीं।सृष्टी आजि बुडाली पाहीं । शिवादीनें निश्चय दुसरा नाहीं । भक्तसखा रे ॥ आपुलासा देव करा रे ॥ ४ ॥

## अभंग

अनाथ परदेशी हीन दीन भोळें। उगलेंचि लोळे तुझे रंगीं ॥ १ ॥ आपुलें ह्मणावें मज नुपेक्षावें । प्रेमसुख द्यावें मायबापा ॥ २ ॥ कासवीचे परी दृष्टी पाहें मज । विज्ञानीं उमज दावुनियां ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुझा जालों शर-णागत। काया वाचा चित्त दुजें नाहीं ॥ ४ ॥

## पद

नवविध भक्ति घडो। तुझिये स्वरूपीं

प्रीत जडो । विषयोन्मुख मन होउनि उन्मन स्वस्वरूपिं मुरडो ॥ ध्रु० ॥ सत्संगति आवडो । पाउल सन्मार्गींच पडो । याविरहित आन मार्गों जरि तरि जिव्हा समुळ झडो ॥ १ ॥ निजशेजे पहुडो । मुख हें सुखसिंधूंत बुडो । विश्वपटांतरिं तंतु एकची दृष्टि अशी उघडो ॥ २ ॥ पूर्ण रंग जोडो । जगदाभास समुळ मोडो । हारपलें जें निजधन माझें वेगीं मज सांपडो ॥ ३ ॥

## अभंग

आडलिया जना होसी साहकारी । अंधळिया करीं काठीं तूंचि ॥ १ ॥ आडिलें गांजिलें पीडिलें संसारीं । त्यांचा तूं कैवारी नारायणा ॥ २ ॥ प्रल्हाद महासंकटीं रक्षिला । तुझी आपंगिला नानापरी ॥ ३ ॥ आपुलेंच अंग तुझीं वोडविलें । त्याचें निवारिलें महाद्दुःख

॥ ४ ॥ तुका ह्मणे तुझे कृपे पार नाहीं । माझे विठोबाई जननीये ॥ ५ ॥

## पद

सगुण चरित्रें परम पवित्रें सादर वर्णावीं । सज्जनवृंदें मनोभावें आधीं वंदावीं ॥ ध्रु० ॥ संतसंगें अंतरंगें नाम बोलावें । कीर्तनरंगीं देवासन्निध सुखें डोलावें ॥ १ ॥ भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या । संतासंगें वैराग्याच्या युक्ती विवराव्या ॥ २ ॥ जेणेंकरोनी मूर्ति ठसावी अंतरिं श्रीहरिची ॥ ऐसी कीर्तनमर्यादा हे संतांचे घरची ॥ ३ ॥ अद्वय भजनें अखंड स्मरणें वाजवि करटाळी । एका जनार्दनीं मुक्ती होय तत्काळीं ॥ ४ ॥

## अभंग

तीर्थाचें जें मूळ व्रतांचें जें फळ । ब्रह्म तें केवळ पंढरीये ॥ १ ॥ तें आम्हीं देखिलें

आपुल्या नयनीं । फिटलीं पारणीं डोळियांची ॥ २ ॥ जीवांचें जीवन सुखाचें सेजार । उभें कटीं कर ठेवूनियां ॥ ३ ॥ जनाचा जनिता कृपेचा सागर। दीना लोभापर दुष्टां काळ ॥४॥ सुरवरां चिंतनीं मुनिवरां ध्यानीं । आकार निर्गुणीं तोच असे ॥ ५ ॥ तुका म्हणे नाहीं श्रुति आतुडलें । आम्हां सांपडलें गीतीं गातां ॥६॥

## पद

बोलणें फोल झालें । डोलणें वायां गेलें ॥ ध्रु० ॥ चित्तीं विषयाचा अभिलाष । नाहीं विश्रांन्तिचा लेश । मुखें म्हणे निर्विशेष । परब्रह्म सांचलें ॥ १ ॥ श्रवणीं दावी अष्टहि भाव । म्हणे मृगजळवत् हें वाव । कवडी वेचितांही जीव । जाऊं पाहे तळमळुनी ॥ २ ॥ परोपदेशी पूर्णज्ञानी । वाटे मत्सर ममता मनीं ।

नागसुरें तो जैसा फणी । डोले परी विषवदनीं ॥ ३ ॥ अन्न म्हणतां कोण धाले । शब्दें ब्रह्म कोण झालें । शिकविले बोल बोले । शुक पक्षी पैं जैसा ॥ ४ ॥ शिकला नाना कला छंद । नाहीं अंतरीं निर्द्वंद्व । सहज पूर्ण निजानंद । सर्व रंगीं न भासे ॥ ५ ॥

## अभंग

जालिया दर्शन करीन मी सेवा । आणीकही देवा नलगे दुजें ॥ १ ॥ प्रारब्धा अधीन अन्न आच्छादन । स्थिर करोनि मन ठेवीं पायीं ॥२॥ये गा ये गा ये गा कृपाळुवा हरी । विनवीं अभ्यंतरीं देउनि भेटी ॥ ३ ॥ आसावलें मन जीवनाचें ओढी । नामरूपें गोडी लावियेली ॥ ४ ॥ काय तुह्मांपाशीं नाहीं भांडवल । माझे मिथ्या बोल जाती ऐसे ॥ ५ ॥

काय लोखंडाचे पाहे गुण दोष । सिवोनि परीस सोनें करी ॥ ६ ॥ **तुका** म्हणे माझें अवघें असों द्यावें । आपुलें करावें ब्रीद साच ॥ ७ ॥

## पद

भज रे गोविंदा गोविंदा ।सच्चिदानंदकंदा ॥ सावध होईरे मतिमंदा । नकरीं आणिक धंदा ॥ ध्रु०॥ मोहें भुललासी भुललासी । माझें माझें ह्मणसी । क्लेशें मिळाविल्या धनराशी । अंतीं टाकुनि जाशी ॥ १ ॥ गृहसुत धनदारा धनदारा । मिथ्या मोह पसारा ॥ अंतीं जाशिल रे झरारा । करिं कां पूर्ण विचारा ॥ २ ॥ आयुष्य जातें रे घडी घडी । तुज विषयांची गोडी ॥ काल पाडिल रे मुरकुंडी।तैं तुज कोण सोडी ॥ ३ ॥ विसरुनि भगवंता भगवंता । करशिल घरची चिंता ॥ काळ नेइल रे अवचिता।तंव तूं पडशिल भ्रांता

॥४॥ गुंडा केशवीं स्थिर राहे । तरीच तुझीच सोये ॥ पायां लागलियां पैं पाहे । अंतीं मोक्ष लाहे ॥ ५ ॥

## अभंग

भागल्यांचा तूं विसावा । करी नांवा लिंबलोण ॥ १ ॥ परमानंदा पुरुषोत्तमा । हरि या श्रमापासूनि ॥ २ ॥ अनाथांचा अंगीकार । करितां भार न मानिसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे इच्छा पुरे । ऐसे धुरे गे विठ्ठले॥४॥

## पद

मना ऐसा महाराज कोण आहे रे । नाममात्रेंची जन्मजरा जाये रे ॥ ध्रु० ॥ मच्छ कच्छ पशु सूकर जाहला रे । नारसिंह अवतार धरियेला रे । अंबऋषी परमसुखी केला रे । अर्जुनाचा सारथी स्वयें झाला रे ॥ १ ॥ घरी

भक्तांचे उरीं शिरीं पाय रे । पुरी नेली वैकुंठ-पदा पाहें रे । भिल्लिणीचीं उच्छिष्ट फळें खाये रे। रिसां वानरां एकांत करिताहे रे ॥ २ ॥ दीनवत्सलता काय किती वानूं रे । पार्थालागीं लपविला दिवसा भानू रे । वृंदावनीं वाजवी रम्य वेणू रे । तेणें नादें मोहिल्या गोपि धेनू रे ॥ ३ ॥ अनंत कोटी ब्रह्मांडें ज्याचे पोटीं रे । तो हा धांवे गोवळ्या धेनुपाठीं रे । खांदां कांबळा घेवोनि हातिं काठी रे । निजानंदें **रंगला** पाठिं पोटीं रे ॥ ४ ॥

## अभंग

येईं गे विठ्ठले विश्वजीवनकळे । सुंदर घननीळे पांडुरंगे ॥ १ ॥ येईं गे विठ्ठले करुणाकल्लोळे । जीव कळवळे भेटावया ॥ २ ॥ न लगती गोड आणिक उत्तरें । तुझें प्रेम झुरें भेटावया ॥ ३ ॥ **तुका** ह्मणे धांव घालीं कृष्णाबाई । क्षेम चहूं बाहीं देईं मज ॥ ४ ॥

# पद

क्षमा करीं अपराध सख्या रे किति तरी विनवूं तुला । दे भेट विठोबा मला ॥ ध्रु० ॥

दामाजीनें धान्य लुटविलें वांचविली पंढरी । त्याचा भार वाहे शिरीं ॥ जाउनियां बेदरासि यवनालागीं मुजरा करीं । याला काय ह्मणावें तरी ॥ भक्तजनाची माय कृपाळू कळवळ आली तुला ॥ दे भेट० ॥ १ ॥

स्तंभीं बांधुनि गृहीं टाकिलें विचार केला नाहीं । गेली यात्रेला सखुबाई । तिच्या पतीची सेवा केली बसुनि पलंगीं पायीं । तुझे अंगिं देवपण नाहीं ॥ सखू आण ग पाणी सासू घागर देई तुला ॥ दे भेट० ॥ २ ॥

जनाबाइनें दळण दळाया तुज कैसें लाविलें । त्वां न्हाउं कसें घातलें ॥ एकांतीं बैसुनी प्रीतिनें उच्छिष्ट

त्वां भक्षिलें । तें तुझें प्रगट कोणें नेलें ? ॥ व्राकळ पांवरुनि उभा राहसी शोभा आली तुला ॥ ३ ॥ राधाबाई कोण निघाली सुईण ते होउन । कसें केलें बाळंतपण ॥ नाथ नरहरी ह्मणे **महिपती** लीन झाल्यावांचून । तुला दयाळ ह्मणेल कोण ॥ संतांघरचें काम करितां कळवळ आली तुला ॥ दे भेट० ॥ ४ ॥

## अभंग

गरुडावरी बैसोनि येतो जगजेठी । त्याचे चरणीं मिठी घालूं चला ॥ १ ॥ सांवळें रूपडें देखिलें लोचनीं । शंखचक्र दोन्ही शोभताहे ॥ २ ॥ पीतांबर झळके होचि त्याची खूण । वांकी रुणझुण करिताती ॥ ३ ॥ गरुडाचा चपेटा येत असे नेटें । कस्तुरी मळवट शोभताहे ॥ ४ ॥ पदक एकावळी शोभताहे कंठा । **तुका** ह्मणे मिठी घालूं चला ॥ ५ ॥

# पद

सखया रामा विश्रांति तुझिये नामीं । ह्मण-
वुनि मजला ने त्वरें निज सुखधामीं ॥ ध्रु० ॥
अवचट सुकृतें नरदेहा झाली भेटी । पशुसुत-
जायाधनधामीं प्रीति मोठी । माझें माझीं
ह्मणुनियां धरिलें पोटीं । यांच्या संगें भोगिल्या
दुःखकोटी ॥ १ ॥ सोडुनि स्वहिता धांवलों
दिशा दाही । शववत् झालों मागुता कौतुक
पाहीं । परि खळ जन हे नेदिती कवडि तेही ।
परि हे आशा पापिणी लाजत नाहीं ॥ २ ॥
जंव्रवरि दृढता तंव्रवरि या तनुची प्रीति ॥ जर्जर
झाल्या निंदक हे अवघे होती । यांचीं दुःखें
तुजला मी सांगूं किती । ह्मणुनि येतो **श्रीधर**
काकुळती ॥ ३ ॥

## अभंग

आवडे हें रूप गोजिरें सगुण । पाहतां लोचन सुखावले ॥ १ ॥ आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहें । जों मी तुज पाहें पांडुरंगा ॥२॥ लांचावलें मन लागलीसे गोडी । ते जीवें न सोडी ऐसें झालें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मीं केली जे लडिवाळी । पुरवावी आळी माय-बापें ॥ ४ ॥

## पद

कां रे करुणा तुला येइना किती तरि विनवूं हरी । कैसा मज अतिहीन दीन परि केला जगदंतरीं ॥ ध्रु० ॥ तुजविण जिव तडफडतो व्याकुळ धीर धरावा कसा । आश्रित मी प्रतिपालक तूं जननीप्रति बालक जसा ॥ नसे कोणि सहकारि जनांचा किमपि नाहिं भरंवसा ।

उपहासिति परि दिसे न कोणी पक्षपात करि असा । भाग्यहीन जाहल्या जनामाधिं धडचि बोलती पिसा । दशा ज्यासि तो सहजचि शाहणा मान्य होतसे ठसा ॥ चाल ॥ बहु वित्त नसे मद्गृहीं श्रीधरा रे । विद्या न भक्ति संग्रहीं श्रीधरा रे । पाडिलों या भवनिग्रहीं श्रीधरा रे ॥ उठाव ॥ कर्म सांग न घडे तव सेवन अर्चनादि निज घरीं । सदा आळशी आमयमय त्वद्गुण न वदे वैखरी ॥ १ ॥ वावरतो हा आत्मा याचि काशि कळ तुज येइना । त्वदंश हा त्वद्वाक्य साक्ष भगवद्गीता पराकि ना ॥ तिळतिळ गोष्टींसाठिं शरण किति जावें कीं लघुजना । घटे महत्त्व परंतु तुटेना आस कार्य होइना ॥ वृथा द्वेष धरुनियां पाहती छिद्र कोणि झांकिना । लपावया श्रीपति न

सांपडे स्थळ कोठें तुजविना ॥ चाल ॥ कां दगदग माझ्या जिवा माधवा रे। न पडेच चैन निशिदिवा माधवा रे । करुं काय मी हर हर शिवा माधवा रे ॥ उठाव ॥ कशी फजीती मांडियलि कां कोपशि दासावरी । विटंबितों मी यांत काय संतोष तुझ्या अंतरीं ॥ २ ॥ तूं करुणेचा सागर त्यांतुनि बिंदुमात्र का नसे । असा काय अन्याय सख्या हरि तुजप्रति माझा दिसे ॥ कीं अदयाग्नीनें करुणेचें शोषण केलें असे । म्हणुनि उगा राहशी ऐकुनी बौद्धरूप युगवशें ॥ याचि युगीं कैकांशि तारुनी संकट वारित असे । अतां काय सोडोनि बैसलां तें विरुद्ध हो कसें ॥ चाल ॥ मी दास ह्मणवितों तुझा केशवा रे । नको भाव आठवूं दुजा केशवा रे । मज दुर्बळाचि हे पुजा केशवा रे

॥ उठाव ॥ शरणागत सर्वस्व ठेवितों मस्तक चरणावरी ॥ किती अंत पाहशील कृपाळा धांव धांव झडकरी ॥ ३ ॥ दाही बोटें मुखीं घालितों पदर पसरितों तुला । क्षमा करीं सर्वापराध तूं नको उपेक्षूं मला ॥ असेंचि तुज कर्तव्य तरी हा देह कां रे निर्मिला । रिझ सोंगा या कीं न भाणवी हे अनुचित नटकला ॥ पदोपदीं चुकविसी बुद्धि कां रोष अंगिकारिला । तुझेंचि तुज हीनत्व तूंचि कर्त्ता लोकत्रय भला ॥ चाल ॥ अधिकार नाहिं मजकडे राघवा रे । ना स्वतंत्रता मज घडे राघवा रे । नको लावुं खळांचे खडे राघवा रे ॥ उठाव ॥ गगन कडकडुनि पडे संग मी तुझा सोडिना तरी । बोलवेना **राघवा**सि देवा जें इच्छिसि तें करीं ॥४॥

## अभंग

रूप पाहतां लोचनीं । सुख झालें वो साजणी ॥ १ ॥ तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ॥ २ ॥ बहुता सुकृताची जोडी । म्हणुनी विठ्ठलीं आवडी ॥ ३ ॥ सर्व सुखाचें आगरु । बाप रखुमादेवीवरु ॥ ४ ॥

## पद

कौसल्या म्हणे बा रामा नको वना जाऊं जाऊं । माझिया रे तान्ह्या बाळा तुला कोठें पाहूं पाहूं ॥ ध्रु० ॥ अयोध्या ही ओस पडली तुझ्यावीण आजि रामा । मला गमेना कीं कांहीं साधुजनमनविश्रामा । श्रावणारि मूर्छित पडला आग लागो तुझ्या कामा । किती तुझ्या मागें मागें कोठवरी धावूं धावूं ॥ १ ॥ हरणीचें पाडस वनीं चुकलें गे बाई बाई । तैसें मन

झालें रामा रडतें मी धाई धाई । नको आतां टाकुन जाऊं मजकडे पाहीं पाहीं । तुजसाठीं रामा आजी विष कीं मी घेऊं घेऊं ॥ २ ॥ स्तनीं फुटलासे पान्हा बाळा जवळि येईं येईं । किती कष्टविशी मजला सुखी गृहीं राहीं राहीं । त्यजुनियां राज्य ऐसें वनीं कांहीं नाहीं नाहीं । कैकयीचे सदनीं कैशी एकटी मी राहूं राहूं ॥ ३ ॥ सीताबाई स्वरूपानें अति सकुमार खाणी । खडे रुततील तिजला वनीं माझे माय-बहिणी । तृषाक्रांत झाल्या रामा उभा रहा पाज पाणी । चतुर्दश वर्षें दुःख कोठवरी साहूं साहूं ॥ ४ ॥ वनीं करीं साउलिये दिनकर-कुळदीपा । सरोवर जवळी ठेवीं वरुणा तूं मायबापा । पदोपदीं रक्षीं तान्ह्या नव्हे वनवास सोपा । निशिदिनीं **माधव** तुझे गुण सदा गाऊं गाऊं ॥ ५ ॥

## अभंग

क्षीरसागरांत अससी बैसला । धांवोनि मजला भेटी देईं ॥ १ ॥ शेषावरी जरी अससी निजेला । धांवोनि मजला भेटी देईं ॥ २ ॥ कैलासासी शिव पूजितसे तुजला । धांवोनि मजला भेटी देईं ॥ ३ ॥ गहिंवरुनी नामा बाहतो विठ्ठला । धांवोनि मजला भेटी देईं ॥४॥

## पद

तुजविण कोण दया करणार ॥ ध्रु० ॥ श्रीजगदीश हरे सुखसिंधो । म्हणतां अघ हरणार ॥ १ ॥ चिंताडोहीं बुडतां तेथें । येउनि कर धरणार ॥ २ ॥ त्यागुं नको मज निज यश राखीं । विश्वातें भरणार ॥ ३ ॥ राजारामीं लीन प्रासादिक । वचना अनुसरणार ॥ ४ ॥

## अभंग

आह्मांसाठीं अवतार । मत्स्यकूर्मादि सूकर ॥१॥ मोहें धांवे घाली पान्हा । नांव घेतां पंढरिराणा ॥ २ ॥ कोठें न दिसे पाहतां । उडी घाली अवचिता ॥ ३ ॥ सुख ठेवी आह्मांसाठीं । दुःख आपणची घोटी ॥ ४ ॥ आह्मा घाली पाठीकडे । आपण कळिकाळाशीं भिडे ॥ ५ ॥ तुका ह्मणे कृपानिधी । आह्मां उतरी नांवे-मधीं ॥ ६ ॥

## पद

देवा कोण मला तारी । धुंदी झाली दरबारीं ॥ ध्रु० ॥ पांडव तुज ह्मणती खासा । दवडिसि त्यातें वनवासा ॥ छळि निशि येउनि दुर्वासा । परि तो पावे सुग्रासा ॥ गोपी अनुसरल्या रासा । विरहें देसि तयां त्रासा ॥ आवडे तुज कुब्जा नारी ।

धुंदी झाली दरबारीं ॥ १ ॥ त्वन्मुखिं बाकि कुच-
विष घेंटी । मानिसि देवकिसम पोटीं ॥ ज्याचीं
आचरणें खोटीं । वदविसि तेथुनि शतकोटी ॥
कीर्तिनें नारदराति ॥ मोठी । त्याला न मिळे
लंगोटी ॥ असि काय चाल तुझी भारी ।
धुंदी झाली दरबारीं ॥ २ ॥ त्वां जे भक्त
विभो केले । ते विचित्र करिते झाले ॥ कोणी
पशुंतें वळविलें । अमृत मृतांतें सेवविलें ।
कन्ये पुंस्त्वचि बोलविलें । मृत पितरांतें जेवविलें ॥
मारुनि कां उठवा घारी । धुंदी झाली दरबारीं
॥ ३ ॥ अघटितघटनापटु देवा । न कळत
लीलेची ठेवा ॥ वद या **राजाराम** सेवा । पुरवीं
**प्रासादिक** हेवा ॥ घेउनि दाद भवा वारीं ।
धुंदी झाली दरबारीं ॥ ४ ॥

## अभंग

सुंदर तें ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ॥ १ ॥ गळां तुळसीहार कासे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ २ ॥ मकरकुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभ मणि विराजित ॥ ३ ॥ **तुका** ह्मणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

## पद

गडे हो कृष्ण गडी आपुला । यमुनाडोहीं बुडाला ॥ ध्रु० ॥ काळिया डसेल कृष्णाला । होइल विषबाधा हरिला । हाका मारिल आपुल्याला । तुह्मि तरि स्वस्थपणें बसलां । अतां काण सोडविल रे त्याला ॥ यमुना० ॥ १ ॥ गाई त्याविण हंबरती । वांसरें स्तनपान न करिती । यापरि गोप सर्व रडती । मुखानें

कृष्ण कृष्ण ह्मणती । अतां काय भेटेल आपुल्याला ॥ यमुना० ॥ २ ॥ यशोदा पुसेल जरि हरिला । सांगों काय तरी तिजला । नंद ह्मणेल त्वां नेला । हलधर मारिल तो मजला । अतां काय जावें गोकुळाला ॥ यमुना० ॥ ३ ॥ दहिं दुध लोणीं म्यां हरिलें । हरिला ताक बळें दिधलें । घेइना ह्मणोनि करिं धरिलें । वृक्षीं बळकट बांधियलें । म्हणुनि तो मजवरती रुसला ॥ यमुना० ॥ ४ ॥ पेंदा धावुनियां आला । बळकट कृष्णाला डसला । त्याचे पाठीवर बसला । ओझें झालें बहु त्याला । म्हणुनि तो पळत पळत आला । भेटला प्रेमाबाईला ॥ गडे हो कृष्ण गडी० ॥ ५ ॥

## अभंग

सदा माझे डोळां जडो तुझे मूर्ती । रखुमाईच्या

पंतों सोयरिया ॥ १ ॥ गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्व काळ ॥ २ ॥ विठो माउलीये हाचि वर देईं । संचरोनी राहीं हृदयामाजी ॥ ३ ॥ **तुका** ह्मणे कांहीं न मागें आणिक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥४॥

## पद

निज वदनीं हरिनाम वसावें । न लगे त्यासि वनांत बसावें ॥ध्रु०॥ कोण नी कैंचा कोठुनि आलों । हें गुज श्रीगुरुलागिं पुसावें ॥ १ ॥ या पुनर्भवीं नाम निरूपम । ध्यान सगुण हृदयांत ठसावें ॥ २ ॥ **जयरामात्मज** प्रभुच्या कीर्तनि । जाउनि प्रेमरसांत घुसावें ॥ ३ ॥

## अभंग

राजस सकुमार मदनाचा पुतळा । रविशशि-कळा लोपलिया ॥ १ ॥ कस्तूरी मळवट चंद-

नाची उटी । रुळे माळ कंठीं वैजयंती ।। २ ।। मुगुट कुंडलें श्रीमुख शोभलें । सुखाचें ओतिलें सकळही ।।३।। कांसे सोनसळा पांघरे पाटोळा। घननीळ सांवळा बाईयांनो ।। ४ ।। सकळही तुह्मी व्हा गे एकीसवा । **तुका** ह्मणे जीवा धीर नाहीं ।। ५ ।।

## पद

भक्तांचा विश्राम रे । अंकिला श्रीराम रे ! कैवल्याचें धाम भक्तां करी पूर्ण काम रे ।।ध्रु०।। घेतां आळी बाळकें । त्यासी विश्वपाळकें । क्षीरसिंधु दिधला मुनिमानसमराळकें ।। १ ।। होतां ऋषिशाप रे । झाली शिळारूप रे । पादस्पर्शें जाहली ते अहल्या निष्पाप रे ।। २ ।। हाणोनियां चक्र रे । विदारिला नक्र रे । गजा गौरविलें तैसें न पवेचि शक्र रे ।। ३ ।। द्रौप-

दीची लाज रे । राखी महाराज रे । पांडवांचे
घरीं करी सर्वस्वेंसी काज रे ॥ ४ ॥ रामीं रत
चित्त रे । तेचि भक्त युक्त रे। निजानंदीं पूर्ण
रंगीं रंगला अंनंत रे ॥ ५ ॥

## अभंग

माझें चित्त तुझे पायीं । राहे ऐसें करीं कांहीं ।
धरोनिया बाहीं । भव हा तारीं दातारा ॥ १ ॥
चतुरा तूं शिरोमणी । गुण लावण्याची खाणी ।
मुकुट सकळां मणि। धन्य तूंचि विठोबा ॥२॥
करी तिमिराचा नाश । दीप होऊनि प्रकाश ।
तोडीं आशापाश । करीं वास हृदयीं ॥ ३ ॥
पाहें गुंतलों नेणतां । तुज असो माझी चिंता ।
तुका ठेवी माथा । पायीं आतां राखावें ॥४॥

## पद

मुक्ताफळ नथ नाकीं। चरणीं ल्याली वाळे वांकी ।

पीतांबरें अंग झांकी । कृष्णम्मा माझी ॥ ध्रु० ॥ खांद्यावरी कांबळी । पायघोळ लांबली । पांघरली धाबळी । कृष्णम्मा माझी ॥ १ ॥ गाईपाठीं लागली । पळतां नाहीं भागली । माय बहीण चांगली। कृष्णम्मा माझी॥२॥देहुडा पावली। उभी माझी माउली।विश्रांतिची साउली। कृष्णम्मामाझी ॥३॥ उभी नीट विटेवरी । शोभे भिवरेचे तीरीं। **नामयाची** कैवारी । कृष्णम्मा माझी ॥ ४ ॥

## अभंग

सांडियेली काया । वरी ओवाळूनी पायां ॥ १ ॥ शरण शरण नारायणा । मज अंगिकारा दीना ॥ २ ॥ आलों लोटांगणीं । रुळें तुमचे चरणीं ॥३॥ **तुका** ह्मणे कईं । डोई ठेवीन हे पायीं ॥४॥

## पद

धन्य तोचि जगीं एक हरिरंगीं नाचे । रामकृष्ण

वासुदेव सदा स्मरे वाचे ॥ ध्रुं० ॥ सुख दुःख समान सकळ जीवांचा कृपाळ । ज्ञानाचा उब्दोध भक्तिप्रेमाचा सुकाळ ॥ १ ॥ विषयीं विरक्त जया नाहीं आपपर । सर्वदा संतुष्ट विश्व-व्यापक निर्धार ॥ २ ॥ जाणीव शहाणी व ओझें सांडुनियां दुरी । आपण वस्तीकर वर्ततसे संसारीं ॥ ३ ॥ **एका जनार्दनीं** नित्य हरीचें कीर्तन । आसनीं भोजनीं सदा हरिचें चिंतन॥४॥

## अभंग

तारीं मज आतां रखमाईच्या कांता । पंढरीच्या नाथा मायबापा ॥ १ ॥ अनाथाचा नाथ ऐकियेलें कानीं । सनकादिक मुनि बोलताती ॥ २ ॥ त्यांचिया वचनाचा पावोनि विश्वास । धरिली तुझी कास पांडुरंगा ॥ ३ ॥ **नामयाची** लोकीं आऊ म्हणे देवा । कृपाळू केशवा सांभाळावें ॥ ४ ॥

## पद

मन रामीं रंगलें अवघें मनचि राम झालें । सबाह्य अभ्यंतरीं अवघें रामरूप कोंदलें ॥ध्रु०॥ आत्म या रामाचें ध्यान लागलें मज कैसें । क्रिया कर्म धर्म अवघें तणेंचि प्रकाशे । सत्य मिथ्या प्रकृति पुरुष रामाचि अवघा भासे ॥१॥ चित्तचि हरपलें अवघें चैतन्य जाहलें । देखतां देखतां अवघें विश्व मावळलें । पाहतां पाहतेपणा हरिला सर्वस्वें ठकाविलें ॥ २ ॥ भक्तिज्ञान वैराग्य लाभे आत्मस्थिती । निर्धारितां नकळे रामरूपीं जडली प्रीति । **एका जनार्दनीं** अवघा रामचि आदी अंतीं ॥ ३ ॥

## अभंग

पाहूं द्या रे मज विठोबाचें मुख । लागलीसे भूक डोळां माझ्या ॥ १ ॥ कस्तुरी कुंकुम भरोनियां

ताटीं । आंगीं बरवी उटी गोपाळाच्या ॥ २ ॥ जाई जुई पुष्पें गुंफोनियां माळां । घालूं घननीळा आवडीनें ॥ ३ ॥ नामा ह्मणे विठो पंढरीचा राणा । डोळियां पारणा होत असे ॥४॥

## पद

षड्गुणतरु आराम । सबांधव राम । कपींद्रा सुखी असे कीं राम ॥ ध्रु० ॥ कनककुरंगापाठीं गेले । प्रभु सर्वज्ञकाम ॥ १ ॥ निज कांतेतें दुष्टें हरिलें । स्मरतो मंगलधाम ॥२॥ सौमित्रा दुर्वाक्यें छळिलें । त्याचा हा परिणाम ॥ ३ ॥ मजविरहित त्या निद्रा कैंची । अखिल लोकाभिराम ॥ ४ ॥ त्र्यंबक भंगी एकाजनार्दनीं । करितो विबुधप्रणाम ॥ ५ ॥

## अभंग

नको गा मोकलूं दीन पंढरिनाथा । तुजविण

आतां कोण धांवे ॥ १ ॥ अपराधाच्या कोटी पाहूं नको कांहीं । ये गे विठाबाई झडकरी॥२॥ माझ्या दोषासाठीं पाठमोरा होसी । पावन श्रीदासी लागे बोल ॥ ३ ॥ **नामा** म्हणे जननी तूंचि चराचर । तारिले अपार जड जीव ॥४॥

## पद

भक्तांसाठीं तो जगजेठी बसोनि माळ्यावर । पाखरें उडवी सारंगधर ॥ध्रु०॥ भक्तांमध्यें भक्ति पहा त्या बोधल्यानें केली । थोटया ताटांना कणसें आलीं ॥ कैसा तो भगवत विठ्ठल अनंत रूप ख्याली । कशी देव भक्तांची माउली ॥ त्याचे चरणापाशिं विनंति जोडुनि दोन्ही कर ॥ पांखरें.॥१॥नामदेवासी ह्मणती ब्राह्मण जात तुझी ओंगळ । निघ बाहेर करिसी विटाळ ॥ गेला देउळामागें त्यानें केले दगडाचे टाळ । हरीनें

फिरविलें देऊळ ॥ अगाध लीला त्याची द्वारका एका खांबावर ॥ पांढरें० ॥ २ ॥ जनाइच्या घरिं देवें भरिल्या पाण्याच्या घागरी । चहुं हातांनीं रांजण भरी । दळणकांडण धुणें धुवोनी पांटी डोईवरी । गवऱ्या वेचुन आणी घरीं ॥ प्रऱ्हादासी कसें तारिलें जळत अग्नीवर ॥ पांखरें० ॥ ३ ॥ चोख्यामेळ्याच्या घरीं देवानें सोडिली द्वादशी । तेव्हां तें श्रुत झालें रायासी ॥ नेलें पाचारुन रायें तेव्हां शिक्षा दिधली त्यासी । देवा तूं मार त्याचा खासी । अगाध तुझी माव कळेना **तुका** जोडितो कर॥ पांखरें० ॥ ४ ॥

## भजन

विटेवरी उभा कटावरि हात । काय मौजेचा पंढरिनाथ ॥

## पद

येईं गा तूं येईं गा तूं पंढरीच्या राया ॥ तुजवीण शीण वाटे क्षीण झाली काया ॥ध्रु०॥ याती हीन मती हीन कर्म हीन माझें । सर्वहि लज्जा सोडुनि बापा शरण मी आलों तुज ॥ १ ॥ दीननाथ दीनबंधू नाम तुम्हा साजे । पतित-पावन ऐसी ब्रीदावळी गाजे ॥ २ ॥ विटे-वरी उभा नीट कटावरी कर । तुका ह्मणे हेंचि आम्हां ध्यान निरंतर ॥ ३ ॥

## अभंग

येईं गे विठ्ठले अनाथाचे नाथे । माझे कूळदैवते पंढरीचे ॥ १ ॥ पंचही प्राणाचा उजळोनि दीप॥ सुंदर श्रीमुख ओंवाळीन ॥ २ ॥ मनाचा प्रसाद तुजलागिं केला । रंग भोग आपुला घेउनि राहें ॥ ३ ॥ आनंदाचा भोग घालीन

आसनीं । वैकुंठवासिनी तुझ्या नांवें ॥ ४ ॥ आपुलें ह्मणावें सनाथ करावें । भावें संचारावें हृदयघटीं ॥५॥ **नामा** ह्मणे माझे पुरवीं मनोरथ । देईं सदोदित प्रेमकळा ॥ ६ ॥

## पद

जन्मलाचि नाहीं तो मरेल काई । जिणें मरणें दोन्हीं नाहीं रे ॥ ध्रु० ॥ जनीं जीवन्मुक्त । वर्ततात हरिभक्त । सद्गुरुबोधें ते अच्युत रे ॥ १ ॥ जिणें आणि मरणें । येणें आणि जाणें । साधु तो अचल पूर्णपणें रे ॥ २ ॥ सेवितां साधूचे चरण । बाधीना दक्षिणायन । रामीं **रामदासीं** निजखूण रे ॥ ३ ॥

## अभंग

कर कटावरी तुळशीच्या माळा । ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥ १ ॥ ठेविले चरण दोन्ही

विटेवरी । ऐसें रूप हरी दावीं डोळां ॥ २ ॥ कटीं पीतांबर कांस मिरविली । दाखवीं वहिली ऐसी मूर्ति ॥ ३ ॥ गरुडपारावरी उभा राहिलासी । आठवे मानसीं तेंचि रूप ॥ ४ ॥ झुरोनि पांजरा होऊं पाहें आतां । येईं पंढरिनाथा भेटावया ॥ ५ ॥ **तुका** ह्मणे माझी पुरवावी आस । विनंति उदास करूं नये ॥ ६ ॥

## पद

होतें वैकुंठींच्या कोणीं। शिरलें अयोध्याभुवनीं । लागे कौसल्येचे स्तनीं । तेंचि भूत गे ॥ध्रु०॥ जातां कौशिक राउळीं । अवलोकिली भयंकर काळी । वनीं ताटिका निर्दाळी । तेंचि भूत गे ॥ १ ॥ मार्गीं जातां वनांतरीं । पाय पडला दगडावरी । पाषाणाची झाली नारी । तेंचि भूत गे ॥ २ ॥ जनकाचे अंगणीं गेलें । शंकराचें

धनु भंगिलें । वैदेही-अंगीं संचरलें । तेंचि भूत गे ॥३॥ जेणें सहस्रार्जुन वधिला । तो तात्काळ भ्याला त्याला । धनुष्य देउनि देह रक्षिला । तेंचि भूत गे ॥ ४ ॥ पितयाचे भाकेसी । कैकयीच्या वचनासी । मानुनि गेलें अरण्यासी । तेंचि भूत गे ॥ ५ ॥ चौदा संवत्सर तापसी । अखंड हिंडे वनवासीं । सांगातें भुजंग पोशी । तेंचि भूत गे ॥ ६ ॥ वाळीचें निर्दाळण । सुग्रिवाचें पाळण । तारी पाण्यावरि पाषाण । तेंचि भूत गे ॥ ७ ॥ वधिले रावण कुंभकर्ण । तोडी अमरांचें बंधन । राज्यीं स्थापिला विभीषण । तेंचि भूत गे ॥८॥ वामांगीं स्त्रियेला धरिलें । शरयूतीरीं धावुनि आलें । तेथें भरतासी भेटलें । तेंचि भूत गे ॥ ९ ॥ सर्व भूतांचें हृदय । नाम त्याचें

रामराय । **रामदास** नित्य गाय । तेंचि भूत गे ॥ १० ॥

## अभंग

उदार कृपाळू अनाथाचा नाथ । ऐकसील मात शरणागतां ॥ १ ॥ सर्व भार माथां चालविसी त्यांचा । अनुसरें वाचा काया मनें ॥ २ ॥ पाचारितां उभा राहसी जवळी । पाहिजे तें काळीं पुरवावें ॥ ३ ॥ चालतांही पंथ सांभाळीसी वाटे । वारिसील कांटे खडे हातें ॥ ४ ॥ **तुका** म्हणे चिंता नाहीं तुझ्या दासा । तूं त्यांचा कोंवसा सर्वभावें ॥ ५ ॥

## पद

हे दयाळुवा हे दयाळुवा । हे दयाळुवा स्वामी राघवा ॥ ध्रु० ॥ प्रथमां कां मला लाविली सवै । मग उपेक्षितां योग्य हें नव्हे ॥ १ ॥ सकळ जाणतां अंतरस्थिती । मग तुह्माप्रति

काय विनंति ॥ २ ॥ दास तुमचा वाट पाहतो । बोलतां नये कंठ दाटतो ॥ ३ ॥ झडकरी यावें आजि राघवें । आळ घेतली माझिया जिवें ॥ ४ ॥ विषय खंगला रंग भंगला । मन उतावीळ तुझे भेटिला ॥ ५ ॥ भक्तवत्सला हृदयकोमला । तुजविणें कळा तेचि अवकळा ॥ ६ ॥ चरणपंकजीं वृत्ती गुंतली। **रामदास** ह्मणे माझी सांड कां केली ॥७॥

## अभंग

तुझिया सत्तेनें वेदांसी बोलणें । सूर्यासी चालणें तुझिया बळें ॥ १ ॥ ऐसा तूं समर्थ ब्रह्मांडाचा धनी । वर्म हें जाणुनी शरण आलों ॥ २ ॥ मेघांनीं वर्षावें पर्वतीं बैसावें । वायूनें विचरावें सत्ते तुझे ॥ ३ ॥ **नामा** म्हणे कांहीं न हाले साचार । प्रभु तूं निर्धार पांडुरंगा ॥ ४ ॥

# पद

धांव बा देवराया । किती अंत पाहसी ॥ ब्रीद हें बांधुनियां । दीननाथ ह्मणविसी ॥ ध्रु० ॥ हीन दीन मतिमंद । माझी कीर्ति कां केली ॥ लाविसी नेत्र आतां । तरी ब्रीदावली गेली ॥ १ ॥ सर्वही जगामाजी । दास तुझा ह्मणविलों ॥ सोडिलें जरी मज त्वां । तरी वायां मी गेलों ॥ २ ॥ आधीं कां नाहीं माझा । अधिकार विचारिला ॥ पल्लवीं घेउनियां । नुपेक्षीं जगपाला ॥ ३ ॥ दोष हे आचरावे । हेंचि आह्मां उचित ॥ तवपदीं ब्रीद गर्जे । तारावे पतित ॥ ४ ॥ निशाण फडके तें । काष्ठ त्याचें मोल काय ॥ परी त्या अभिमानास्तव । रायाचें शिर जाय ॥ ५ ॥ दयाळू **देवनाथ** । कशासाठीं ह्मणविसी ॥

सोडिं सोडिं ब्रीदमाला । आह्मी जाऊं निर-यासी ॥ ६ ॥

## अभंग

विसांवा विठ्ठल सुखाची साउली । प्रेमपान्हा घाली भक्तांवरी ॥ १ ॥ दाखवीं चरण दाखवीं चरण । दाखवीं चरण नारायणा ॥ २ ॥ विठ्ठल आचार विठ्ठल आचार । दावीं निरंतर पाय आतां ॥ ३ ॥ **नामा** ह्मणे नित्य बुडालों संसारीं । धांवोनियां धरीं हातीं मज ॥ ४ ॥

## पद

रामा दयाघना कृपा करुनि मज पाहीं । जरि बहु अपराधी खराचि मी अन्यायी । तुजविण पाहतां रे संसारीं सुख नाहिं निमिषभर कांहिं निमिषभर कांहीं ॥ रामा० ॥ ध्रु० ॥ कोठिल कोण मी न जाणिला हा पत्ता । आजवरि

अज्ञानें मिरविली विद्वत्ता । देहात्मत्वाची स्थिति झाली उन्मत्ता । येउनि जन्मा रे व्यर्थ श्रमविली आई हेंचि मनि खाई ॥ रामा० ॥ १ ॥ अनाथनाथ तूं मायबापही तैसा । परि मी उद्भवलों पतित पापी ऐसा । तरि निज नामाचें महत्त्व सांडिसि कैसा । पावननामा रे जाच देति रिपु साहि साच वपु दाही ॥ रामा० ॥२॥ करुणासागरा राघवा रघुराजा । विषयीं पांगला नका करुं जिव माझा । भजनीं चांगला मिळवीं साधुसमाजा । भुलुनि प्रपंचा रे श्रमुनि भ्रमुनि ठायिं ठायिं हरुनि वय जाई ॥ रामा० ॥ ३ ॥ सच्चित्सुख तो तूं परब्रह्म केवळ । विश्वीं व्यापला तरंगीं जैसें जळ । अवतरतोसी हें उपासकांचें बळ । भक्तजनाला रे चित्रविचित्र उपायिं सतत सुखदायी ॥ रामा० ॥ ४ ॥ विष्णु कृष्ण

**जगन्नाथ** तुझा मी लेक । चरणीं शरण दे स्मरण आपुलें एक । हातीं संतांची सेवा घडविं अनेक । जगदभिरामा रे मानस हें तव पायिं जडविं लवलाहीं ॥ रामा० ॥ ५ ॥

## अभंग

अवघाचि संसार सुखाचा करीन । अवघ्या भावें धरिन विठ्ठल एक ॥ १ ॥ अवघा शीणभाग हिरोनि घेईल । अवघेंचि तोडील मायापाश ॥ २ ॥ अवघा जीवलग ह्याचि पैं होईल । अवघा हा घेईल भार माथां ॥ ३ ॥ अवघा त्रिविध ताप क्षणें मालवील । अवघा चालवील योगक्षेम ॥ ४ ॥ अवघ्या संसाराचें बसणें मोडील । अवघेंचि तोडील मायाजाळ ॥ ५ ॥ **नामा** ह्मणे अवघी सोडा मिथ्याभ्रांती। विठ्ठलेंविण विश्रांति नाहीं कोठें ॥ ५ ॥

## पद

पतितपावन दीनदयाघन करुणाकर देवा । श्रवण मनन निदिध्यासें निरंतर घडो तुझी सेवा ॥ ध्रु० ॥ परमप्रकाशक तेजोमय हें गुप्त तुझें स्वरूप । परतुनी दृष्टी पाहणें पाहतां निर्गुण हें अरूप । परमार्थ परिपूर्ण साधनीं भरलें हें अमुप । परात्पर तूं अंतरसाक्षी हृदयभुवन-दीप ॥ पतित० ॥ १ ॥ तीन्ही संधी साधुनि घेणें सुख हें एकांतीं । तीन्ही गुण हे निरसुनि शून्यीं उगवालि हे ज्योति । तीक्ष्णज्ञानें पुरतें पहातां कुळ नाहीं याती । तितुकि प्रतिति बाणलिया मग दिवस नाहिं राती ॥ २ ॥ तल-गत तलगत सकलहि जिव हे चित्सिंधूआंत । तरंग जैसे उमटत भासत नासत हे बहुत । तरणोपाय सांगति साधू मत हें सिद्धांत । तरले

**जगन्नाथ** तुझा मी लेक । चरणीं शरण दे स्मरण आपुलें एक । हातीं संतांची सेवा घडविं अनेक । जगदभिरामा रे मानस हें तव पायिं जडविं लवलाहीं ॥ रामा० ॥ ५ ॥

## अभंग

अवघाचि संसार सुखाचा करीन । अवध्या भावें धरिन विठ्ठल एक ॥ १ ॥ अवघा शीणभाग हिरोनि घेईल । अवघेंचि तोडील मायापाश ॥ २ ॥ अवघा जीवलग ह्याचि पैं होईल । अवघा हा घेईल भार माथां ॥ ३ ॥ अवघा त्रिविध ताप क्षणें मालवील । अवघा चालवील योगक्षेम ॥ ४ ॥ अवध्या संसाराचें वसणें मोडील । अवघेंचि तोडील मायाजाळ ॥ ५ ॥ **नामा** ह्मणे अवघी सोडा मिथ्याभ्रांती। विठ्ठलेंविण विश्रांति नाहीं कोठें ॥ ५ ॥

## पद

पतितपावन दीनदयाघन करुणाकर देवा । श्रवण मनन निदिध्यासें निरंतर घडो तुझी सेवा ॥ ध्रु० ॥ परमप्रकाशक तेजोमय हें गुप्त तुझें स्वरूप । परतुनी दृष्टी पाहणें पाहतां निर्गुण हें अरूप । परमार्थ परिपूर्ण साधनीं भरलें हें अमुप । परात्पर तूं अंतरसाक्षी हृदयभुवन-दीप ॥ पतित० ॥ १ ॥ तीन्ही संधी साधुनि घेणें सुख हें एकांतीं । तीन्ही गुण हे निरसुनि शून्यीं उगवलि हे ज्योति । तीक्ष्णज्ञानें पुरतें पहातां कुळ नाहीं याती । तितुकि प्रतिति बाणलिया मग दिवस नाहिं राती ॥ २ ॥ तळ-गत तळगत सकळहि जिव हे चित्सिंधूआंत । तरंग जैसे उमटत भासत नासत हे बहुत । तरणोपाय सांगति साधू मत हें सिद्धांत । तरले

येणें मार्गें बहुत देही देहातीत ॥ ३ ॥ पान्हा पिउनि प्रेमफळेचा हरिलें संकल्पा । पाहतां परंपरेनें भवभय दोरीच्या सापा । पारंगत हे करुनि सकळही अहं सोहं कापा । पारख करितां तटस्थ जाहल्या नेत्रांच्या मलपा ॥ ४ ॥ वरिली शांती अंगिं जाहला पूर्ण अनुभव । वरदबळें सद्गुरुप्रसादें अक्षय वैभव । वमिलें सकळहि मायिक आतां नाहीं भयभव । वदली वाणी मौनपणीं हें रूप नाहिं नांव ॥ ५ ॥ नम्र होउनी वृत्ति लागली अलक्ष हें लग्न । नटत नटत हे लोक सकळही होउनियां मग्न । नख नलगे तेथ देहबुद्धिचें विकासलें गगन । नमुनि **सोहिरा** म्हणे किं अवघा अलख निरंजन॥६॥

## अभंग

संसाराच्या तापें तापलों मी देवा । करितां

या सेवा कुटुंबाची ॥ १ ॥ ह्मणवोनी तुझे आठविले पाय । येईं वो माझे माय पांडुरंगे॥२॥ बहुतां जन्मींचा झालों भारवाही । सुटितेंसें नाहीं वर्म ठावें ॥ ३ ॥ वेढियेलों चोरीं अंत-र्बाह्यात्कारीं । कणवा न करी कोणी माझी॥४॥ बहु पांगविलों बहु नागविलों । बहु दिवस झालों कासाविस ॥ ५ ॥ **तुका** ह्मणे आतां धांव घालीं वेगीं । ब्रीद तुझें जगीं दीननाथा ॥ ६ ॥

## पद

तुजाविण रे भगवान् कोठेंचि मन हें न जडो ॥ ध्रु० ॥ मिथ्या ऐसें दिसोनि सकळिक विषयसौख्य नावडो । प्रारब्धास्तव जे जे समयीं घडेल तें सुखिं घडो ॥ १ ॥ योग लक्ष निज धैर्यबळें जीव मोहांत न सांपडो । आयुष्य सरल्या कधीं तरी देह पडेल तेथें पडो ॥ २ ॥

वैराग्यज्ञानें प्रचंड होउनि अखंडित कडकडो। प्रपंचरहाटीं वर्तत असतां कोणिकडे न अडो ॥ ३ ॥ ह्मणे **सोहिरा** विपरीत बुद्धिकुसंग हा विघडो। निमिष साधुनी शुद्ध ब्रह्मिचें मोक्षद्वार उघडो ॥ ४ ॥

## अभंग

अगा करुणाकरा करितसें धांवा। या मज सोडवा लवकरी ॥ १ ॥ ऐकोनियां माझीं करुणेचीं वचनें। व्हावें नारायणें उतावीळ॥२॥ मागें पुढें अवघा दिसे रिता ठाव। ठेवुनि पायीं भाव वाट पाहें ॥ ३ ॥ उशीर तो आतां न पाहिजे केला। अहो जी विठ्ठला मायबापा॥४॥ उरलें तें एक हेंचि मज आतां। अवघें विचारितां शून्य झालें ॥५॥ **तुका** ह्मणे आतां करीं कृपादान। पाउलें समान दावीं डोळां ॥ ६ ॥

# पद

भगवानजी हा करिल तें सुखें करूं । अनंत कोटी ब्रह्मांडनायक सदैव हाचि स्मरूं ॥ ध्रु० ॥ अंतरसाक्षी असोनी न दिसे अनादि हा ईश्वरू । स्थावर जंगम व्यापुनि उरला अपार विश्वंभरू ॥ १ ॥ आचार धरुनि साचार भावें विचारणा विवरूं । दुरित निवारी हाची निश्चय मनीं दृढ धरूं ॥ २ ॥ कोठें तरि वावरूं परि हें शेवट आवरूं । कर्मभोग आणि ज्ञानयोग हा समतुल्यचि सावरूं ॥ ३ ॥ ब्रह्मार्पण हें करुनि सकळही अहंकृति परिहरूं । अलक्ष भुवनीं लावुनि लय हें आनंदें काळ हरूं ॥ ४ ॥ प्रपंचरचना देखुनि कधींच मन न बावरूं ॥ म्हणे **सोहिरा** कैवल्य जीव हा जिताचि असतां मरूं ॥ ५ ॥

## अभंग

अवघी चित्तवृत्ती एकवटून जेणें । अवघा धरिला मनें पांडुरंग ॥ १ ॥ अवघें सुख एक तयासी पावलें । अवघें सफळ झालें जन्म त्याचें ॥ २ ॥ अवघीं व्रतें दानें केलीं पैं तयानें। जयाचें विठ्ठलीं मन जडलें ॥ ३ ॥ नित्य विठ्ठल नाम गर्जती सप्रेम । अवघे नित्यनेम झाले त्यांचे ॥ ४ ॥ अवघे इष्टमित्रबंधुमातापिता । केला आवडता पांडुरंग ॥ ५ ॥ **नामा** म्हणे ऐसे अवघे संप्रदाय । मिळोनि धरा पाय विठोबाचे ॥ ६ ॥

## पद

ऐसा जन्म नको हा मला । देवा शरण येतों मी तुला ॥ ध्रु० ॥ देह हें जाण जिवाला मोट । बांधुनि केलासे कडेलोट । तेथें श्रमतों

भरतां पोट । दुःखें भोगिलीं कोटिनकोट ॥१॥ जन्मांतरिंचें पुण्यपाप । प्राप्त जाहले त्रिविध ताप । आयुष्याचें भरलें माप ॥ डोळां पडली मोहाची झांप ॥ २ ॥ आपण पडला असतां बंदी । आणिक लोकांलाही निंदी । दुष्ट दुरात्मा हा द्वंद्वधी । करोनि होत समंधि ॥ ३ ॥ याला सुचेनाची सुटका । धरितो अभिमान हा लटका । अडला देहबुद्धिच्या अटका । ईश्वर स्मरेना एक घटका ॥ ४ ॥ न रुचे संताची सोबत । पाठीं धांवेना लोंबत । नाहीं योगाला झोंबत । नायके अनाहत नौबत ॥ ५ ॥ **सोहिरा** म्हणे यांतुनि सोडीं । आवरीं मानसाच्या ओढी । दहाही इंद्रियांतें कोंडीं । लावीं आत्मस्वरूपीं गोडी ॥ ६ ॥

## अभंग

ज्याचे मुखीं हरि तोचि धन्य जगीं । तरला पैं वेगीं वेदु बोले ॥ १ ॥ हरि हाचि आम्हां तत्त्व पैं सोहपें । हरितील पापें हरिनामें ॥२॥ वैकुंठीचें सुख नलगे पैं चित्तीं। हरि हेचि मूर्ति विठ्ठल ध्यावो ॥ ३ ॥ याचेनि स्मरणें कैवल्य साचार । **सोपान** विचार हरि जपे ॥ ४ ॥

## पद

उत्तम जन्मा येउनि रामा गेलों उगा वायां । दुष्ट पातकी शरण मी आलों सत्वर तव पायां ॥ ध्रु० ॥ आधीं चुकलों मुकलों मी निज वेद-स्वाध्याया । कर्में श्रौतस्मार्त न घडलीं सद्गति साधाया । पुराण परिसुनि सादर झालों यशहि न तव गाया । स्वस्थपणें कधिं नाहिं फावलें तुजला पूजाया ॥ १ ॥ आर्जविलें बहु लवण

भंजनें व्याह्या जावाया । क्षुधित अतिथि कधिं
नाहिं घेतला प्रेमें जेवाया । उदार कर कधिं
केला नाहीं पैसा एक द्याया । नाम फुकटचें
तेंहि न आलें स्वामी वदना या ॥ २ ॥ कपट
करुनियां निपट भोंदिल्या बहुत आया बाया ।
केली धनगृहक्षेत्रस्त्रीपशुशिशुवर बहु माया ।
नित्य सजविली वसनभूषणें निंद्या ही काया ।
सिद्ध ठेविली सदाहि रसना सज्जन निंदाया॥३॥
वटवट निशिदिनिं केली चहुंकडे मन हें रमवाया।
केलें स्नान न संध्या जप तप दुष्कृत शमवाया ।
क्षणहि न केला साधुसमागम भवदव निववाया।
सद्यःकामुक झालों पाहुनि परधन परजाया
॥ ४ ॥ नाहीं विद्या कला कुशलता तुजला
रिझवाया । शुद्ध मधुर वाणीही नाहीं तुजला
विनवाया । बुद्धिहि नाहीं न कळे कांहीं शर-

णागत व्हाया । थकलि मजला सर्वथा दयाळा स्वहित आचराया ॥ ५ ॥ हरि कनवाळू करि दीनावरि करुणेची छाया । निगमनगारा गर्जे ऐसा निखिलां कळवाया । यावरि विश्वासुनियां आलों जवळ तुझ्या पायां । शुद्ध दगड हा **पंत विठ्ठल** स्वामी रघुराया ॥ ६ ॥

## अभंग

यातिकुल माझें गेलें हरपोनी । श्रीरंगावांचुनी आनु नेणें ॥ १ ॥ किति शिकवाल मज वेळोवेळां । मी तया गोवळा रातलिये ॥ २ ॥ अष्टभोग भोगणें मातें नाहीं चाड । भक्ति प्रेम गोड लेइऊं गे माये ॥ ३ ॥ **बापरखुमादेवि-वरु** जीवींचा जिव्हाळा । कांहीं केल्या वेगळा नव्हे गे माये ॥ ४ ॥

## पद

राघवा तुझा तुझा लागो छंद । न जडो दुर्मतिचा गंध ॥ ध्रु० ॥ न रुचो विषय विषय विषावाणी । आवडो संतांची वाणी ॥ १ ॥ अंगीं रोमांच रोमांच नयनपाणी । झिरपो तुझिं गातां गाणीं ॥ २ ॥ विठ्ठलपंतासी, पंतासि होंचि काम । आवडो सदा तुझें नाम ॥ ३ ॥

## अभंग

तुझे दारींचा कुतरा । नको मोकलूं दातारा ॥ १ ॥ धरणें घेतलें दारांत । नको धरून उठवूं हात ॥ २ ॥ बहु झालों लंड । पायीं घातली मुरकुंड ॥ ३ ॥ तुका ह्मणे जगजीवना । नींद पाहें नारायणा ॥ ४ ॥

## पद

हरि हा आनंदाचा कंद । आनंदाचा कंद उभा पुढें भक्तसखा गोविंद । हरि हा आनंदाचा कंद ॥ ध्रु० ॥ सजलनीरदश्यामतनू नवरत्नखचित सौवर्णमुकुट शिरपेंच तुरा वरि कलगि विराजित कुटिलालक निटिलासि कस्तुरी तिलक केशरी-गंध ॥ हरि० ॥ १ ॥ श्रवणिं मनोहर मकर-कुंडलें फुल्लगल्ल कर्णांत दीर्घसुप्रसन्न–लोचन इंदुवदन तिलपुष्प–नासिका कुंदरदन हनु अधर बिंबगत हास्य मंद मंद ॥ हरि०॥ २ ॥ कंबुकंठ कौस्तुभाभरण शुभपटीर पंक नवद्रव-रुषित वीपरांस केयूरविभूषित कनककटक सहरत्न तोडर प्रभानुभाषित शंखसुदर्शन गदा-सरोरुह लसच्चतुर्भुज ललितांगुलि धृतरत्नमुद्रिका-वृंद ॥ हरि० ॥ ३ ॥ विशाल वक्षस्थळीं रमा-कुचकुंभ कुंकुमालेपलित श्रीवत्सलांछित सुवर्ण-

यज्ञोपवीत मध्यवलित्रय वंधुर निम्ननाभि तनु रोमरानिलुठदुत्तरीयपट पारिजातनवकुसुम तुळ-सिकामिश्रहारपादाग्रचुंबि नभ भरुनि जयाचा मधुर सूटला गंध ॥ हरि० ॥ ४ ॥ कटीं तटीं जरिकांठि पीत कौशेयवास पटवास सुवासित विचित्र शृंखल अगणित मणि झाणि झणित मंजुल कणित किंकिणी विपुलतरोरु-द्वंद्वविराजित जानुजंघ सुकुमार सरलतर कनक वलययुत रत्नतोडरें मंजुमंजु सिंजानहरिमंजीर परिष्कृत सहजरक्तमृदु वज्र अंकुशध्वजांबुजांकित वृत्त वृत्त उत्तुंग रक्तनखचक्रवालसत्पुण्य चंद्रिका-ध्वस्त महद्धृदयांधतमस मंदाकिनीमाहेरचरण-दुगधृत रणरणिक जयाच्या क्षणिक ध्यानें तुटती झटिति सर्व भवबंध ॥ हरि० ॥६॥ कोटि कोटि कंदर्परूप लावण्यदर्पहर ध्यान मनोहर अनंतजन्म

मनोमलपटलीनिर्मूलनकर भक्तिगम्यतापत्रयभंजन आसेचनक ध्यानिं पहातां वाटे जणुं नयनांत भरावें हुंगावें दृढ आलिंगावें कीं चुंबावें विसरतसे संसार सर्वही संतत याचा पंत विठ्ठला सहज लागला छंद ॥ हरि० ॥६॥

## पद

हातीं पांवा सेहरी काठी । माथां दधीबोणें वाटी ॥ चारतां गाईचे पाठीं । घालिती डोहो ॥ १ ॥ सखा गोपाल ज्यांचा । महिमा अपार त्यांचा ॥ आनंदें खेळे जयांचा । गोपाळ गडी ॥ २ ॥ मांडिया थापटिती । भोई फक फोडिती ॥ हमामा तो घालिति । होती मावारे बळी ॥ ३ ॥ लाखी रंगी घोंगडी । संवगडे गोपाळगडी ॥ देखोनि यमुनेची थडी । आनंद बहु ॥ ४ ॥ पूर्ण तृप्त झाल्या गाई । बैसल्या

कळंबाछाई ॥ शिदोऱ्या आणा रे भाई । सांवळा ह्मणे ॥ ५ ॥ सम खडकावरी ॥ घोंगडी पसरोनि वरी । मध्यें बैसले हरि । भोंवते सखे ॥ ६ ॥ दहींभात शिदोरी । लोणचीं अंगोळ्या करीं ॥ चाखोनि ह्मणती हरि ॥ गोड तें घेईं ॥ ७ ॥ अवघे ह्मणती सांवळ्यास । आधीं घेईं आमुचा ग्रास ॥ कान्होबा तुझाही ग्रास । घालीं तूं आह्मां ॥ ८ ॥ स्वानंदें खेळती । वांकुल्या दाविती ॥ स्वर्गींचे देव टाकिती । उच्छिष्ट ज्यांचें ॥ ९ ॥ गुराखी ह्मणाल जरी । देव न पावती सरी ॥ ब्रम्हा वंदितो शिरीं । चरणधुळी ॥ १० ॥ जयराम कृष्णदास । सेवुनि तयांचें शेष ॥ निवाला सावकाश । स्वानंदें खेळे ॥ ११ ॥

मनोमलपटलीनिर्मूलनकर भक्तिगम्यतापत्रयभं-
जन आसेचनक ध्यानिं पहातां वाटे जणुं
नयनांत भरावें हुंगावें दृढ आलिंगावें कीं
चुंबावें विसरतसे संसार सर्वही संतत याचा
पंत विठ्ठला सहज लागला छंद ॥ हरि० ॥६॥

पद

हातीं पांवा मोहरी काठी । माथां दधीबोणें
वाटी ॥ चालतां गाईंचे पाठीं । घालिती डोहो
॥ १ ॥ सखा गोपाल ज्यांचा । महिमा अपार
त्यांचा ॥ आनंदें खेळे जयांचा । गोपाळ गडी
॥ २ ॥ मांडिया थापटिती । भोई फक
फोडिती ॥ हमामा तो घालिति । होती माघारे
बळी ॥ ३ ॥ लाखी रंगी घोंगडी । संवगडे
गोपाळगडी ॥ देखोनि यमुनेची थडी । आनंद
बहु ॥ ४ ॥ पूर्ण तृप्त झाल्या गाई । बैसल्या

कळंबाछाई ॥ शिदोऱ्या आणा रे भाई । सांवळा ह्मणे ॥ ५ ॥ सम खडकावरी ॥ घोंगडी पसरोनि वरी । मध्यें बैसले हरि । भोंवते सखे ॥ ६ ॥ दहींभात शिदोरी । लोणचीं अंगोळ्या करीं ॥ चाखोनि ह्मणती हरि ॥ गोड तें घेईं ॥ ७ ॥ अवघे ह्मणती सांवळ्यास । आधीं घेईं आमुचा ग्रास ॥ कान्होबा तुझाही ग्रास । घालीं तूं आह्मां ॥ ८ ॥ स्वानंदें खेळती । वांकुल्या दाविती ॥ स्वर्गींचे देव टाकिती । उच्छिष्ट ज्यांचें ॥ ९ ॥ गुराखी ह्मणाल जरी । देव न पावती सरी ॥ ब्रम्हा वंदितो शिरीं । चरणधुळी ॥ १० ॥ **जयराम कृष्णदास** । सेवुनि तयांचें शेष ॥ निवाला सावकाश । स्वानंदें खेळे ॥ ११ ॥

## अभंग

देवासी अवतार भक्तांसी संसार । दोहींचा विचार एकपणें ॥ १ ॥ भक्तांसी सोहळे देवाचिया अंगें । देव त्यांच्या संगें सुख भोगी ॥२॥ देवें भक्तां रूप दिलासे आकार । भक्तीं त्याचा पार वाखाणिला ॥ ३ ॥ एका आंगीं दोन्हीं झालीं हीं निर्माण । देवभक्तपण स्वामिसेवा ॥ ४ ॥ तुका म्हणे येथें नाहीं भिन्न भाव । भक्त तोचि देव देव भक्त ॥ ५ ॥

## पद

ध्यातां सुतकामिनी । जातां दिनयामिनी । घडीभरी तरी मनीं । आठवा राम ॥ १ ॥ धंदा न सुटे जरी । सुखें असा व्यापारीं । वाचे आणि अंतरीं । आठवा राम ॥ २ ॥ करितां संसारकाम । वाचे असों द्यावा राम । शिवाचें

विश्रामधाम । आठवा राम ॥ ३ ॥ दिवस गेला व्यापारीं । निद्रेखालीं रात्री सारी । गेले दिवस दोनी चारी । आठवा राम ॥ ४ ॥ काळ जातो घडी घडी । मोडितो देहाची घडी । गोष्टी हे तों उघडी । आठवा राम ॥ ५ ॥ कायावाचामनें करून । प्रार्थितसे **वामन** । अहो भावें हें वचन । आठवा राम ॥ ६ ॥

## अभंग

देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥ १ ॥ हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा । पुण्याची गणना कोण करी ॥२॥ असोनि संसारीं जिव्हे वेगु करीं । वेदशास्त्र उभारी बाह्य सदां ॥३॥ **ज्ञानदेव** म्हणे व्यासाचिया खुणा । द्वारकेचा राणा पांडवां घरीं ॥४॥

## पद

सांगड बांधा रे भक्तीची । रघुनाथनामाची ॥ ध्रु० ॥ संसार सागर सागर । भरला जातो पूर ॥ १ ॥ प्रपंच भोंवरा भोंवरा । फिरतसे गरगरां ॥ २ ॥ लाटा उसळती विषयाच्या । बहुत प्रपंचाच्या ॥ ३ ॥ नरहरि **बोधला** बोधिला । हरिनामीं रंगला ॥ ४ ॥

## अभंग

हरिवंश पुराण हरिनामकीर्तन । हरिविण सौजन्य नेणे कांहीं ॥ १ ॥ तया नरा लाधलें वैकुंठ जोडलें । सकळही घडलें तीर्थाटन ॥२॥ मनोमार्गें गेला तो येथें मुकला । हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य ॥ ३ ॥ **ज्ञानदेवा** गोडी हरिनामाची जोडी । रामकृष्णीं आवडी सर्वकाळ ॥ ४ ॥

## पद

कोणिकडे तुह्मीं जातां, जातां जिवलगा । घडीभर बसा, गोष्ट सांगा ॥ध्रु०॥ विरह तुमचा जी तुमचा जी साहीना । चित्त पायांवीण पाहीना ॥ माझी कशी दया, दयाच येईना । कठिणता काय ह्मणुनि स्वमना ॥ तुम्हीं धरियली, धरियली जगजीवना । हात जोडितें विनति माना ॥ दासी मी तुमची, तुमची जिवलगा ॥ घडीभर० ॥ १ ॥ आधिं घेतलें, घेतलें मला पदरीं । लोटितां काय म्हणुनि दूरी ॥ आहें अपराधी, अपराधी गोष्ट खरी । अंगिकारिल्यावरी दूरी ॥ उपेक्षूं नये, नये जी निर्धारीं । शरण आलिया दीनोद्धारीं ॥ चला या घरीं, घरीं लागवेगा ॥ घडीभर० ॥ २ ॥ साधनांतरीं, अंतरीं लक्ष कोटी । साधली बहु तुम्हांसाठीं ॥ गिरीकंदरीं,

## पद

सांगड बांधा रे भक्तीची । रघुनाथनामाची ॥ ध्रु० ॥ संसार सागर सागर । भरला जातो पूर ॥ १ ॥ प्रपंच भोंवरा भोंवरा । फिरतसे गरगरां ॥ २ ॥ लाटा उसळती विषयाच्या । बहुत प्रपंचाच्या ॥ ३ ॥ नरहरि बोधला बोधिला । हरिनामीं रंगला ॥ ४ ॥

## अभंग

हरिवंश पुराण हरिनामकीर्तन । हरिविण सौजन्य नेणे कांहीं ॥ १ ॥ तया नरा लाधलें वैकुंठ जोडलें । सकळही घडलें तीर्थाटन ॥ २ ॥ मनोमार्गें गेला तो येथें मुकला । हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य ॥ ३ ॥ ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी । रामकृष्णीं आवडी सर्वकाळ ॥ ४ ॥

## पद

कोणिकडे तुह्मीं जातां, जातां जिवलगा । घडी-
भर बसा, गोष्ट सांगा ॥ध्रु०॥ विरह तुमचा जी
तुमचा जी साहीना । चित्त पायांवीण पाहीना ॥
माझी कशी दया, दयाच येईना । कठिणता
काय ह्मणुनि स्वमना ॥ तुम्हीं धरियली, धरियली
जगजीवना । हात जोडितें विनति माना ॥
दासी मी तुमची, तुमची जिवलगा ॥ घडीभर०
॥ १ ॥ आधिं घेतलें, घेतलें मला पदरीं ।
लोटितां काय म्हणुनि दूरी ॥ आहें अपराधी,
अपराधी गोष्ट खरी । अंगिकारिल्यावरी दूरी ॥
उपेक्षूं नये, नये जी निर्धारीं । शरण आलिया
दीनोद्धारीं ॥ चला या घरीं, घरीं लागवेगा ॥
घडीभर० ॥ २ ॥ साधनांतरीं, अंतरीं लक्ष
कोटी । साधली बहु तुम्हांसाठीं ॥ गिरीकंदरीं,

कंदरीं जी कपाटीं । बैसलें धैर्य धरुनि पोटीं ॥ योग साधिला, साधिला महाहाटीं । झालें मी फार हिंपुटी ॥ दृष्टि तुझी न पडा, न पडा भवभंगा ॥ घडीभर० ॥ ३ ॥ अंतरगृहीं, गृहीं जी सात बंकीं । अष्ट भावाच्या पर्यंकीं ॥ प्रेम-भरित म्यां, भरित म्यां रचिली कीं । भक्तिनें सुमनसेज निकी ॥ लहर मदनाची, मदनाची महाबांकी । दुःख दे मला जाचते कीं ॥ चला या त्वरें, त्वरें अंगसंगा ॥ घडीभर० ॥ ४ ॥ द्वैत अद्वैत गाळुनियां सहजे । स्वरूपीं अखंड मन विरजे ॥ अक्षयीं पहुडूं, पहुडूं सुखसेजे । भोगूं स्वानंदसायुज्य ॥ हेंचि मागणें मागणें गुरूराजे । इतुकें दान मला दीजे ॥ देव-नाथाच्या नाथाच्या अंतरंगा ॥ घडीभर० ॥५॥

## अभंग

आणिकाची आस नको करूं मना । चिंतीं तूं चरणा विठोबाच्या ॥ १ ॥ वाचे नाम गाये वाचे नाम गाये । वाचे नाम गाये विठोबाचें ॥ २ ॥ कर कटीं उभा चंद्रभागे तटीं । पुंडलिकापाठीं धरुनि ध्यान ॥ ३ ॥ ठेविले चरण दोन्ही विटेवरी । वाट पाहे हरि भाविकांची॥४॥ **एकाजनार्दनीं** उभारुनी बाहे । आलंगित आहे भाळेभोळे ॥ ५ ॥

## पद

माई मैंने गोविंद लीन्हो मोल ॥ ध्रु० ॥ कोई कहे हलका कोई कहे भारी । लियो है तराजू तोल ॥ १ ॥ कोई कहे ससता कोई कहे महेंगा । कोई कहे अनमोल ॥ २ ॥ ब्रिंदावनके कुंजगलिनमो । लीयो है बजाके

ढोल ॥ ३ ॥ **मिराके** प्रभु गिरिधर नागर । पुरबजनमके बोल ॥ ४ ॥

## पद

अनाथ मी हीन दीन दरिद्री, भजन नेणें कांहीं । तुजविण मज या जगीं पाहतां कोणीच नाहीं ॥ ध्रु० ॥ ज्ञान कळेना, ध्यान कळेना, मन वळेना देवा । विद्या नाहीं, वैभव नाहीं, ऐसा पूर्विल ठेवा ॥ १ ॥ युक्ति असेना, बुद्धि असेना शांति वसेना अंगीं । **रामदास** म्हणे दयाळा ऐसा मी भवरोगी ॥ २ ॥

## अभंग

नेणें भक्तिभाव ज्ञानकळा कांहीं । माझें मज ग्वाही देतें मन ॥ १ ॥ नेणें क्रियाकर्म स्नान-संध्या कांहीं । माझें मज ग्वाही देतें मन ॥ २ ॥

नेणें योगयाग जपतप कांहीं । माझें मज गाही देतें मन ॥ ३ ॥ **देवनाथ** म्हणे मी हीन दीन पामर । परि अंगिकार केला तुम्ही ॥४॥

## पद ( राग गौरी )

श्रीरामचन्द्र कृपाल भजुमन, हरण भवभय दारुणं । नवकञ्जलोचन कञ्जमुखकर कञ्जपद कञ्जारुणं ॥ कन्दर्प अगणित अमित छबि नवनीलनीरजसुन्दरं । पटपीत मान हुँ तडित रुचिशुचि नौमि जनकसुतावरं ॥ भजु दीन-बन्धु दिनेश दानवदैत्यवंशनिकन्दनं । रघुनन्द आनंदकन्द कोशल चन्द दशरथनन्दनं ॥ शिरमुकुटकुण्डल तिलक चारु, उदार अंगवि-भूषणं । आजानुभुज शरचापधर, संग्रामजित खरदूषणं ॥ इति वदत **तुलसीदास** शंकर

शेषमुनिमनरञ्जनं । मम हृदयकञ्जनिवासकरि कामादिखलदल गञ्जनं ॥ १ ॥

## अभंग

अलंकारापुरनिवासिनी । ज्ञानाबाई माय बहिणी ॥ १ ॥ आम्हा लेंकुरांची चिंता । वागवावी कृपावंता ॥ २ ॥ मी तों आहें यातिहीन । माझा राखीं अभिमान ॥३॥ करुनी विनवणी । **सेना** लागतो चरणीं ॥ ४ ॥

## पद (झंपा)

रामजपु रामजपु रामजपु रामजपु रामजपु मूढ मन बारवारं । सकल सौभाग्य सुखखानि जियजानि सठ, मानि विश्वास वद वेदसारं ॥ कोशला इन्द्र नवनील कंजाभतनु, मदनरिपु कञ्जहृदि चञ्चरीकं । जानकी रवन सुखभवन

भुवनैकप्रभु, नाम भज स्मर परमकारुणीकं ॥
दनुजवन धूमध्वज पीन आजानुभुज, दण्ड
कोदण्ड वर चंडवानं । अरुणकर चरण मुख
नयन राजीव गुणअयन बहुमयन शोभानिधानं॥
वासना वृन्द कैवार दिवाकर काम, क्रोध
मद कञ्ज कानन तुषारं । लोभ अति मत्त
नागेंद्र पञ्चाननं, विग्रहित हरण संसारभारं ॥
केशवं क्लेशहं केशवन्दित पदद्वन्द मन्दाकिनी
मूलभूतं । सर्वदानंद सन्दोह मोहापहं घोर
संसार पाथोधि पोतं ॥ शोक सन्देह पाथोद
पटलानिलं, पापपर्वत काठिन कुलिशरूपं ।
सन्तजनकामधुकधेनु विश्रामप्रद नाम कलिकलु-
षभञ्जन अनूपं॥ धर्मकल्पद्रुमं नाम हरिधामपथ,
सम्बलं मूलमिदमेवमेकं । भक्ति वैराग्य विज्ञान
सम दान दम, नाम आधीन साधन अनेकं ॥

तेन तप्तं हुतं दत्त मेवाखिलं, तेन सर्वंकृतं कर्म जालं । येन श्रीरामनामामृतंपानकृत मनिश मनवद्य मवलोक्य कालं ॥ श्वपच खल भिल्ल यमनादि हरिलोकगत, नामबल विपुल मति मलिन परसी । त्यागि सब आस संत्रास भव-पास असि, निसित हरिनाम जपु दास तुलसी ॥ १ ॥

## अभंग

आजी सोनियाचा दिवस । दृष्टीं देखिलें संतांस ॥ १ ॥ जीवा सुख थोर जाहलें । माझें माहेर भेटलें ॥ २ ॥ अवघा निरसला शीण । संतचरण देखतां ॥ ३ ॥ आजी दिवाळी-दसरा । सेना म्हणे आले घरा ॥ ४ ॥

## पद ( राग देस, दादरा. )

दीनको दयाल दानि, दूसरो न कोऊ ।

जासो दीनता कहौं मैं, देखौं दीन सोऊ ॥ सुर मुनिनर नाग असुर, साहब तौ घनेरे । तौलों जौलों रावरे न, नेकु नयन फेरे ॥ त्रिभुवन तिहुँकाल विदित, बदत बेद चारी । आदि मध्य अन्त राम, साहबी तिहारी ॥ तुम्हहि मांगि मांगनोन, मांगनो कहायो । सुनि सुभाव शील सुयश याचन जन आयो ॥ पाहन पशु व्याध विहँग, अपने करि लीन्हे । महाराज दशरथके, रंक राय कीन्हे ॥ तूं गरीबको निवाज हौं गरीब तेरो । वारक कहिये कृपाल, **तुलसिदास** मेरो ॥ १ ॥

## अभंग

तुम्ही संत कृपानिधी । सांभाळावा हा दुर्बुद्धी ॥ १ ॥ तुम्हा आहे शरणांगत । तरी तारावा पतित ॥ २ ॥ अधिकार नाहीं ।

नकळे भक्तिभाव तोही ॥ ३ ॥ वागवा अभि-
मान । **सेना** नाहवी यातिहीन ॥ ४ ॥

## पद ( खमाज )

तूँ दयाल दीन हौं तूं दानि हौं भिखारी । हौं
प्रसिद्ध पातकी तूँ पापीपुंजहारी ॥ नाथ तूँ
अनाथको, अनाथ कौन मौसों । मो समान
आरत नहिं, आरतिर तोसों ॥ ब्रह्म तूँ हौं जीव
तूँ हौं ठाकूर हौं चेरो । तात मात गुरु सखा
तूँ, सब विधि हित मेरो ॥ तोहि मेहि नाते
अनेक, मानियेजु भावै । ज्यौं त्यों **तुलसी**
कृपाल, चरण शरण पावै ॥ १ ॥

## अभंग

धन्य महाराज पुंडलीक मुनी । वैकुंठीचा
सखा आणिला भूतळालागोनी ॥ १ ॥ केला

उपकार जग तारिलें सकळ। निरसली भ्रांती तूंची माउली स्नेहाळ ॥ २ ॥ आली चंद्रभागा गर्जना ते करीत। तुझिये भेटीलागिं उतावेळ धांवत ॥ ३ ॥ जोडोनियां पाणी सेना करी विनवणी। धन्य पुंडलीका माथा ठेवित चरणीं ॥ ४ ॥

## पद ( पिलु-धुमाळी )

दीनबन्धु सुखसिन्धु कृपाकर, कारुणीक रघुराई। सुनहुँ नाथ मन जरत त्रिविध ज्वर, करत फिरत बौराई ॥ कबहुँ योगरत भोगनिरत सठ, हठि वियोग वश होई। कबहुँ मोहवश द्रोह करत बहु कबहुँ दया अति सोई। कबहु दीन मति हीन रंकतर, कबहुँ भूप अभिमानी। कबहुँ मूढ पण्डित विडम्बरत, कबहुँ धरमरत ज्ञानी ॥ कबहुँ देख जग धनमयरिपु-

मय, कबहुँ नारिमय भासै । संसृतिसन्निपात दारुण दुख बिनु हरिकृपा न नासै ॥ संयम जप तप नेम धरम व्रत, बहु भेषज समुदाई । **तुलसिदास** भवरोग रामपद, प्रेमहीन नहि जाई ॥ १ ॥

## अभंग

देहीं देखिली पंढरी । आत्मा अविनाश विटेवरी ॥ १ ॥ तो हा पांडुरंग जाणा । शांति रुक्मिणी निजांगना ॥ २ ॥ आकारलें तितुकें नासे । आत्मा अविनाश विठ्ठल असे ॥ ३ ॥ ऐसा विठ्ठल हृदयीं ध्याई । **चोखामेळा** जडला पायीं ॥ ४ ॥

## पद

काहे ते हरि मोहि बिसारो । जानत निज महिमा मेरे अघ, तदपि न नाथ सँभारो ॥

पतित पुनीत दीनहित अशरण, शरण कहत श्रुति चारो। हौं नहिं अधम सभीत दीन किधों, वेदन मृषा पुकारो ॥ खगगनिका गजव्याध पांति जहँ, तहँ हौंहूं बैठारो । अबकेहि लाज कृपानिदान परसत पनवारो फारो ॥ जौ कलि-काल प्रबल हो तो अति, तुब निदेश ते न्यारो । तौ हरि रोस भरेस दोष गुण, तेहि भनते तजि गारो ॥ मसक बिरञ्चि विरञ्चि मसकसम, करहु प्रभाव तिहारो । यह सामर्थ अछत मोहि त्यागहु, नाथ तहां कछु चारो ॥ नाहिं ननरक परत मोकहँ डर, यद्यपि हौं अति हारो । यह बडि त्रास **दास तुलसी** प्रभु, नामहुँ पापन जारो ॥ १ ॥

## अभंग

टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट हे

चालावी पंढरीची ॥ १ ॥ पंढरीची हाट कउ-
लाची पेठ। मिळाले चतुष्ट वारकरी ॥ २ ॥
पताकांचे भार मिळाले अपार। होतो जयजय-
कार भीमातीरीं ॥ ३ ॥ हरिनामगर्जना नाहीं
भय चिंता। ऐशी बोले गीता भागवत ॥ ४ ॥
खटनट यावे शुद्ध होउनि जावे। दंवडी पिटी
भावें **चोखामेळा** ॥ ५ ॥

## पद

जाउँ कहाँ तजि चरण तिहारे। काको नाम
पतितपावन जग, केहि अति दीन पियारे ॥
कवन देव बरियाइ विरद हित, हठि हठि अधम
उधारे। खग मृग व्याध पखान विटप जड यवन
कवन सुर तारे ॥ देव दनुज मुनि नाग मनुज
सब, मायाविवश बिचारे। तिनके हाथ **दास
तुलसी** प्रभु कहा अपन हौ हारे ॥ १ ॥

## अभंग

माझें प्रेम तुझे पायीं । राहो ऐसें करीं कांहीं ॥ १ ॥ मागणें तें हेंचि मागों । आणिका न लागों छंदासी ॥ २ ॥ काया वाचा आणि मन । केलें समर्पण तव चरणीं ॥ ३ ॥ हाचि माझा निर्धार । ह्मणे **नरहरी सोनार** ॥ ४ ॥

## पद

रामनामाची गती कोण जाणे । जाणताती कैलासपती राणे ॥ ध्रु०॥ कीटपक्षादी मोक्ष-पदा जाती। तेथ इतरांची कोण कथा गाती ॥१॥ व्याधें वधितां मुखासि ह्मणे रामा । निमिषमात्रें ते चढे मोक्षधामा ॥ २ ॥ घेतां रामाचें नाम ग्रामद्वारीं । धन्य झाली ते महीमान्य नारी ॥ ३ ॥ अजामेळादी पूर्ण पापराशी । नाम-

संकेतें पुण्यलोकवासी ॥ ४ ॥ मंत्र माझ्या शिकविला मायबापें । ह्मणे आनंदतनय गेलिं पापें ॥ ५ ॥

## पद

कैसेंहि कीर्तन करितां कल्याण बरवें आहे ॥ ध्रु० ॥ वाल्मिकि उफराट्या नामानें । पावन झाला वक्ता मानें । पतित पुत्राच्या अभिधानें । तरला संसार लवलाहें ॥ कैसें० ॥ १ ॥ शुका पढवितां पापिणी । केला परमात्मा तो ऋणी । चढली वैकुंठा कुंटिणी । केवढें कौतुक हें पाहें ॥ कैसें० ॥ २ ॥ शुद्रा बुद्धी नसतां ज्ञान । वित.ळ ईश्वर करितां गान । तारक नामाचें महिमान । आनंदात्मज गुण लाहे ॥ कैसें० ॥ ३ ॥

## अभंग

नको मोक्षपद भुक्ति आणि मुक्ती । आहे आम्हा विश्रांति तुझे नामीं ॥ १ ॥ आमुचें आम्हास सांपडलें वर्म । मुखीं गातां नाम पुरे कोड ॥ २ ॥ नामयाचा महादा विठ्ठलीं रंगला । ब्रह्मज्ञान अबोला वाटे मनीं ॥ ३ ॥

## पद

रामा कृष्णा गोविंदा गोपाळा । वेळोवेळां वाचेसी लागो चाळा ॥ ध्रु० ॥ कोटी धेनु सत्पात्रीं दिधल्या दाना । ग्राम कोटी आराम रचले नाना । या मैदानीं तो धर्म दिसे साना । नामस्मरणमहिमा सत्य जाणा ॥ १ ॥ गंगास्नानें तेव्हांचि कोटी केलीं । दानधर्मादिक पुण्यें तेथें ठेलीं । योगयागादिक कर्में सिद्धि नेलीं । ऐशीं नामें वाचेशी जेव्हां आलीं ॥ २ ॥

याचि मंत्रें नारदादि गाति गाणीं । ज्याचा महिमा तो जाणे शूळपाणी । नामापासीं कैवल्य मुक्तिखाणी । बोले भावें **आनंदतनय** वाणी ३ ॥

## अभंग

जैं आकाश वर पडों पाहे । ब्रह्मगोल भंगा जाये । वडवानळ त्रिभुवन खाये । परी मी तुझीच वास पाहें गा विठोबा ॥ १ ॥ न करीं आणिकाचा पांगिला । नामधारक तुझाचि अंकिला ॥ध्रु०॥ सप्तसागर एकवट होती । जैं हे विरुनी जाय क्षिती । पंचमहाभूतें प्रळय पावती । तरी मी तुझाचि सांगाति गा विठोबा ॥ २ ॥ भलतैसें वर जड पडो भारी । नाम न संडों नेमा न टळों निर्धारीं । जैशी प्रतिव्रता प्राणेश्वरी । विनवी **भानुदास** म्हणे अवधारीं गा विठोबा ॥ ३ ॥

## पद

असा धरिं छंद । जाय तुटोनियां भवबंध ॥ ध्रु० ॥ छंद लागला टिटवीला । तिणें समुद्रही शोषिला । मैनावतिनें कृतार्थ केला । गोपीचंद ॥ जाय० ॥ १ ॥ दुधाचा सागर उपमन्युला । अढळपदावरि ध्रुव बैसला । मार्कंडेयें यम हटविला । जाहला मंद ॥ २ ॥ झाले तीन देह भरताला । रावण रामरूप तो झाला । गोपी चढल्या गोलोकाला । यशोदानंद ॥ ३ ॥ आळिस भ्रमराचा अभ्यास । होतां भ्रमरपणा ये तीस । तैसा सोडुनि जीवपणास । भोगिं आनंद ॥ ४ ॥ छंदें असाध्यही साधिती । नर ते नारायणही होती । दीन जन हरी आपुला करिती । जो सुखकंद ॥ ५ ॥

## पद

कृष्णें जिंकिलें रे जिंकिलें, पावन यश जगीं अंकिलें रे ॥ ध्रु० ॥ चांगला रे कृष्ण चांगला रे, मातंगमदें रक्तें रंगला रे ॥ १ ॥ ताडिला रे हस्ती ताडिला रे, उपडोनी दोनी दंत पाडिला रे ॥२॥ लोटिला रे रंगीं लोटिला रे मल्लांसी वज्रतुल्य वाटला रे ॥ ३ ॥ देखिला रे रंगीं देखिला रे, नवरसें हरि मनीं रेखिला रे ॥ ४ ॥ मारिले रे मल्ल मारिले रे, कंस राया वाग्दोषें वारिलें रे ॥५॥ तापला रे कृष्ण तापला रे, मारितां सखा मामा आपला रे ॥ ६ ॥ तोडिले रे बंध तोडिले रे, मायबाप उग्रसेना सोडिलें रे ॥ ७ ॥ दिधलें रे राज्य दिधलें रे, उग्रसेनमन कृष्णें वेधिलें रे ॥ ८ ॥ पावला रे जय पावला रे, श्रीकृष्ण **वामन** तो जाहला रे ॥ ९ ॥

## पद

भवतारक या तुझ्या पादुका वंदिन मी माथां । करावी कृपा गुरूनाथा ॥ ध्रु० ॥ बहु अनिवार हें मन माझें चरणीं स्थिर व्हावें । तव पदभजनीं लागावें ॥ कामक्रोधादिक हे षड्रिपु समूळ छेदावे । हेंचि मागणें मला द्यावें ॥ चाल । अघहरणा करिं करुणा दत्ता धांव पाव आतां ॥ करावी कृपा गुरूनाथा ॥ १ ॥ तूंचि ब्रह्मा तूंचि विष्णु तूंचि उमाकांत । तूंची समग्र दैवत ॥ माता पिता इष्ट बंधु तूंचि गणगोत । तूंचि माझें सकळ तीर्थ ॥ चाल ॥ तुजाविण मी गा कांहिंच नेणें तूंचि कर्ता हर्ता ॥ करावी कृपा गुरूनाथा ॥ २ ॥ तनमनधन हें सर्व अर्पुनी कुरंवाडिन काया । उपेक्षूं नको गुरूराया ॥ कर्महीन मी मतीहीन मी, सकळ श्रम

## पद

कृष्णें जिंकिलें रे जिंकिलें, पावन यश जगीं अंकिलें रे ॥ ध्रु० ॥ चांगला रे कृष्ण चांगला रे, मातंगमर्दे रक्तें रंगला रे ॥ १ ॥ ताडिला रे हस्ती ताडिला रे, उपडोनी दोनी दंत पाडिला रे ॥२॥ लोटिला रे रंगीं लोटिला रे मल्लांसी वज्रतुल्य वाटला रे ॥ ३ ॥ देखिला रे रंगीं देखिला रे, नवरसें हरि मनीं रेखिला रे ॥ ४ ॥ मारिले रे मल्ल मारिले रे, कंस राया वाग्दोषें वारिलें रे ॥५॥ तापला रे कृष्ण तापला रे, मारितां सखा मामा आपला रे ॥ ६ ॥ तोडिले रे बंध तोडिले रे, मायबाप उग्रसेना सोडिलें रे ॥ ७ ॥ दिधलें रे राज्य दिधलें रे, उग्रसेनमन कृष्णें वेधिलें रे ॥ ८ ॥ पावला रे जय पावला रे, श्रीकृष्ण **वामन** तो जाहला रे ॥ ९ ॥

## पद

भवतारक या तुझ्या पादुका वंदिन मी माथां । करावी कृपा गुरूनाथा ॥ ध्रु० ॥ बहु अनिवार हें मन माझें चरणीं स्थिर व्हावें । तव पदभजनीं लागावें ॥ कामक्रोधादिक हे षड्रिपु समूळ छेदावे । हेंचि मागणें मला द्यावें ॥ चाल । अघहरणा करिं करुणा दत्ता धांव पाव आतां ॥ करावी कृपा गुरूनाथा ॥ १ ॥ तूंचि ब्रह्मा तूंचि विष्णु तूंचि उमाकांत । तूंची समग्र दैवत ॥ माता पिता इष्ट बंधु तूंचि गणगोत । तूंचि माझें सकळ तीर्थ ॥ चाल ॥ तुजाविण मी गा कांहिंच नेणें तूंचि कर्ता हर्ता ॥ करावी कृपा गुरूनाथा ॥ २ ॥ तनमनधन हें सर्व अर्पुनी कुरंवाडिन काया । उपेक्षूं नको गुरूराया ॥ कर्महीन मी मतीहीन मी, सकळ श्रम

थायां । लज्जा राखें गुरुसद्‌था ॥ चाल ॥ मातृ बालकापरि सांभाळीं तूंचि मुक्तिदाता ॥ करावी कृपा गुरूनाथा ॥३॥ शेषा ब्रम्हा वेदां न कळे महिमा तव थोर। तेथें मी काय पामर ॥ वियोग नसुं दे तव चरणाचा हाचि देईं वर । शिरीं या ठेविं अभयकर ॥ चाल ॥ हिच विनंती दर्शन घावें दास रघुनाथा ॥ करावी कृपा गुरू- नाथा ॥ ४ ॥

## अभंग

वेदव्यास गुरू । तुह्मा माझा नमस्कारू ॥ १ ॥
आनंदनिधाना । कृष्णमूर्ति नारायणा ॥ २ ॥
ज्योति ह्मणे दीनोद्धारा । कृपासिंधू जी दातारा ॥ ३ ॥

## पद

वर असा विभो दे कीं वत्सा गा मह्लीला ॥ध्रु०॥

पदवी श्रीची गोपीकांला । वैकुंठींची दिधली बहुत्रपल्लीला ॥ १ ॥ तुझ्या कीर्तिमात्रेपुढें । न पुसे कोणी धन्वंतरितें खल्लीला ॥ २ ॥ भक्त मयूर सुखघना । न सुरद्रुम याचक नीचाच्या गल्लीला ॥ ३ ॥

## पद

अहो अहो प्रभुजी पळभरि रहा । उद्धरिले बहु एकचि उरलों दीन मजकडे पहा ॥ ध्रु० ॥ तडतड तोडिति करिती चिकळ खळ कामादिक वृक सहा । गृहगहनीं भ्रमलों तापत्रयवणवा दुःसह पहा ॥ १ ॥ पंकपतित धेनूद्धरणाला संमति देतिल दहा । शरणागत विकलोद्धति कृतिवर ह्मणती महिमा महा ॥ २ ॥ अजि करुणाघन साहेल कसा भक्त मयूरविरहा ।

सर्वपतितपावन हें अपुलें बिरुदहि त्यजितां अहा ॥ ३ ॥

## अभंग ( स्त्रियांकरितां )

चिदंबर नाम सौभाग्य संपूर्ण । सकळ आभरण नाम तूझें ॥ १ ॥ पांडुरंग नाम कंचुकी मीं ल्याली । पीतांबर नेसली रामनाम ॥ २ ॥ केशवाचें नाम प्रकट मंगळसूत्र । पुतळ्यांचा हार नारायण ॥ ३ ॥ माधवाचें नाम पदक जडित । गोविंद ताईत मोतींमाळा ॥ ४ ॥ विष्णु तुझें नाम मोत्यांचा कठाण । सरी मधुसूदन जंबूमाळा ॥ ५ ॥ त्रिविक्रम नाम शोभे मोहनमाळा । चंद्रहार गळां वामन नाम ॥६॥ श्रीधर हें नाम रत्नजडित काप । बाळ्या ते अमूप हृषीकेशी ॥ ७ ॥ पद्मनाभ नाम मोत्यांची बुगडी । भोकरांची जोडी दामोदर ॥ ८ ॥

संकर्षण नाम वांक्या बाजूबंद । विराजत छंद वासुदेव ॥ ९ ॥ प्रद्युम्न नाम रवीसमचूड । पाटल्यांचा जोड अनिरुद्ध ॥ १० ॥ पुरुषोत्तम नाम जव हे गगनीं । चंद्रसूर्य दोन्ही अधोक्षज ॥ ११ ॥ नरसिंह हें नाम राकडी केवडा शोभे मूदजोडा अच्युत नाम ॥ १२ ॥ जनार्दन नाम माजपट्टाभरण । सांखळ्या तें जाण उपेंद्र पैं ॥ १३ ॥ हरि तुझें नाम दांडा मोतियाचा । श्रीकृष्ण नामाचा नाकीं मोतीं ॥ १४ ॥ सर्वेश्वर नाम दुल्लड शोभत । कुकुंम अनंत **दास** ह्मणे ॥ १५ ॥

## भजन

रामा हो जय रामा हो । पतितपावन पूर्ण कामा हो ॥ नाथा हो दीननाथा हो । तुझिये

चरणीं राहो माथा हो ॥ बंधु हो दीनबंधू हो । **रामदास** ह्मणे कृपासिंधु हो ॥

## अभंग

रत्नजडित सिंहासन । वरी शोभे रघुनंदन॥१॥ वामांकीं ते सीताबाई ॥ जगज्जननी माझे आई ॥२॥ पश्चाद्भागीं लक्षुमण । पुढें अंजनीनंदन ॥३॥ भरत शत्रुघ्न भाई । चवरें ढाळिति दोहीं बाहीं ॥ ४ ॥ नळनीळ जांबुवंत । अंगद सुग्रीव बिभीषण भक्त ॥ ५ ॥ देहबुद्धि नेणों कांहीं । दास अंकित रामा पायीं ॥ ६ ॥

## पद

शिणलासी माझ्या बा रे ॥ ध्रु० ॥ पायीं अनवाणी । संगें रुक्मिणी । कांटे कर्नाटकाच्या वाटे चालतांना उपवासी ॥ शिण० ॥ १ ॥ अतिसकुमारा । नंदकुमारा । नागर गिरिवर-

धारी पंढरपुरचा रहिवासी ॥ शिण० ॥ २ ॥ **आदिनारायण** । जगत्रयजीवन । पतित-पावन भक्तांसाठीं ब्रीद बाळगिसी ॥ शिण० ॥३॥

## श्लोक

समचरणसरोजं सांद्रनीलांबुदाभम् । जघननि-हितपाणिं मंडनं मंडनानाम् ॥ तरुणतुलसि-मालाकंधरं कंजनेत्रम् । सदयधवलहासं विठ्ठलं चिंतयामि ॥ १ ॥

## अभंग

हरिसी निघतां शरण । आमुचें गेलें आह्मीपण ॥ १ ॥ आतां बोले चाले हरी । ज्याची कथा तोची करी ॥ २ ॥ होऊनियां श्रोता वक्ता । करी अपुली आपण कथा ॥ ३ ॥ तोचि झाला जन वन । तोचि मनाचें पैं मन ॥ ४ ॥ तोचि बुद्धिचा निश्चय । चित्ता चिंतन—उदय

॥ ५ ॥ तोचि अहं सोऽहं झाला । अहं सोऽहं गिळोनि ठेला ॥ ६ ॥ सकळिक हरि आहे । भक्त तेही आपण होय ॥ ७ ॥ कैंचा **रमा-वल्लभदास** । अवघा हरीचा विलास ॥ ८ ॥

## श्लोक

हृदिविकसितपद्मं सार्कं सोमाग्निबिंबम् ।
प्रणवमयविकासं यस्य पीठं प्रकल्प्य ॥
अचल परमसूक्ष्मं ज्योतिराकाशमेव ।
स भवतु मनसो मे वासुदेवः प्रतिष्ठा ॥

## अभंग

आह्मी अपराधी अपराधी । आह्मां नाहीं दृढबुद्धि ॥ १ ॥ माझे अन्याय अगणित । कोण करील गणित ॥ २ ॥ मज सर्वस्वें पाळिलें । प्रचितीनें सांभाळिलें ॥ ३ ॥ माझी वाईट करणी । **रामदास** लोटांगणीं ॥ ४ ॥

## पद

ऐसा उपकार कैसा विसरूं श्रीरामा । बहुत भाग्यें भेटलासी देवा निजसुखधामा ॥ ध्रु० ॥ दुर्लभ हे नरतनु देउनिया आह्मां । भक्तिमार्गें लावियलें पूर्ण परब्रम्हा ॥ १ ॥ घडी घडी कळविसी आपणचि सार । वळवुनी वृत्ति देसी आत्मपदीं थार ॥ २ ॥ विषयजनित सुखदुःख समजाया । भली युक्ति केली विस्तारुनी मिथ्या माया ॥ ३ ॥ धन्य हा प्रपंच केला आत्मदृष्टि सारा । अखंड आनंद वाटे करितां विचारा ॥ ४ ॥ तुजवीण देव दयाघन नाहीं कोणी । आत्मभावें **कृष्ण जगन्नाथ** लोटांगणीं ॥ ५ ॥

## अभंग

येथें उभा कां श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा ॥ १ ॥ काय केली शरयू गंगा । येथें वाहे

चंद्रभागा ॥ २ ॥ काय केली अयोध्यापुरी । येथें वसविली पंढरी ॥ ३ ॥ धनुष्यबाण काय केलें । कर कटावरी ठेविले ॥ ४ ॥ काय केली सीताबाई । येथें राही रखुमाबाई ॥ ५ ॥ काय केला वानरमेळ । कैंचे मिळविले गोपाळ ॥६॥ काय केला हनुमंत । कैंचा पुंडलीक भक्त ॥७॥ **रामीं रामदासीं** भाव । तैसा झाला पंढरिराव ॥ ८ ॥

## पद

कळों आली भाव रे । भक्तिपाशीं देव रे । न पाहेचि याती कुळ कर्ममूळ भाव रे ॥ ध्रु० ॥
कोण पुण्यश्लोक रे । गोकुळींचे लोक रे । गोप वेषें जयां घरीं ब्रह्मांडनायक रे ॥ १ ॥
दुर्लभ ब्रह्मादिकां । त्यासी गोपबाळिका । प्रेमें नाचविती वाजवोनी करताळिका ॥ २ ॥

प्राणाच्या निरोधनें । न व्हे साध्य साधनें ।
लीलारूपी विग्रही तो चारिताहे गोधनें ॥ ३ ॥
भाविकांचे बंध रे । तोडी जगद्वंद्य रे । यशोदेनें
उखळीं तो बांधिला गोविंद रे ॥ ४ ॥
जया जैसा हेत रे । तया तैसा होत रे ।
**निजानंदीं** पूर्ण रंगीं रंगला अनंत रे ॥ ५ ॥

## अभंग

रामनाम कथागंगा । श्रवणें पावन करी जगा
॥ १ ॥ तिसी प्रेमपूर आला । शंकर हृदयीं
सामावला ॥ २ ॥ रामदासांची माउली ।
आळशावरी गंगा आली ॥ ३ ॥ झालें कीर्तन
या भावें । संतसज्जनीं मानावें ॥ ४ ॥
आह्मी रामाचे पाईक । आमुचा श्रीराम नाईक
॥ ५ ॥ आमुचा भाव रामापायीं । आह्मी

रामावांचुनि नाहीं ॥ ६ ॥ ह्मणे **उद्धवचिद्घन** । आह्मी झालों रामार्पण ॥ ७ ॥

## अभंग

रामनामकथा श्रवणीं पडतां । होय सार्थकता श्रवणाची ॥१॥ मुखें नाम घेतां रूप आठवलें । प्रेम दुणावलें पहावया ॥ २ ॥ राम माझे मनीं शोभे सिंहासनीं । एकाएकीं ध्यानीं सांपडला ॥३॥ **रामदास** ह्मणे विश्रांति मागेन । जिवींचें सांगेन गुज कांहीं ॥ ४ ॥

## अभंग

विठोबाच्या गांवा जाईन धांवोनी। घालीन लोळणी चरणावरी ॥१॥ शीणभाग सर्व हिरोनी नेईल । जीवींचें पुसेल जडभारी ॥ २ ॥ हरुषें लोळत जाईन महाद्वारा । भेटाया सामोरा येइल मज ॥३॥

उचलोनी शीस पुशील आदरें । मुख पीतांबरें पुसिल माझें ॥ ४ ॥ धरोनी हनुवटी उठवील हस्तकीं । ठेविल मस्तकीं अभयकर ॥ ५ ॥ राई रखुमाई माता सत्यभामा । कडे घेउनि **नामा** स्तनीं लावी ॥ ६ ॥

## अभंग

देहुडा चरणीं वाजवितो वेणू । गोपीकारमणु स्वामी माझा ॥ १ ॥ देखिला गे माय यमुनेचे तीरीं । हात खांद्यावरी राधिकेच्या ॥ २ ॥ गुंजावर्ण डोळे माथां बाबरझोटी । मयूरपिच्छ वेष्टी शोभतसे ॥ ३ ॥ सगुण मेघश्याम लावण्य सुंदर । **नामया** दातार केशवराज ॥ ४ ॥

## अभंग

चक्रवाक पक्षी वियोगें बाहती । झालें मजप्रती

तैसें आतां ॥ १ ॥ चुकलिया माय बाळकें रडती । झालें मजप्रती तैसें आतां ॥ २ ॥ वत्स न देखतां गाई हंबरती । झालें मजप्रती तैसें आतां ॥ ३ ॥ जीवनावेगळे मत्स्य तळमळती । झालें मजप्रती तैसें आतां ॥ ४ ॥ नामा ह्मणे मज ऐसें वाटे चित्तीं । करितसें खंती फार तुझी ॥ ५ ॥

## अभग

संसाराच्या तापें तापलों मी देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥ १ ॥ ह्मणऊनी तुझे आठविले पाय । ये वो माझे माय पांडुरंगे ॥ २ ॥ बहुतां जन्मींचा झालों भारवाही । सुटिजे हें नाहीं वर्म ठावें ॥ ३ ॥ वेढियेलों चोरीं अंतर्बाह्यात्कारीं । कणव न करी कोणी माझी ॥४॥ बहु पांगविलों बहु नागविलों । बहु दीस झालों

कासावीस ॥ ५ ॥ तुका ह्मणे आतां धांव घालीं वेगीं । ब्रीद तुझें जगीं दीननाथा ॥ ६ ॥

## अभंग

आतां तरी पुढें हाची उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥ १ ॥ सकळांच्या पायां माझें दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ २ ॥ हित तें करावें देवाचें चिंतन । करुनियां मन एकविध ॥ ३ ॥ तुका ह्मणे लाभ होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें॥४॥

## अभंग

कन्या सासुऱ्यासी जाये । मागें परतोनि पाहे ॥ १ ॥ तैसें झालें माझ्या जीवा । कधीं भेटसी केशवा ॥ २ ॥ चुकलिया माय । बाळ हुरु हुरु पाहे ॥ ३ ॥ जिवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥ ४ ॥

## अभंग

यमधर्म सांगे दूतां । तुम्हां नाहीं तेथें सत्ता ।
जेथें होय हरिकथा । सदा घोष नामाचा ॥१॥
नका जाऊं तया गांवा । नामधारकाच्या शिवां ।
सुदर्शन यावा । घरटी फिरे भोंवती ॥ २ ॥
चक्र गदा घेउनि हरि । उभा असे त्यांचे द्वारीं ।
लक्ष्मी कामारी । रिद्धिसिद्धिसहित ॥ ३ ॥
ते बळिया शिरोमणि । हरिभक्त ये मेदिनीं ।
तुका ह्मणे कानीं । यम सांगे दूतांचे ॥ ४ ॥

## अभंग

वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरें । पक्षीहि सुस्वरें आळविती ॥१॥ येणें सुखें रुचे एकांतांचा वास । नाहीं गुणदोष अंगा येत ॥ २ ॥ आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथें मन क्रीडा करूं ॥ ३ ॥ कंथा कमंडलु देह उपचारा । जाणविते

धारा अवसरू ॥ ४ ॥ हरिकथा भोजन आवडी विस्तार । करोनि प्रकार सेवूं रुचि ॥ ५ ॥ तुका ह्मणे होय मनासी संवाद । आपुलाचि वाद आपणासी ॥ ६ ॥

## अभंग

न करावी चिंता । भय न धरावें सर्वथा ॥ १॥
दासा साहे नारायण । सदा रक्षिता आपण ॥२॥
न लगे परिहार । कांहीं योजावें उत्तर ॥ ३ ॥
न धरावी शंका । नये बोलों ह्मणे तुका ॥४॥

## अभंग

राम सर्वोत्तम या नामें निखळ । जन हें सफळ दिसताहे ॥ १ ॥ भिन्न नाहीं दुजें सर्व आत्तराजे । नाचताती भोजें योगीराज ॥ २ ॥ मातापिता देव. गृहदारा जन । सर्व जनार्दन

सर्वां रूपीं ॥ ३ ॥ **सोपान** खेचर ब्रह्म माजि-
वडें । ब्रह्मांडाएवढें आत्माराम ॥ ४ ॥

## अभंग

अलिप्त संसारीं हरिनामपाठें । जाइजे वैकुंठें
मुक्तलग ॥ १ ॥ हरिविण मुक्त न करि वो
सर्वदा । संसारआपदा भव तोडी ॥ २ ॥
आशेच्या निराशीं अचेतना मारीं । चेतविला
हरि आत्मरूपें ॥ ३ ॥ **मुक्ताई** जीवन्मुक्तचि
सर्वदा । अभिन्न पैं भेदा भेदियेलें ॥ ४ ॥

## अभंग

महाक्षेत्र सप्तपुरी–। माजी शिरोमणि पंढरी ॥१॥
कां रे हिंडसी जेथें तेथें । पांडुरंगीं ठेवीं चित्त
॥ २ ॥ चंद्रभागेकरितां स्नान । कोटी कुळां
उद्धरण ॥ ३ ॥ मज आहे हा विश्वास ।
**चांगा** विठोबाचा दास ॥ ४ ॥

## अभंग

पूर्वपुण्य माझें फळासी हें आलें । विठ्ठलें पाहिलें कृपादृष्टी ॥ १ ॥ विषयाचा संग सहज तुटला । प्रपंच पैं जाहला परमार्थ ॥ २ ॥ **गोरियानें** मनीं आठविले पाय । विठोबानें सोय दाखविली ॥ ३ ॥

## अभंग

प्रपंचीं असूनि परमार्थ साधावा । वाचे आठवावा रामकृष्ण ॥ १ ॥ उंचनीच कांहीं न पाहे सर्वथा । पुराणींच्या कथा पुराणींच ॥ २ ॥ घटिका आणि पळ साधीं उतावीळ । वाउगा तो काळ जाऊं नेदीं ॥ ३ ॥ **सावंता** ह्मणे ऱ्याचे जपें नामावळी । हृदयकमळीं रामकृष्ण ॥ ४ ॥

## अभंग

देहीं देखिली पंढरी । आत्मा अविनाश विटेवरी ॥ १ ॥ तोहा पांडुरंग जाणा । शांति रुक्मिणी

निजांगना ॥ २ ॥ आकारलें तितुकें नासे । आत्मा अविनाश विठ्ठल दिसे ॥ ३ ॥ ऐसा विठ्ठल हृदयीं ध्याई । **चोखामेळा** जडला पायीं ॥ ४ ॥

## अभंग

भावें पाचारितां । विठ्ठलनामें आळवितां ॥ १ ॥
येसी धांवत धांवत । माउली तूं कृपावंत ॥ २ ॥
देसी प्रेमपान्हा । मुखीं घालुनियां स्तना ॥ ३ ॥
निळा म्हणे घेसी । तया अंकीं खेळविसी ॥ ४ ॥

## अभंग

अहंकाराच्यामुळें सुखदुःख भोगी । आदळोनी अंगीं मीपणाच्या ॥ १ ॥ वासनेच्यामुळें भोगी जन्ममरण । यातना कठीण चौऱ्याशींच्या ॥ २ ॥ कल्पनेच्या योगें स्वर्गनरक भोगी । काळाचिया मार्गीं जात असे ॥ ३ ॥ अविद्येची बाधा

शिंगेनी अंतरीं । जातो यमपुरी भोगावया॥४॥ मनाचें कारण संकल्प विकल्प । पुण्य आणि पाप भोगितसे ॥५॥ हरि म्हणे राजा असोनि भिकारी । जाली ऐसी परी भ्रांती पुढें ॥ ६ ॥

## अभंग

रामनाम वेदोवाणी । मना झाली समाधानी ॥ १ ॥ म्हणतां राम वेळोवेळां । जळती पापें अग्निज्वाळा ॥ २ ॥ रामनामाचा प्रताप। काय पुढें येइल पाप ॥ ३ ॥ शिवदास म्हणे नाम। आम्ही हेंचि केलें काम ॥ ४ ॥

## अभंग

अनाथाचा नाथ दीनाचा दयाळ । म्हणवोनि सांभाळ करीं माझा ॥ १ ॥ तुजऐसा देव नाहीं त्रिभुवनीं । म्हणवोनी चरणीं विनटलें ॥ २ ॥ बापा विठ्ठलराया करीं कृपादान ।

सांभाळीं वचन आपुलें तें ॥ ३ ॥ लाडाई म्हणे देवा भेट देई वेगीं । ब्रीद तुझें जगीं दीननाथ ॥ ४ ॥

## अभंग

धरियेली हांव म्हणवितों दास । शेवटील यश येइल कैसें ॥ १ ॥ हेचि रात्रंदिवस चिंता या जीवासी । कोणी सांगायासी नाहीं सखा ॥२॥ सगुण हें ध्यान न पडे दृष्टीसी । विचार कोणासी पुसूं आतां ॥ ३ ॥ म्हणुनी **महिपती** निवांत अंतरीं । करिसी तें करीं पांडुरंगा ॥४॥

## अभंग

जड जीवातें उद्धरी । ऐसी नामामाजी थोरी १॥
तें नाम वाचे गातां । हरे जन्ममरणवार्ता ॥२॥
नामें पाषाण तारिले । गजेंद्रातें उद्धरिलें ॥ ३ ॥
ऐसा नामाचा पोवाडा । म्हणे नामयाचा **गोंदा** ४

## अभंग

काळा अलोट अभंग । हरिचे दास अंतरंग ॥ १ ॥ कृष्णा गोविंदा गोपाळा । पाचारिती वेळोवेळां ॥ २ ॥ कंठीं तुळशीच्या माळा । नेत्रीं अश्रूंचिया किळा ॥ ३ ॥ गुढिया रोमांकुरीं । कंप स्वेद हे शरीरीं ॥ ४ ॥ अंतर्बाह्य निरंतरीं । मागें पुढें अवघा हरी ॥ ५ ॥ त्यांचे चरणींचा रजरेण । **नारा** नामयाचा जाण ॥६॥

## अभंग

विठ्ठल वदनीं नाचती रंगणीं । जाती लोटांगणीं पंढरीसी ॥१॥ धन्य धन्य साधु अवतार देवाचे । पावन महीचें केलें त्याणीं ॥ २ ॥ जेथें जाति तेथें उद्धरिती जीवां । लावोनियां गांवा मोक्षाचिया ॥३॥ **मुद्गल** म्हणे यांचें वैकुंठीं निशाण । खा नारायण त्यांनीं केला ॥ ४ ॥

## अभंग

किती पाहसी माझा अंत । म्हणविसी कृपावंत ॥ १ ॥ पांडुरंगे माझे माय । तुझे दाखवीं गे पाय ॥ २ ॥ कांहीं घालीना संकट । तुझें नाम गे वैकुंठ ॥ ३ ॥ कृपादृष्टीनें पाहतां । कांहीं वेंचेना आतां ॥ ४ ॥ माझ्या पूर्वजांच्या स्थळीं । ठेवीं गुण निज निवळी ॥ ५ ॥ **मध्वनाथ** म्हणे हरी । न घालीं पंढरीबाहेरी ॥ ६ ॥

## अभंग

आनंदाचे जळें भरियले डोळे । चैतन्य सोहळे भोगियेले ॥ १ ॥ ज्यासी शांतिपंथ आतुडे सनाथ । सवें आदिनाथ भेटला तो ॥ २ ॥ **सोहिरा** म्हणे माझा सखा जिवलग । जेणें हें सर्वांग वसविलें ॥ ३ ॥

# रामदासी करुणाष्टकें.

## १

अनुदिनिं अनुतापें तापलों रामराया । परम दिन-
दयाळा नीरसीं मोहमाया । अचपळ मन माझें नावरे
आवरीतां । तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां
॥ १ ॥ भजनरहित रामा सर्वही जन्म गेला । स्वजन-
जनधनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला । रघुपति मति माझी
आपुलीसी करावी । सकळ त्यजुनि भावें कास तूझी
धरावी ॥ २ ॥ विषयजनितसूखें सूख होणार नाहीं ।
तुजविण रघुनाथा वोखटें सर्व कांहीं । रघुकुळटिळका रे
हीत माझें करावें । दुरित दुरि हरावें स्वस्वरूपीं भरावें
॥ ३ ॥ तनुमनधन माझें राघवा रूप तुझें । तुजविण
मज वाटे सर्व संसार ओझें । प्रचलित न करावी सर्वथा
बुद्धि माझी । अचळ भजनलीला लागली आस तूझी
॥ ४ ॥ चपळपण मनाचें मोडितां मोडवेना । सकळ
स्वजनमाया तोडितां तोडवेना । घडिघडि विघडे हा
निश्चयो अंतरींचा । म्हणवुनि करुणा हे भाकितों दीन
वाचा ॥ ५ ॥ जळत हृदय माझें जन्म कोटयानुकोटी ।

मजवरि करुणेचा राघवा पूर लोटीं । तळमळ निववीं रे राम कारुण्यसिंधू।षडरिपुकुळ माझें तोडिं याचा समंधू॥ ६॥ तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी । शिणत शिणत पोटीं पाहिली वाट तूझी ।झडकरि झड घालीं धांव पंचानना रे ।तुजविण मज नेती जंवुकी वासना रे ॥७॥ सबळ जनक माझा राम लावण्यपेटी । म्हणवुनि मज पोटीं लागली आस मोठी । दिवस गणित बोटीं प्राण ठेवूनि कंठीं । अवचट मजभेटी होत घालीन मीठी ॥ ८ ॥ जननिजनकमाया लेकरूं काय जाणे । पय न लगत मूखीं हाणितां वत्स नेणे । जलधरकणआशा लागली चातकासी । हिमकर अवलोकी पक्षिया भूमिवासी ॥ ९ ॥ तुजविण मज तैसें जाहलें रामराया । विलग विषम काळीं सांडिती सर्व माया । सकळजनसखा तूं स्वामि आणीक नाहीं । विषय वमन जैसें त्यागिलें सर्व कांही॥१०॥ स्वजनजनधनाचा कोण संतोष आहे । रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे।जिवगल जिव घेती प्रेत सांडन जाती । विषय सकळ नेती मागुता जन्म देती ॥११॥सकळ जन भवाचे आखिले वैभवाचे।जिवलग मज कैंचे चालले हेंचि साचें । विलग विषमकाळीं सांडिती

सर्व माळी। रघुविर सुखदाता सोडवी अंतकाळीं ॥१२॥ सुख सुख म्हणतां हें दुःख ठाकोनि आलें। भजन सकळ गेलें चित्त दुश्चीत जालें। भ्रमितमन कळेना। हीत तें आकळेना।परम कठिण देहो देहबुद्धि गळेना॥१ ॥ उपरति मज रामीं जाहली पूर्ण कामीं। सकलजनभिरामी राम विश्रामधामीं। घडि घडि मन आतां रामरूपीं भरावें। रघुकुळटिळका रे आपुलेंसें करावें॥ १४॥ जळचर जळवासी नेणती त्या जळासी। निशिदिनिं तुजपाशीं चूकलों गुणराशी। भुमिधर निगमासी वर्णवेना तयासी। सकळ भुवनवासी भेटि दे रामदासी ॥ १५॥ जयजय रघुवीर समर्थ ॥

## २

असंख्यात रे भक्त होऊन गेले। तिहीं साधनांचे बहू कष्ट केले। नव्हे कार्यकर्ता भुमीभार झालों। तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलों॥ १ ॥ बहू दास ते तापसी तीर्थवासी। गिरीकंदरीं भेटि नाहीं जनासी। स्थिती ऐकतां थोर विस्मीत झालों। तुझा दास० ॥२॥ सदा प्रेमळासी तया भेटलासी। तुझ्या दर्शनें स्पर्शनें

पुण्यराशी । अहंता मदें शब्दज्ञानें बुडालों । तुझा दास० ॥ ३ ॥ तुझ्या प्रीतिचे दास निर्माण झाले । असंख्यात ते कीर्ति बोलोनि गेले । बहू धारणा थोर चक्कीत झालों । तुझा दास० ॥ ४ ॥ बहूसाळ देवालयें हाटकाचीं । रसाळा कळा लाघवें नाटकाचीं । पुजा देखतां जाड जीवीं गळालों । तुझा दास० ॥ ५ ॥ कितीकें देह त्यागिले तूजलागीं । पुढें जाहले संपतीचे विभागी । देहेदुःख होतांचि वेगें पळालों । तुझा दास मी० ॥ ६ ॥ किती योगमूर्ती किती पुण्यमूर्ती । किती धर्मसंस्थापना अन्नशांती । पस्तावलों कावलों तप्त जालों । तुझा दास० ॥ ७ ॥ सदा सर्वदा राम सांडूनि कामीं । समर्था तुझे दास आह्मी निकामी । बहु स्वार्थबुद्धी नुरे कष्टवीलों । तुझा दास० ॥ ८ ॥ जयजय रघुवीर समर्थ ॥

## ३

नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान कांहीं । नसे प्रेम हें राम विश्राम नाहीं । असा दीन अज्ञान मीं दास तूझा । समर्था जनीं घेतला भार माझा ॥ १ ॥ रघूनायका

जन्मजन्मांतरींचा । अहंभाव छेदूनि टाकीं दिनाचा । जनीं बोलती दास या राघवाचा । परी अंतरीं लेश नाहीं तयाचा ॥ २ ॥ रघूनायका दीन हातीं धरावें । अहंभाव छेदुनियां उद्धरावें । अगूणी तयालागिं गूणी करावें । समर्थें भवसागरीं ऊतरावें ॥ ३ ॥ किती भार घालूं रघूनायकाला । मजकारणें शीण होईल त्याला । दिनानाथ हा संकटीं धांव घाली । तयाचेनि हे सर्व काया निवाली ॥४॥ मला कोवसा राम कैवल्यदाता । तयाचेनि हे फीटली सर्व चिंता । समर्था तया काय उत्तीर्ण व्हावें । सदा सर्वदा नाम वाचे वदावें॥ ५ ॥ दिनाचें उणें दीसतां लाज कोणा। जनीं दास दीसे तुझा दैन्यवाणा । शिरीं स्वामि तूं राम पूर्णप्रतापी । तुझ दास पाहें सदा शीघ्रकोपी ॥ ६ ॥ जयजय रघुवीर समर्थ.

## ४

उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी। अती आदरें सर्व सेवा करावी । सदा प्रीति लागो तुझे गूण गातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ १ ॥ तुझें रूपडें लोचनीं म्यां पहावें । तुझे गूण गातां मनासी रहावें ।

उठो आवडी भक्तिपंथेंचि जातां । रघुनायका० ॥ २ ॥ मनीं वासना भक्ति तूझी करावी । कृपाळूपणें राघवें पूरवावी । वसावें मदीयांतरीं नाम घेतां । रघूनायका० ॥ ३ ॥ सदासर्वदा योग तूझा घडावा । तुझे कारणीं देह माझा पडावा । नुपेक्षीं मज गूणवन्ता अनंता । रघूनायका० ॥ ४ ॥ नको द्रव्य दारा नको येरझारा । नको मानसीं ज्ञानगर्वें फुगारा । सगूणीं मला लावि रे भक्तिपंथा । रघूनायका० ॥ ५ ॥ भवें तापलों प्रीति छाया करावी । कृपासागरें सर्व चिंता हरावी । मला संकटीं सोडवावें समर्था । रघूनायका० ॥ ६ ॥ मनीं कामना कल्पना ते नसांवी । कुबुद्धी कुडी वासना नीरसावी । नको संशयो तोडिं संसारवेथा । रघूनायका० ॥ ७ ॥ समर्थापुढें काय मागों कळेना । दुराशा मनीं बैसली हे ढळेना । पुढें संशयो नीरसीं सर्व चिंता । रघू० ॥ ८ ॥ ब्रिदाकारणें दीन हातीं धरावें । म्हणे दास भक्तासि रे उद्धरावें । सुटे ब्रीद आम्हांसि सोडूनि जातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ ९ ॥ जयजय रघुवीर समर्थ ॥

# ५

युक्ति नाहीं बुद्धि नाहीं विद्या नाहीं विवंचितां। नेणता भक्त मी तूझा बुद्धि दे रघुनायका ॥ १ ॥ मन हें आवरेना कीं वासना वावरे सदा। कल्पना धांवते सैरा बुद्धि दे० ॥ २ ॥ अन्न नाहीं वस्त्र नाहीं सौख्य नाहीं जनामधें। आश्रयो पाहतां नाहीं बुद्धि दे० ॥ ३ ॥ बोलतां चालतां येना कार्यभाग कळेचिना। बहूत पीडलों लोकीं बुद्धि० ॥ ४ ॥ तुझा मी टोणपा झालों कष्टलों बहुतापरीं। सौख्य तों पाहतां नाहीं बुद्धि० ॥ ५ ॥ नेटकें लिहितां येना वाचितां चूकतों सदा। अर्थ तो सांगतां येना बुद्धि० ॥ ६ ॥ प्रसंग वेळ तर्केंना सुचेना दीर्घ सूचना। मैत्रिकी राखतां येना बुद्धि० ॥ ७ ॥ संसारीं श्लाघ्यता नाहीं सर्वही लोक हांसती। वीसरु पडतो पोटीं बुद्धि० ॥ ८ ॥ चित्त दुश्चीत होतें हें ताळतंत्र कळेचिना। आळसू लागला पाठीं बुद्धि दे० ॥ ९ ॥ कळेना स्फुर्ति होईना आपदा लागली बहू। प्रत्यहीं पोट सोडीना बुद्धि दे० ॥ १० ॥ संसार नेटका नाहीं उद्वेग वाटतो जिवीं।

परमार्थ आकळेना कीं बुद्धि दे० ॥ ११ ॥ देईना पूर्विना कोण्ही उगेची जन हांसती । लौकिक राखतां येना बुद्धि दे० ॥ १२ ॥ पीसुणें वाटती सर्वै कोणीही मजला नसे । समर्था तूं दयासिंधु बुद्धि दे० ॥ १३ ॥ उदास वाटतें जीवीं आतां जावें कुणीकडे । तूं भक्त-वत्सला रामा बुद्धि० ॥ १४ ॥ कायावाचा मनोभावें तुझा मी म्हणवीतसें । हे लाज तुजला माझी बुद्धि० ॥ १५ ॥ सोडविल्या देवकोटी भूभार फेडिला बळें । भक्तांसी आश्रयो मोठा बुद्धि० ॥ १६ ॥ उदंड भक्त तुम्हांला आम्हाला कोण पूसतें । ब्रीद हें राखणें आधीं बुद्धि० ॥ १७ ॥ उदंड ऐकिली कीर्ति । पतीत-पावना प्रभु । मी एक रंक दुर्बुद्धी बुद्धि ॥ १८ ॥ आशा हे लागली मोठी दयाळुवा दया करीं । आणीक नलगे कांहीं बुद्धि० ॥ १९ ॥ **रामदास** म्हणे माझा संसार तुज लागला । संशयो वाटतो पोटीं बुद्धि० ॥ २० ॥ जयजय रघुवीर समर्थ ॥

६

समाधान साधूजनाचेनि योगें । परी मागुतें दुःख होतें वियोगें । घडीनें घडी शीण अत्यंत वाटे । उदा-

सीन हा काळ कोठें न कंठे ॥ १ ॥ घरें सुंदरें सौख्य नानापरीचें । परी कोण आणेल तें अंतरींचें । मनीं आठवितांचि तो कंठ दाटे । उदा० ॥ २ ॥ बळें लावितां चित्त कोठें जडेना । समाधान तें कांहिं केल्या पडेना । नये धीर डोळां सदा नीर लोटे ॥ उदा० ॥ ३ ॥ अवस्था मनीं लागली काय सांगों । गुणीं गुंतला हेत कोणासि मागों । बहूसाल भेटावया प्राण फूटे । उदा० ॥ ॥ ४ ॥ कृपाळूपणें भेट रे रामराया । वियोगें तुझ्या सर्व व्याकूळ काया । जनांमाजि लौकीक हाही न सूटे । उदा० ॥ ५ ॥ अहा रे विधी त्वां असें काय केलें । पराधीनता पाप माझें उदेलें । बहूतांमधें तूकतां तूक तूटे । उदा० ॥ ६ ॥ समर्था मनीं सांडि माझी नसावी । सदा सर्वदा भक्तचिंता असावी । घडेना तुझा योग हा प्राप्त कोठें । उदा० ॥ ७ ॥ अखंडीत हे सांग सेवा घडावी । न होतां तुझी भेटि काया पडावी । दिसंदीस आयुष्य हें व्यर्थ लोटे । उदासीन० ॥ ८ ॥ भजों काय सर्वापरी हीन देवा । करूं काय रे सर्व माझाचि ठेवा । म्हणों काय मी कर्मरेखा न लोटे । उदा० ॥ ९ ॥ म्हणे दास मी वास

पाहें दयाळा । रघूनायका भक्तपाळा भुपाळा । पहावें तुला हें जिवीं आर्त मोठें ॥ उदासीन० ॥ १०॥

७

उदासीन हा काळ जातो गमेना । सदा सर्वदा थोर चिंता शमेना । उठे मानसीं सर्व सोडून जावें । रघूनायका काय कैसें करावें ॥ १ ॥ मना बोलतां बोलतां वीट वाटे । नसे अंतरीं सूख कोठें न कंठे । घडीनें घडी चित्त कीतीं धरावें । रघूनायका० ॥ २ ॥ बहू पाहतां अंतरीं कोंड होतो । शरीरास तो द्वेत सोडोनि जातो । उपाधीस देखोनि वाटे सरावें । रघुनायका० ॥ ३ ॥ अवस्था मनीं होय नाना परीची । किती काय सांगू गती अंतरींची । विवेकेंचि या मानसा आवरावें । रघू०॥ ४ ॥ ह्मणे दास ऊदास झालों दयाळा । जनीं व्यर्थ संसार हा वायचाळा । तुझा मी तुला पूसतों प्रीय भावें । रघू० ॥ ५ ॥

८

तुझिया वियोगें जीवत्व आलें । शरीरयोगें बहु दुःख झालें । अज्ञान दारिद्र्य माझें सरेना । तुजवीण रामा मज कंठवेना ॥ १ ॥ परस्त्री जिणें दीन फेडूं

क्िती रे । उदास माझ्या मनिं वाटतें रे । ललाटरेखा तरि पालटेना । तुज० ॥२॥ जडली उपाधी अभिमान साधी । विवेक नाहीं बहुसाल बाधी । तुझिया वियोगें पळही गमेना । तुज० ॥ ३ ॥ विश्रांति नाहीं अभिमान देहीं । कुळाभिमानें पडलों प्रवाहीं । स्वहीत होतां मजला दिसेना । तुज० ॥ ४ ॥ संसारसंगें बहु पीडलों रे । कारुण्यसिंधू मज सोडवीं रे । कृपाकटाक्षें सांभाळिं दीना । तुज० ॥ ५ ॥ विषयी जनानें मज लाजवीलें । प्रपंचसंगें आयुष्य गेलें । समयीं बहु क्रोध शांती भरेना । तुज० ॥ ६ ॥ सुदृढ झाली देहबुद्धि पाहीं । वैराग्य कांहीं हें नांव नाहीं । अपूर्ण कामीं मन हें विटेना । तुज० ॥ ७ ॥ निरूपणीं हे सद्‌बुद्धि होती । स्थलत्याग होतां सर्वेचि जाती । काय करूं रे क्रिया घडेना । तुज० ॥८॥ जय-जय दयाळा त्रैलोक्यपाळा । भवसिंधुहारी मज तारिं हेळा । स्वामी वियोगें पळही गमेना । तुज० ॥ ९ ॥ आम्हां अनाथां तूं एक दाता । संसारचिंता चुकवीं समर्था । दासा मनीं आठव वीसरेना । तुजवीण रामा मज कंठवेना ॥ १० ॥ जयजय रघुवीर समर्थ ॥

# नित्यपाठ भजनमाला.

## भाग तिसरा.

### आरती गणपतीची.

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची ॥ नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ॥ सर्वांगीं सुंदर उटि शेंदुराची ॥ कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ॥ १ ॥ जयदेव जय देव जय मंगळमूर्ती ॥ दर्शनमात्रें मन-कामना पुरती ॥ ध्रु० ॥ रत्नखचित फरा तुज गौरी-कुमरा ॥ चंदनाची उटी कुंकुम केशरा ॥ हिरेजडित मुगुट शोभतो बरा ॥ रुणझुणती नूपुरें चरणीं घागरिया ॥ २ ॥ लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ॥ सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ॥ दास रामाचा वाट पाहे सदना ॥ संकष्टीं पावावें निर्वाणीं रक्षावें सुरवरवंदना ॥ ३ ॥

### आरती शंकराची

लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा ॥ विषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा ॥ लावण्यसुंदर मस्तकीं बाळा ॥ तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां ॥ १ ॥ जयदेव

जयदेव जय श्रीशंकरा ॥ आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा ॥ ध्रु० ॥ कर्पुरगौर भोळा नयनीं विशाळा ॥ अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा ॥ विभूतीचें उधळण शितिकंठ नीळा ॥ ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥ २ ॥ देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केलें ॥ त्यामाजी अवचित हळाहळ जें उठिलें ॥ तें त्वां असुरपणें प्राशन केलें ॥ नीळकंठ नाम प्रसिद्ध झालें ॥ २ ॥ व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ॥ पंचाननमनमोहन मनिजनसुखकारी ॥ शतकोटीचें वीज वाचे उच्चारी ॥ रघुकुळटीळक **रामदासा** अंतरीं ॥ ३ ॥

## आरती देवीची

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं । अनाथनाथे अंबे करुणा विस्तारीं ॥ वारीं वारीं जन्म मरणातें वारीं ॥ हारीं पडलों आतां संकट निवारीं ॥ १ ॥ जयदेवी जयदेवी महिषासुरमथिनी ॥ सुरवरईश्वरवरदे तारक संजिवनी ॥ ध्रु० ॥ त्रिभुवनिं भुवनीं पहातां तुजऐसी नाहीं ॥ चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं ॥ साही विवाद करितां पडले प्रवाहीं ॥ ते तूं भक्तांलागीं पावसि लवलाहीं ॥ २ ॥ प्रसन्न-

वदने प्रसन्न होसी निजदासां ॥ क्लेशापासुनी सोडविं तोडीं भवपाशा। अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा। **नरहरि** तल्लीन झाला पदपंकजलेशा ॥ ३ ॥

## आरती पंचायतनाची.

जय देव जय देव जय सुखकर मूर्ति ॥ गणपति शिव हरि भास्कर अंबा सुखमूर्ति ॥ ध्रु० ॥ अघसंकट-भयनाशन सुखदा विघ्नेशा ॥ आद्या सुरवरवंद्या नर-वारणवेषा ॥ पाशांकुशधर सुंदर पुरवीसी आशा ॥ निज वर देउनि हरिसी भ्रांतीच्या पाशा ॥ १ ॥ नंदी-वहना गहना पार्वतिच्या रमणा ॥ मन्मथदहना शंभो वातात्मजनमना ॥ सर्वोपायविवर्जित तापत्रय—शमना ॥ कैलासाचलवासा करिती सुर नमना ॥ २ ॥ पयसागरजाकांता धरणीधरशयना ॥ करुणालय वारिसि भव वारिजदलनयना ॥ गरुडध्वज भजनप्रिय प्रभु पीत-वसना ॥ अनुदिनिं तवकीर्तनरस चाखो हे रसना ॥ ३ ॥ पद्मप्रबोधकरणा नेत्रभ्रमहरणा ॥ गोधनबंधनहर्ता द्योतक आचरणा ॥ किरणस्पर्शें वारिसि या तमआवरणा ॥ शरणागतभयनाशन सुखवर्धनकरणा ॥ ४ ॥ त्रिभुवन-उत्पति पालन करिसी तूं माया ॥ नाहीं तुझिया रूपा दुसरी

उपमा या ॥ तूझा गुणगणमहिमा नकळे निगमा या ॥ करुणा करिसी अंबे मन विश्रामा या ॥ ५ ॥

# आरती रामचंद्राची.

जयदेव जयदेव आत्मया रामा ॥ निगमागम शोधितां नकळे गुणसीमा ॥ ध्रु० ॥ नानादेहीं देव एक विराजे ॥ नाना नाटकलीला सुंदर रुप साजे ॥ नाना तीर्थीं क्षेत्रीं अभिनव गति माजे ॥ अगाध महिमा तूझा ब्रम्हांडीं गाजे ॥ १ ॥ बहुरूपी बहुगुणी बहुतां काळांचा ॥ हरिहर ब्रह्मादिक देव सकळांचा ॥ युगानुयुगीं आत्माराम आमुचा ॥ दास म्हणे महिमा न बोलवे वाचा ॥२॥

# आरती रामचंद्राची

स्वस्वरुपोन्मुख बुद्धि वैदेही नेली ॥ देहात्मकाभिमानें दशग्रीवें हरली ॥ सद्विवेक मारुतीनें सच्छुद्धि अणिली॥ तव चरणांबुजिं येउनि वार्ता श्रुत केली ॥१॥ जय देव जय देव निजबोधारामा ॥ परमार्थें आरती सद्भावें आरती परिपूर्णकामा ॥ ध्रु० ॥ उत्कट साधुनि शिळा सेतू बांधोनी ॥ लिंगदेहलंकापुरि विध्वंसूनी ॥ कामक्रोधादिक राक्षस मर्दूनी ॥ देहअहंभाव रावण

निवटोनी ॥ २ ॥ प्रथम सीताशुद्धी हनुमंत गेला ॥ लंका दहन करुनी अखया मारीला ॥ मारीला जंबूमाळी भुवनीं त्राहाटीला ॥ आनंदाची गुढी घेउनियां आला ॥ ३ ॥ निजबळें निजशक्ति सोडविली सीता ॥ म्हणुनी येणं झालें अयोध्ये रघुनाथा ॥ आनंदें ओसंडे वैराग्य भरता ॥ आरति घेउनि आली कौसल्या माता ॥ ४ ॥ अनुहतवादित्रध्वनि गर्जेति अपार ॥ अठरा पद्में वानर करिती भुभुःकार ॥ अयोद्धेसी आले दशरथकुमार ॥ नगरीं होत आहे आनंद थोर ॥ ५ ॥ सहज सिंहासनीं राजा रघुवीर ॥ सोहंभावें तया पूजा उपचार ॥ सहजांची आरती वाद्यांचा गजर ॥ **माधवदास** स्वामी आठव ना विसर ॥ ६ ॥

## आरती रामचंद्राची.

काय करूं गे माय आतां कवणा ओवाळूं ॥ जिकडे पाहें तिकडे राजाराम कृपाळू ॥ ध्रु० ॥ ओंवाळूं गे माय निजमूर्ती रामा ॥ रामरूपीं दुजेपण न दिसे आह्मां ॥ १ ॥ सुरवर नर वानर अवघा राम सकळ ॥ दैत्य निशाचर तेही राम केवळ ॥ २ ॥ त्रैलोक्यस्वरूपें राम संचरला एक॥ सद्गुरुकृपें **केशवराजीं** आनंद देख॥ ३ ॥

## आरती कृष्णाची

कोणा शरण गेले विधि त्रिपुरहरणा ।। गोरूपा भूदेवासह दुःखोद्धरणा ।। क्षीराब्धिस्थें कोणीं येउनियां करुणा ।। नाभी नाभी गर्जुनि केलें अवतरणा ।। १ ।। जयदेव जयदेव जय मेघश्यामा ।। ब्रह्मचारी म्हणविसि भोगुनियां श्यामा ।। ध्रु० ।। पद लावुनि यमलार्जुन कोणीं उद्धरिला ।। क्षणमात्रें दावानल कोणीं प्राशियला ।। बाळपणीं शकटासुर कोणीं नाशियला ।। बालक देउनि कोणीं गुरु संतोषविला ।। २ ।। वसुदेवासह जातां लाउनियां चरणा ।। कोणीं उथळ केली अवलीला यमुना ।। अवतारें अरुणानुज निज वाहन कोणा ।। मोहरिनादें कोणा लुब्ध व्रजललना ।। ३ ।। भोगुनियां भोगातित कोणातें म्हणती ।। भारत भागवतादी कोणाची ख्याती ।। ऐसा तूं परमात्मा परब्रह्ममूर्ति ।। **एका जनार्दन** ध्याताहे चितीं ।। ४ ।।

## आरती कृष्णाची.

अवतार गोकुळीं हो ।। जन तारावयासी ।। लावण्य रूपडें हो ।। तेजःपुंजाळ राशी ।। उगवले कोटि

बिंब ॥ रवि लोपला शशि ॥ उत्साह सुरवरां ॥ महा-
थोर मानसीं ॥ १ ॥ जयदेवा कृष्णनाथा ॥ राहीरखु-
माईकांता ॥ आरती ओंवाळीन ॥ तुह्मां देवकीसुता
॥ ध्रु० ॥ कौतुक पहावया ॥ माव ब्रम्ह्यानें केली ॥
वत्सें हीं चोरुनियां ॥ सत्यलोकासि नेलीं ॥ गोपाळ
गाईवत्सें ॥ दोहीं ठायीं रक्षिलीं ॥ सुखाचा प्रेमसिंधू ॥
अनाथांची माउली ॥ २ ॥ चारितां गोधनें हो ॥ इंद्र
कोपला भारी ॥ मेघ जो कडाडीला ॥ शिळा वर्षल्या
धारीं ॥ रक्षिलें गोकुळ हो ॥ नखिं धरिला गिरी ॥
निर्भय लोकपाळ ॥ अवतरला हरी ॥ ३ ॥ वसुदेव
देवकीचे ॥ बंद फोडिली शाळ ॥ होउनियां विश्वज-
निता ॥ तया पोटींचा बाळ ॥ दैत्य हे त्रासियेले ॥
समूळ कंसासी काळ॥ राज्य हें उग्रसेना ॥ केला मथुरा-
पाळ॥ ४ ॥ तारिले भक्तजन ॥ दैत्य सर्व निर्दाळून ॥
पांडवसाहकारी ॥ अडलीया निर्वाणीं ॥ गुण मी काय
वर्णूं ॥ मति केवढी वाणी ॥ विनवितो दास तूका ॥
ठाव मागे चरणीं ॥ ५ ॥

## आरती कृष्णाची.

ओंवाळूं आरती मदनगोपाळा ॥ श्यामसुंदर गळां

वैजयंतीमाळा ॥ ध्रु० ॥ चरणकमल ज्याचें अति सकुमार ॥ ध्वजवज्रांकुश चरणीं ब्रीदांचे तोडर ॥ १ ॥ नाभिकमलीं ज्याचे ब्रह्मयाचें स्थान ॥ हृदयीं पदक शोभे श्रीवत्सलांछन ॥ २ ॥ मुखकमळ पाहतां सूर्याच्या कोटी ॥ मोहियेलें मानस कोंदाटली दृष्टि ॥ ३ ॥ जडित मुगुट ज्याचा देदीप्यमान ॥ तेणें तेजें कोंदलें अवघें त्रिभुवन ॥ ४ ॥ एका जनार्दनीं देखियेलें रूप ॥ रूप पाहों जातां जाहलें तद्रूप ॥ ५ ॥

## आरती भुवनसुंदराची.

आरती भुवनसुंदराची ॥ इंदरावरा मुकुंदाची ॥ ध्रु०॥ पद्मसम पाद युग्मरंगा ॥ ओवाळणीं होति भृङ्गा ॥ नखमणि स्रवताहे गंगा ॥ जे कां त्रिविधतापभंगा ॥ वर्तुल गुल्फ भ्राजमाने ॥ किंकिणि क्वणित नाद घणघणित वांकिवर झुणित नेपुरें झनन मंजिराची ॥ झननन ध्वनीं मंजिराची ॥ आरती भुवन० ॥ १ ॥ पीतपट हाटकतप्तवर्णी ॥ कांची नितंब सुस्थानीं ॥ नाभिची अगाध हो करणी ॥ विश्वजनकाची जे जननी ॥ त्रिवली ललित उदरशोभा ॥ कंबुगल

माल विलंबित झळाळ कौस्तुभ सरळ बाहु श्रीवत्स तरलमणि मरळ कंकणाची ॥ प्रीति बहु जडित कंकणाची॥ आरती० ॥ २ ॥ इंदुसम आस्य कुंदरदना ॥ अधरारुणार्कबिंबवदना ॥ पाहतां भ्रांति पडे मदना ॥ सजलमेघाब्धि दैत्यदमना ॥ झळकत मकरकुंडलाभा ॥ कुटिल कुंतलीं मयूरपत्रावळी वेष्टिले तिलक भालिं केशरी झळझळित कृष्णकस्तुरीची ॥ अक्षता कालि कस्तुरीची ॥ आरती भुवन० ॥ ३ ॥ कल्पद्रुमातळीं मूर्ती ॥ सौदामिनी कोटि दीप्ती ॥ गोपीगोपवलय भंवतीं ॥ त्रिविष्टप पुष्पवृष्टि करिती ॥ मंजुल मधुर मुरलिनादें ॥ चकित गंधर्व चकित अप्सरा सुरागिरिवरा कर्पुरधरा रतीनें प्रेमयुक्त साची ॥ आरती ओंवाळित साची ॥ आरती भुवन० ॥ ४ ॥ वृन्दावनींचे विहरणीं ॥ सखे गे कृष्ण मायबहिणी ॥ श्रमलों भवाब्धिचे फिरणीं ॥ अतां मज ठाव देइं चरणीं ॥ अहा हे पूर्णपुण्यश्लोका ॥ नमितों चरण शरण मी करुणा येउं दे विषाण पाणी कृष्णा नेणतें बाळ आपलें राखिं लाज याची ॥ दयाळा राखिं लाज याची ॥ आरती भुवन० ॥ ५ ॥

## आरती विठ्ठलाची.

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा ॥ वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥ पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा ॥ चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥ १ ॥ जय देव जय देव जय पांडुरंगा ॥ रखुमाईवल्लभा राईच्या वल्लभा पावें जिवलगा ॥ ध्रु० ॥ तुळसीमाळा गळां कर ठेउनि कटीं ॥ कांसे पीतांबर कस्तुरि ल्लाटीं ॥ देव सुरवर नित्य येती भेटी ॥ गरुड हनूमंत पुढें उभे राहती ॥ २ ॥ धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा ॥ सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां ॥ राई रखुमाबाई राणीया सकळा ॥ ओंवाळीती राजा विठोबा सांवळा ॥ ३ ॥ ओंवाळूं आरत्या कुर्वंड्या येती ॥ चंद्रभागेमाजी सोडुनियां देती ॥ दिंड्या पताका वैष्णव नाचती ॥ पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ ४ ॥ आषाढी कार्तिकी भक्तजन येती ॥ चंद्रभागेमाजी स्नानें जे करिती ॥ दर्शनहेळामात्रें तयां होय मुक्ती ॥ केशवासी नामदेव भावें ओंवाळिती ॥ ५ ॥

## आरती दत्ताची.

त्रिगुणात्मक त्रयमूर्ति दत्त हा जाणा ॥ त्रिगुणी अवतार

त्रैलोक्यराणा ॥ नेतीनेती शब्द नये अनुमाना ॥ सुरवर मुनिजन योगी समाधिले ध्याना ॥ १ ॥ जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता ॥ आरति ओंवाळितां हरली भवचिंता ॥ ध्रु० ॥ सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त ॥ अभाग्यासी कैंची कळेल ही मात ॥ पराहि परतली कैंचा हा हेत ॥ जन्ममरणाचाही पुरलासे अंत ॥ २ ॥ दत्त येऊनियां उभा ठाकला ॥ साष्टांग नमन प्रणिपात केला ॥ प्रसन्न होऊन आशीर्वाद दिधला ॥ जन्ममरणाचा फेरा चुकविला ॥ ३ ॥ दत्तदत्त ऐसें लागलें ध्यान ॥ हारपलें मन झालें उन्मन ॥ मीतूंपणाची झाली बोळवण ॥ एका जनार्दनीं श्रीदत्तध्यान ॥ ४ ॥

## आरती मारुतीची.

सत्राणें उडाणें हुंकार वदनीं ॥ करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनीं ॥ गडबडिलें ब्रह्मांड धाकें त्रिभुवनीं ॥ सुर नर निशाचर त्यां झाल्या पळणी ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय हनूमंता ॥ तुमचेनी प्रसादें नभीं कृतांता ॥ ध्रु० ॥ दुमदुमलीं पाताळें उठिला प्रतिशब्द ॥ थरथरला धरणीधर मानीला खेद ॥

कडकडिले पर्वत उडुगण उच्छेद ॥ रामीं रामदासा शक्तीचा बोध ॥ जयदेव जयदेव० ॥ २ ॥

## आरती श्रीरामदासाची

साक्षात् शंकराचा ॥ अवतार मारुती ॥ कलिमाजीं तेचि जाली ॥ रामदासाची मूर्ती ॥ १ ॥ आरती रामदासा ॥ भक्त विरक्त ईशा ॥ उगवला ज्ञानसूर्य ॥ उजळोनि प्रकाशा ॥ ध्रु० ॥ वीसही दशकांचा ॥ दासबोध ग्रंथ केला ॥ जडजीवां उद्धरीलें ॥ नृप शिवासि तारिलें ॥ २ ॥ ब्रह्मचर्य व्रत ज्याचें ॥ रामरूप सृष्टि पाहे ॥ कल्याण तिहीं लोकीं ॥ समर्थ सद्गुरुपाय॥ ३॥

## आरती ज्ञानदेवाची.

आरती ज्ञानराजा ॥ महाकैवल्यतेजा ॥ सेविती साधुसंत ॥ मनु वेधला माझा ॥ ध्रु० ॥ लोपलें ज्ञान जगीं ॥ हित नेणती कोणी ॥ अवतार पांडुरंग ॥ नाम ठेविलें ज्ञानी ॥ १ ॥ कनकाचें ताट करीं ॥ उभ्या गोपिका नारी ॥ नारद तुंबर हो ॥ सामगायन करी ॥ २ ॥ प्रगट गुह्य बोले ॥ विश्व ब्रह्मचि केलें ॥ रामा जनार्दनीं ॥ पायीं टकचि ठेलें ॥ ३ ॥

## आरती नामदेवाची.

जन्मतां पांडुरंगें ॥ जिव्हेवरि लिहिलें ॥ शतकोटी अभंग ॥ प्रमाण कवित्व रचिलें ॥ १ ॥ जयजयाजी भक्तराया ॥ जिवलग नामया ॥ आरती ओवाळितां ॥ चित्त पालटे काया ॥ ध्रु० ॥ घ्यावया भक्तिसुख ॥ पांडुरंगें अवतार ॥ धरूनियां तिर्थमिषें ॥ केला जगाचा उद्धार ॥ २ ॥ प्रत्यक्ष प्रचीती हे ॥ वाळवंट परीस केली ॥ हारपली विषमता ॥ द्वैतबुद्धि निरसली ॥ ३ ॥ समाधि महाद्वारीं ॥ श्रीविठ्ठलचरणीं ॥ आरती ओवाळितो ॥ परिसा कर जोडुनी ॥ ४ ॥

## आरती तुकारामाची.

आरती तुकारामा ॥ स्वामी सद्गुरुधामा ॥ सच्चिदानंदमूर्ती ॥ पाय दाखवीं आम्हां ॥ ध्रु० ॥ राघवें सागरांत ॥ पाषाण तारीले ॥ तैसे हे तुकोबाचे ॥ अभंग उदकीं रक्षिले ॥ १ ॥ तुकीना तुलनेसी ॥ ब्रह्म तुकासी आलें ॥ म्हणोनी रामेश्वरें ॥ चरणीं मस्तक ठेविलें ॥ २ ॥

# आरती एकनाथाची

आरती एकनाथा ॥ महाराजा समर्था ॥ त्रिभुवनीं तूंचि थोर ॥ जगद्गुरु जगन्नाथा ॥ ध्रु० ॥ एकनाथ हें सार ॥ वेदशास्त्रांचें गूज ॥ संसारदुःख नासे ॥ महामंत्राचें बीज ॥ १ ॥ एकनाथ नाम घेतां ॥ सुख वाटलें चित्ता ॥ **अनंत गोपाळदासा** ॥ धणी न पुरे गातां ॥ २ ॥

# शेजारती

आरती आरत ऐक्यभावें ओवाळूं ॥ प्रकाश स्वयंज्योती निज तेजें बंबाळू ॥ ध्रु० ॥ परमात्मा श्रीराम मोहंमाया जानकी ॥ विश्रांति पावलीं गजर नकिजे सेवकीं ॥ १ ॥ स्नेह ना भाजन नाहीं वाती पावक ॥ सबह्याभ्यंतरी अवघा निघोट दीपक ॥२॥ ऐक्याचे सुमनशेजे आत्मा रघुपती। राजाराम रघुपती ॥ वाचा परुषली शब्द न बोलवे पुढती ॥ ३ ॥ **राम** आणि **दास** दोघे पहुडले रामीं ॥ हेंही बोलावया दुजा न उरे धामीं ॥ ४ ॥

# भजन

रामा रामा रामा रामा रघुनंदना रघुनंदना ॥ रामा रामा रामा रामा कुळभूषणा ॥ १ ॥ रामा रामा रामा

रामा जानकीपते जानकीपते ॥ रामा रामा रामा रामा विमळमते ॥ २ ॥ रामा रामा रामा रामा दीन-वत्सला भक्तवत्सला ॥ **रामदास** म्हणे तुझी अगाध लीला ॥ ३ ॥ रामा रामा रामा रामा रामा हो ॥ तारीं तारीं तारीं तारीं आह्मां हो ॥ ४ ॥ तोडीं तोडीं तोडीं तोडीं भवपाश ॥ अनन्य शरण **रामीं रामदास** ॥ ५ ॥ राम राम राम जप सीताभिराम सीताभि-राम ॥ राम राम राम जप सीताभिराम ॥ १ ॥

## आरती

संत सनकादिक भक्त मिळाले अनेक । स्वानंदें गर्जती पाहूं आले कौतुक ॥ १ ॥ नवल होत आहे आरती देवाधिदेवा । स्वर्गाहुनी सुरवर पाहूं येताति भावा ॥ ध्रु० ॥ नरनारी तटस्थ टक पडले नयना । ओवाळितां श्रीमुख धणी न पुरे मना ॥ २ ॥ **एका जनार्दनीं** मंगळ कौतुकें गाती आरत्या गाती । मिळाले वैष्णव जयजयकारें गर्जती ॥ ३ ॥

## आरती

काय मागूं वारंवार बा रे विठ्ठला । अखंडित सप्रेम द्यावी आवडी मजला ॥ ध्रु० ॥ लाडकें लडिवाळ

बाळ खेळे अंगणीं । अवघा हा विठ्ठल मज न दिसे कोणी ॥ १ ॥ पावला प्रसाद तुळसीमाळ कंठींची । **नरहरि माधव** ह्मणे मज आर्त भेटीची ॥ २ ॥

## पाळणा

जो जो जो जो रे कुलभूषणा । दशरथनंदना ॥ निद्रा करिं बाळा मनमोहना । रामालक्ष्मणा ॥ ध्रु० ॥ पाळणा लांबविला अयोध्येसी । दशरथाचे वंशीं ॥ पुत्र जन्मले हृषीकेशी । कौशल्येचे कुशीं ॥ १ ॥ रत्नजडित पालख । झळके अमोलिक ॥ वरती पहुडले कुळदीपक । त्रिभुवननायक ॥ २ ॥ हालवी कौसल्या सुंदरी । धरुनी ज्ञानदोरी ॥ पुष्पें वर्षिलीं सुरवरीं । गर्जति जय-जयकारीं ॥ ३ ॥ विश्वव्यापका रघुराया । निद्रा करिं बा सखया ॥ तुजवरि कुरवंडी करूनियां । सांडिन आपुली काया ॥ ४ ॥ येउनि वसिष्ठ सत्वर । सांगे जन्मांतर ॥ राम परब्रह्म साचार । सातवा अवतार ॥५॥ याग रक्षुनियां अवधारा । मारुनि रजनीचरां ॥ जाइल सीतेच्या सैंवरा । उद्धरि गौतमदारा ॥ ६ ॥ पर्णिल जानकी सुरूपा । भंगुनियां शिवचापा ॥ रावण लज्जित महाकोपा । नव्हे पण हा सोपा ॥ ७ ॥ सिंधुजलबोहीं

अवलीळा । नामें तरतिल शिळा ॥ त्यांवरि उतरोनी दयाळा । नेसिल वानरमेळा ॥ ८ ॥ समूळ मर्दुनी रावण । स्थापिल बिभीषण ॥ देव सोडवील संपूर्ण । आनंदेल त्रिभुवन ॥ ९ ॥ ऐशीं चरित्रें अपार । करील मनोहर ॥ इतुकें ऐकोनी उत्तर । हांसले रघुवीर ॥१०॥ राम भावाचा भुकेला । भक्ताधीन झाला ॥ दास विठ्ठलें ऐकिला । पाळणा गायिला ॥ ११ ॥

## प्रदक्षिणा.

धन्य धन्य हे प्रदक्षिणा सद्गुरुरायाची । झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची ॥ ध्रु० ॥ पदोपदीं अपार झाल्या पुण्याच्या राशी । सर्वहि तीर्थें घडलीं आम्हां आदिकरुनि काशी ॥ १ ॥ मृदंग टाळ घोळ भक्त भावार्थें गाती । नामसंकीर्तनीं ब्रम्हानंदें गर्जती॥ २ ॥ कोटी ब्रम्हहत्या हरती करितां दंडवत । लोटांगण घालितां मोक्ष लोळे पायांत ॥ ३ ॥ गुरुभजनाचा महिमा नकळे निगमागमासी । अनुभवि ते जाणती जे गुरुपदिंचे अभिलाषी ॥४॥ प्रदक्षिणा करुनी देह भावें वाहिला । श्रीरंगात्मज विठ्ठल पुढें उभा राहिला॥५॥

# विडा

विडा घ्या हो नारायणा । कृष्णा जगत्रयजीवना । विनविते रखुमाई । दासी होइन मी कान्हा ॥ ध्रु० ॥ वासना फोडुनियां । चूर्ण केली सुपारी ॥ भावार्थ कापुरानें । घोळियेली निर्धारीं ॥ १ ॥ शांति हे नागवेली । पानें घेउनियां करीं ॥ मीपण जाळुनियां । चुना लावियेला वरी ॥ २ ॥ विवेक हा कातरंग । रंगीं रंगला सुरंग ॥ वैराग्य जायफळ । मेळविलें सकळ ॥ ३ ॥ दया हे जायपत्री । क्षमा लवंगा आणिल्या ॥ सद्‍बुद्धि वेल दोडे । **शिवरामें** मेळविले ॥ ४ ॥

## वरप्रसाद ( अभंग )

आकल्प आयुष्य व्हावें तया कुळा । माझिया सकळा हरिच्या दासां ॥ १ ॥ कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं । ही संतमंडळी सुखी असो ॥ २ ॥ अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझ्या विष्णुदासां भाविकांसी ॥ ३ ॥ **नामा** ह्मणे तया असावें कल्याण । ज्या मुखीं निधान पांडुरंग ॥ ४ ॥

## अभंग

हेंचि दान दे गा देवा । तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥
न लगे मुक्ति धन संपदा । संतसंग देई सदा ॥ ३ ॥
**तुका** ह्मणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसी ॥ ४ ॥

## आरती

हरि चला मंदिरा ऐशा म्हणती गोपिका । म्हणती राधिका ॥ भावें ओंवाळिती यादवकुळटिळका ॥ १ ॥ एकीकडे राई एकीकडे रखुमाई । भावें ओंवाळितां हरी जाला दों ठायीं ॥ २ ॥ अष्टाधिक सोळा सहस्त्र ज्याला सुंदरा । ज्या ज्यांनीं प्रार्थिला गेला तयांचिया घरा ॥ ३ ॥ **एका जनार्दनी** हरि तूं लाघवी होसी । इतुक्याही भोगुनी ब्राह्मचारी म्हणविसी ॥ ४ ॥

## शेजारती

पावला प्रसाद आतां विठो निजावें । आपुला तो श्रम कळों येतसे भावें ॥ १ ॥ आतां स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा । पुरले मनोरथ जातों आपुलिया स्थळा ॥ २ ॥ तुम्हासी जागविलें आम्हीं आपुलिया चाडा ।

शुभाशुभ कर्म दोष हरावया पीडा ॥ ३ ॥ **तुका** ह्मणे दिलें उच्छिष्टाचें भोजन। नाहीं निवडिलें आम्हां आपुलिया भिन्न ॥ ४ ॥

## प्रार्थना

घालीन लोटांगण वंदीन चरण। डोळ्यांनीं पाहीन रूप तुझें ॥ प्रेमें आलिंगीन आनंदें पूजीन भावें ओवाळीन ह्मणे **नामा** ॥ १ ॥ त्वमेव माताचपिता त्वमेव। त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ॥ त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव। त्वमेव सर्वं मम देव देव ॥ २ ॥ कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा। बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् ॥ करोमि यद्यत् सकलं परस्मै। नारायणेति समर्पयामि ॥ ३ ॥ अच्युंत केशवं राम नारायणं। कृष्ण दामोदरं वासुदेवं हरिं ॥ श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं। जानकीनायकं रामचंद्रं भजे ॥ ४ ॥ हरे राम हरे राम राम राम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥५॥

## मंत्रपुष्पांजलि.

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानिधर्माणि प्रथमान्यासन्। तेहनाकं महिमानः सचंतयत्र पूर्वे साध्याःसंतिदेवाः ॥

ॐ राजाधिराजायप्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्म हे समे कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु । कुबेराज वैश्रवणाय महाराजायनमः ॥ ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्य माधिपत्यमयं । समंत पर्या ईस्यात् सार्वभौम सावायुष आंतादा परार्धात् ॥ पृथिव्यै समुद्रपर्यंतायाः एकराळिति । तदप्येष श्लोकोभिगीतो मरुतः परिवेष्टारोमरुत्तस्यावसन् गृहे ॥ आविक्षितस्य-कामप्रेर्विश्वे देवाः सभासद इति ॥

## श्लोक

सदा सर्वदा योग तूझा घडावा ।
तुझे कारणीं देह माझा पडावा ॥
उपेक्षूं नको गूणवंता अनंता ।
रघूनायका मागणें हेंचि आतां ॥

जयजय रघुवीर समर्थ, सीताकांतस्मरण जयजय राम, पुंडलीक वरदे हरि विठ्ठल, पार्वतीपते हर हर महादेव, श्रीगुरुदेव दत्त.

ग्रहालय

१६८५

REFBK-0001685

REFBK-0001685